29206
१५६।७६
संदर्भ
ग्रंथ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 DEC 1979

[कृ. मा. प.]

भारताचा महान सुपुत्र

जवाहरलाल नेहरू –

सोविएत दृष्टिकोण

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
2467
212006 निबंध
(स्थळ प्रत)

भारताचा महान सुपुत्र

जवाहरलाल नेहरू – सोविएत दृष्टिकोण

संकलन व संपादन :

लिओनिद मित्रोखिन
निकोलाय फेदीन

REFBK-0021207

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

BHARATACHA MAHAN SUPUTRA
(*Marathi*)
Leonid Mitrokhin - Nikolai Fedin (Eds.)

भारताचा महान सुपुत्र : जवाहरलाल नेहरू
– सोविएत दृष्टिकोण

पॉप्युलर प्रकाशन
म – ४३३

© १९७५ लिओनिद मित्रोखिन – निकोलाय फेदीन

पहिली आवृत्ती
१९७५/१८९७

मुखपृष्ठ :
बाळ ठाकूर

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ टिळक रोड
पुणे ४११ ०३०

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

अनुक्रम

१. **जवाहरलाल नेहरू आणि सोविएत संघराज्य** १

२. **जागतिक व्यवहारातील नेहरूंचा मार्ग** १२

— **इवान माइस्की** : भारताचे राष्ट्रीय नेते १६
— **पावेल येर्झिन** : मैत्रीचा पाया १४
— **मिखाएल मेन्शिकोव** : नेहरूंशी भेट १९
— **ईवान बेनेदिक्तोव** : भारताचे सुपुत्र २४

३. **नेहरू व सोविएत-भारत आर्थिक सहकार्य** २६

— **वेनियामिन दिमशित्स** : भिलाई – भावी काळातील भारताचे प्रतीक व नांदी ३०
— **निकोलाय गोल्डिन** : नवभारताची नवीन मंदिरे ३३
— **बोरिस रोमानोव** : वसुधारा – समृद्धीची गंगोत्री ३६
— **अलेक्झांडर सेलिवानोव** : सुरतगढ शेतावर नेहरू ३८
— **अलेक्सी वर्लामोव** : नेहरूंचे स्वप्न साकार झाले ४०
— **अलेक्झांडर लिबोव** : अविस्मरणीय आठवण ४२

४. **नेहरूंविषयी सोविएत प्राच्य पंडित** ४४

— **बोबोजान गफुरोव** : महान जनतेचा थोर सुपुत्र ४४
— **येवगेनी झुकोव** : साम्राज्यशाहीचा कडवा विरोधक ४५
— **येवगेनी चेलीशेव** : नेहरूंशी माझ्या भेटी ४७
— **व्लादिमीर बालाबुशेविच** : नेहरूंचे ध्येय अमर राहो ५०
— **सबोहात अझिमजानोवा** : महान पंडित ५२
— **अलेक्झी लेव्कोव्स्की – अलेक्झांदर चिचेरोव** : नेहरूंची स्मृती जनमानसात कायमची वास करून आहे ५४

५. महान मानवतावादी ५६

— **इल्या एरेनबुर्ग** : नेहरू : कलावंत, राजकारणी, भारताचा खरा सुपुत्र ६१

— **अनातोली सफ्रोनोव** : नेहरू : शांततेचे व आफ्रो-आशियाई ऐक्याचे समर्पित कैवारी ६३

— **इराकली आबाशिद्झे** : नेहरूविषयींचे अनुभव ६६

— **रसूल झां** : ते माझ्या गीतात वास करीत आहेत ७१

— **रशिद बैबुतोव** : माझ्या जीवनातील भारत ७३

— **एल्मिरा रगिमोवा** : नेहरू मला वडिलांच्या ठिकाणी होते ७५

— **रोमन कार्मेन** : नेहरू : आधुनिक भारताचे शिल्पकार ७८

— **निकोलाय पास्तुखोव** : भारताचे महान नागरिक ८०

— नेहरू आणि " सोविएत लॅण्ड " (पाक्षिक) ८२

६. चाचा नेहरू ८८

— **गेन्नादी पेचिन्कोव** : ' रामायणा 'च्या एका प्रयोगाच्या वेळी नेहरू

— **मिर्झा महमुतोव** : नेहरूंनी वचन पाळले

७. सोविएत संघराज्यातील नेहरू साहित्याचे प्रकाशन ९८

८. जनतेच्या स्मृतीमध्ये नेहरूंचे नाव अजरामर आहे १०२

— नेहरू आणि सोविएत चित्रकार १०३

— मैत्रीपुष्पे १०४

— दाण्यातली तसबीर १०५

— राजपथ १०६

— नेहरू शिखर १०७

— नेहरूंच्या स्मरणार्थ पोस्टाची तिकीटे १०८

"ख्यातनाम राजकारणी जवाहरलाल नेहरू यांच्या गाठीभेटी आणि दीर्घ संभाषणे माझ्या स्मृतीत दृढपणे कोरली गेली आहेत. आत्मनिर्भयता आणि प्रगती यांसाठी झटणाऱ्या भारतीयांचे सुज्ञपण, उदात्त अंतःकरण आणि महान आत्मा यांचे ते मूर्तिमंत प्रतीक होते."

—लिओनिद ब्रेझनेव, **आमचा मार्ग : शांतता व समाजवाद,** भाग ४ नोवोस्ती प्रेस एजन्सी प्रकाशन गृह मॉस्को, १९७४, पृ. १२०.

१

जवाहरलाल नेहरू आणि सोविएत संघराज्य

जवाहरलाल नेहरू विसाव्या शतकातील भारताच्या राजकीय इतिहासात एक अपूर्व स्थान धारण करतात. या स्थानावर त्यांचा सर्वस्वी हक्क आहे. "तत्त्वज्ञान्याची सखोल बुद्धिमत्ता असलेली एक व्यक्ती, निष्ठावन्त मानवतावादी, सामाजिक अन्यायाचे सातत्याने विरोधक, साम्राज्यशाहीचे व वसाहतवादाचे निग्रहपूर्ण शत्रू, शांततेचे व लोकशाहीचे समर्पित पुरस्कर्ते, आणि सोविएत संघराज्याचे सन्मित्र म्हणून त्यांचे समकालीन आणि इतिहास त्यांची आठवण काढतात."[१]

रशियामध्ये १९१७ साली समाजसत्तावादी क्रान्ती झाली. आमच्या युगावर ठाम ठसा उमट विणारे क्रांतिकारक बदल त्या क्रान्तीने घडविले. एक सैद्धान्तिक आणि राजकारणी या नात्याने नेहरू जे जीवन जगले, लढा व शोध यांनी परिपूर्ण असे जे जीवन नेहरू जगले, त्याच्याकडे या क्रान्तिकारक बदलांच्या चष्म्यातून पाहिले पाहिजे. या क्रान्तिकारक बदलातून त्यांच्या समग्र जीवनाचे मूल्यमापन केले पाहिजे.

भारताची वासाहतिक दास्यातून मुक्तता व्हावी म्हणून, आजचे त्याचे सार्वभौमत्व त्याला प्राप्त करून देण्यासाठी नेहरूंनी जागृत बुद्धीने आपले जीवन वेचले. भारताच्या सामाजिक व आर्थिक पुनरुज्जीवनासाठी भिन्न समाजपद्धतींच्या देशांमध्ये सहकार्य घडून यावे, जागतिक शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून चालू असलेल्या लढ्याला त्यांनी जो प्रचंड हातभार लावला त्याचे समर्पक मूल्यमापन विद्वज्जन आणि राजकीय पत्रकार यांच्या संयुक्त परिश्रमांनीच होऊ शकेल.

प्रस्तुत पुस्तकात 'नेहरू आणि सोविएत संघराज्य' या विषयाचा किंवा त्याच्या एका पैलूचा ऊहापोह करण्यात आला आहे. हा विषय मर्यादित स्वरूपाचा वाटला तरी तो पुरेसा विस्तृत आहे. भारत व सोविएत संघराज्य यांची मैत्री वृद्धिंगत करण्याच्या कार्यातील नेहरूंची भूमिका, भारताची अन्तर्गत व विदेशनीती आकारित करण्याच्या कार्यातील त्यांची

१. प्राध्यापक आर. कल्यानोव्स्की, 'नेहरू नवभारताचे निर्माते' इन्टरनॅशनल ॲफेअर्स क्रमांक ९, १९७४, पान १०६.

प्रेरणा होती, हे तितकेच खरे आहे. त्या काळी काँग्रेसच्या डाव्या बाजूचे नेतृत्व करणारे जवाहरलाल नेहरू आपल्या पक्षाच्या विदेशनीतीचे शिल्पकार व्हावयाचे होते आणि पुढे पंतप्रधान म्हणून भारत प्रजासत्ताकाच्या विदेशनीतीचे शिल्पकार व्हावयाचे होते.

१९२७ च्या फेब्रुवारीत नेहरू काँग्रेसचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून ब्रुसेल्स येथील वासाहतिक दडपशाहीविरुद्ध व साम्राज्यशाही विरुद्ध भरलेल्या आंतरराष्ट्रीय काँग्रेसला उपस्थित होते. एक मान्यवर नेते म्हणून ब्रुसेल्समध्ये त्यांचे स्वागत झाले. नेहरू हे त्या काळी एक तरुण काँग्रेसनेते होते आणि रशियातील यशस्वी ऑक्टोबर क्रान्तीने ते अतिशय प्रभावित झाले होते. आपल्या राजकीय जीवनाच्या या कालखंडाची आठवण काढून नेहरूंनी १९५६ साली तिबारे मोन्डे या पत्रकाराला सांगितले, " बोल्शेव्हिक क्रान्ती ही एक आत्यंतिक खळबळ माजविणारी घटना होय. क्रान्तीच्या वेळी आम्हाला खूप माहिती मिळाली नव्हती...लेनिन व इतरांविषयी आम्हांला अतिशय सहानुभूती वाटत होती..."[२]

नेहरू मॉस्कोत येण्याच्या काही आठवडे अगोदर 'फॉर्वर्ड' या भारतीय साप्ताहिकाने 'भारताची विदेशनीती' हा लेख प्रसिद्ध केला होता. त्या लेखात त्यांनी भारत-सोविएत विस्तृत संबंधांस खूप पसंती दर्शवली होती.

त्या लेखात नेहरूंनी म्हटले होते, 'रशियाशी मैत्रीचे संबंध विकसित करण्यास भारतास सबळ कारणे आहेत.'[३] देशाचे शिक्षण, शेती व औद्योगिकीकरण विकसित करण्यासाठी नवजात सोविएत राज्याने उपयोजिलेल्या विधायक पद्धतींचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचे आवाहन नेहरूंनी त्या लेखात केले होते.

सोविएत संघराज्य हा भारताचा शत्रू आहे असे चित्रित करण्याचे ब्रिटिश वासाहतिक शासनाचे जे प्रयत्न चालले होते, त्यांची नेहरूंनी त्याच लेखात सडकून हजेरी घेतली आहे. नेहरू म्हणतात, 'रशियाइतकी दुसऱ्या कुठल्याही देशाला शांततेची जरुरी नाही आणि केवळ भीती किंवा त्याचा जिच्यावर ताबा नाही अशा परिस्थितीमुळेच त्याला युद्ध करणे भाग पडले....भारताचे रशियाशी मुळीच भांडण नाही, भारताला रशियाविषयी खूप सहानुभूती वाटते आणि भारताला आवडणाऱ्या बऱ्याच गोष्टी रशियात आहेत.'[४] नेहरूंनी आपल्या देशबांधवांना दुसऱ्या एका खऱ्याखुऱ्या धोक्याचा इशारा देऊन ठेवला. तो धोका म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या फायद्यासाठी भारताला रशियाविरुद्ध युद्धात ओढणे हा होय, असे त्यांनी म्हटले आहे.

[२] नेहरू ८ नोव्हेंबर १९२७ रोजी मॉस्कोत आले. नंतर त्यांनी आत्मचरित्रात लिहून ठेवले '...आम्ही तेथे गेलो याचा आम्हाला फार आनंद झाला. हा दृष्टिक्षेप समुचित होता.

संबंधीचा लंडन व दिल्ली यामध्ये जो पत्रव्यवहार झाला, त्यामध्ये ब्रिटिश वासाहतिक शासनाच्या एका अधिकाऱ्याचे एक पत्र आहे. त्यात म्हटले आहे की, भारतीय अधिकाऱ्यांनी शिष्टमंडळाच्या रूपाने रशियाला भेट देण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांनी घेतला आहे. कारण या भेटीमुळे त्यांच्यावर अनिष्ट संस्कार होण्याचा संभव आहे.

भारतातील ब्रिटिश हेरगिरी खात्याच्या प्रमुखांनी भारतीय व सोविएत नागरिकांमधील कुठल्याही संपर्काला कटाक्षपूर्वक विरोध केला.[११]

आपल्या अनेक लेखांतून व भाषणांतून जवाहरलाल नेहरू यांनी सोविएत जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श केला आहे. सोविएत संघराज्यातील समाजसत्तावादी विकासाच्या एका पाठोपाठ एक अशा सर्व अवस्थांमध्ये नेहरूंनी तन्मय होऊन रस घेतला.

या विकासाच्या काही पैलूंना नेहरूंनी अन्तःकरणपूर्वक प्रतिसाद दिला. हे पैलू असे होते की, ते भारताच्या राष्ट्रीय पुनरुद्धाराच्या व स्वातंत्र्याच्या लढ्याला समुचित होते. प्रत्यक्ष संबंधित होते. हे पैलू म्हणजे आर्थिक मागासलेपणाचे निर्मूलन, औद्योगिकीकरण, आर्थिक नियोजन, विदेशी भांडवलाविषयीची वृत्ती, सहकारी तत्त्वानुसार शेतीची फेररचना, एकाच बहुराष्ट्रिक राज्याच्या चौकटीत राष्ट्रिकांचे संबंध वगैरे होत.

सर्वसाधारणपणे, समाजसत्तावादाचा मूलाशय, समाजसत्तावादामधील सामाजिक संबंधांचे स्वरूप, आणि समाजसत्तावादी दिशेने नवसमाजनिर्मितीचा मार्ग व साधने; याविषयी चिंतन करताना नेहरू सोविएत संघराज्याच्या अनुभवाकडे वळत असत. त्याचबरोबर येथे हेसुद्धा भर देऊन सांगितले पाहिजे की; कधी कधी नेहरू सोविएत जीवनाच्या काही पैलूंविषयी टीका करीत;पण आपल्या या अशा अभिप्रायांना ते अशी पुस्ती जोडीत की सोविएत रशियाच्या समाजसत्तावादी उभारणीच्या प्रत्यक्ष व्यवहारात काही उणिवा असल्या तरी तो खरोखरीच समाजसत्तावादी देश असून कुठल्याही भांडवलदारी देशाहून मूलतः भिन्न आहे. या संदर्भात नेहरू यांनी पुढील निष्कर्ष काढला. 'सोविएत क्रान्तीमुळे मानवी समाजाने एक मोठे पाऊल पुढे टाकले. सोविएत क्रांतीने अशी तेजाळ ज्योत प्रज्वलित केली की ती कधीही मालवली जाणार नाही. जगाने ज्या नव्या संस्कृतीकडे प्रगत वाटचाल करावी तिचा पाया सोविएत क्रान्तीने रचला.' [१२]

फॅसिझम व साम्राज्यशाही याविरुद्ध चाललेल्या लढ्याचा सोविएत संघराज्य हा बालेकिल्ला होय, हे नेहरूंनी, जाणले होते. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या २० डिसेंबर १९४१ च्या खाजगी स्वरूपाच्या ठरावाच्या मसुद्यात नेहरूंनी सोविएत संघराज्यावरील जर्मनीच्या विश्वास-

११. 'नॅशनल आर्किव्हूज् ऑफ इंडिया', 'फॉरेन ॲन्ड पोलिटिकल डिपार्टमेंट, सिक्रेट फाइल', नं. ७२–एफ–(३५), १९३५, नोटस २.

१२. जवाहरलाल नेहरू 'भारताचा शोध', लंडन १९५०, पान १४.

घातकी हल्ल्याचा जळजळीत निषेध केला. सोविएत लोक स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी आणि स्वाधीनतेसाठी लढत होते, नाझींच्या गुलामगिरीतून इतर लोकांची मुक्ती व्हावी म्हणून लढत होते आणि सोविएत लोकांचा अंतिम विजय होणारच होणार असा त्यांचा दृढ विश्वास होता.

आपल्या पहिल्या दौऱ्यानंतर जवळ जवळ तीस वर्षांनी नेहरूंनी सोविएत संघराज्याला भेट दिली. यावेळी ते सार्वभौम व स्वतंत्र भारताचे पंतप्रधान म्हणून आले होते. उभय देशांत मैत्री-सहकार्य विकसित करण्याची जरूरी आहे, अशी हा वेळपावेतो त्यांची ठाम खात्री झाली होती. सोविएत दौऱ्यावर निघण्यापूर्वी त्यांनी जाहीर केले की उभय देशांना मैत्री व विश्वास लाभदायक ठरेल. त्यांनी पुढे म्हटले, मला सोविएत लोकांच्या भेटीगाठी घेण्याची फार इच्छा आहे. त्यांनी काय कार्य केले ते स्वतः पाहण्यासाठी व त्यापासून शिकण्यासाठी आपण सोविएत संघराज्याला भेट देत आहो, असे ते म्हणाले.

१९५५ साली नेहरूंनी सोविएत संघराज्यात जे काही पाहिले, त्याचा त्यांच्यावर सखोल प्रभाव पडला. नेहरू म्हणाले, या देशात आत्यंतिक महत्त्वाचे बदल घडून आल्याचे आपणांला आढळून आले. हे बदल सोविएत लोकांच्या दीर्घ परिश्रमाने आणि प्रचंड आशाआकांक्षांनी घडून आले आहेत. या आशाआकांक्षा त्यांना स्वतःच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी पुढे पुढे जाण्याची प्रेरणा देत आहेत.

नेहरूंच्या सोविएत सरकारी नेत्यांशी झालेल्या भेटी व बोलणी अत्यंत महत्त्वपूर्ण होती. वाटाघाटींनंतर एक संयुक्त निवेदन प्रसृत करण्यात आले. त्यामध्ये इतर गोष्टींबरोबर असे म्हणण्यात आले होते की अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत उभय देशांचे दृष्टिकोण परस्परसदृश किंवा परस्परांस अत्यंत समीप आहेत. त्या निवेदनात उभय महान देशांमधील सहकार्य दृढ व विस्तारित करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला होता.

नेहरूंच्या या भेटीनिमित्त अत्यंत चोख कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यामध्ये नेहरूंसमवेत त्यांच्या सुकन्या श्रीमती इंदिरा गांधीही होत्या. सोविएत जीवनाच्या सर्व अंगांशी परिचय करून घेण्याची संपूर्ण सुसंधी त्यांना देण्यात आली. ते मॉस्कोमध्ये असताना त्यांनी लिखाचोव्ह मोटार कारखाना, विमान बांधणी कारखाना, राष्ट्रीय आर्थिक यशःसिद्धी प्रदर्शन, मास्को विद्यापीठ, माध्यमिक शाळा क्रमांक ५४५ यांना भेट दिली. त्यांनी मॉस्कोतील भूम्यंतर रेल्वेतून प्रवास केला. " भारतीय संस्कृती आणि कला " प्रदर्शन पाहिले. क्रेमलिनला भेट दिली. लेनिन समाधीला पुष्पचक्रे वाहिली.

नंतर नेहरूंनी व त्यांच्या कन्येने सोविएत संघराज्याचा दौरा केला. ते वोल्गोग्रामला गेले. तिथे त्यांनी स्थानिक कारखान्यांना आणि प्रेक्षणीय स्थळांना भेट दिली. क्रिमियामध्ये सॅनिटोरियम्ना, विश्रांतिधामांना आणि आर्तेक बालवीर छावणीला भेट दिली. जॉर्जियामध्ये त्यांनी रूस्तानीक शहराचा फेरफटका केला आणि दिगोमी सरकारी शेत पाहिले. अश्खाबादमध्ये थोडा वेळ थांबून नेहरू तास्कंदला गेले. त्यांनी समरकंद या प्राचीन शहराला भेट दिली.

स्थानिक कपाशी पैदास करणाऱ्या शेतकऱ्यांना ते भेटले. आणि उझबेक विज्ञानधामाच्या वैज्ञानिकांशी त्यांनी चर्चा केली. अल्ताई क्षेत्राला भेट देण्यापूर्वी ते आल्मा-अतामध्ये थोडा वेळ थांबले अल्ताई क्षेत्रात त्यांनी कुरीन सरकारी शेताला भेट दिली. १९५४ साली नापेर जमीन मशागत मोहिमेवेळी हे शेत संघटित करण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी मग्नितोगोर्स्क, स्वेर्दलोव्स्क आणि लेनिनग्राद या शहरांना भेट दिली. कारखाने पाहताना नेहरू औद्योगिक प्रक्रिया आणि क्षमता आणि औद्योगिक यंत्रसामग्री आणि यंत्रोपकरणे यामध्ये अतिशय स्वारस्य घेत होते. तसेच कामगारांच्या जीवनविषयक आणि कामाच्या परिस्थितीची आणि सामाजिक सुरक्षितता योजनांची रस घेऊन चौकशी करत होते.

मास्कोमध्ये नेहरू आणि श्रीमती इंदिरा गांधी बल्शोय थिएटरात 'हंस सरोवर' आणि 'बक्षीसराईचे कारंजे' बघायला गेले. लेनिनग्रादमध्ये ते किरोव ऑपेरा आणि बॅले थिएटरमध्ये 'निद्रित सुंदरी' बघायला गेले. त्बीलीसीमध्ये त्बीलीसी ऑपेरा व बॅले थिएटरमध्ये 'गोर्दा' हे नृत्यनाट्य त्यांनी पाहिले. ताश्कंद आणि स्वेर्दलोव्स्कमध्ये भारतीय पाहुण्यांच्या सन्मानार्थ खास जलसे आयोजित करण्यात आले होते.

मास्कोमध्ये दिनामो स्पोर्टस् स्टेडियममध्ये २१ जून १९५५ रोजी ८० हजार लोकांची जाहीर सभा झाली. ही सभा म्हणजे उभय देशांमधील लोकांच्या दृढ व विकसित होत जाणाऱ्या मैत्रीचे ठळक निदर्शक होते. त्या प्रसंगी बोलताना नेहरू म्हणाले, "आम्ही तेरा एक हजार किलोमीटरचा प्रवास केला. प्रमुख शहरांना आणि प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. पण या एकूण दौऱ्याचा प्रमुख विशेष म्हणजे आम्ही जेथे जेथे गेलो तेथे आमचे उत्कट स्वागत झाले. सोविएत लोकांशी ज्या गांठीभेटी व भेटी झाल्या त्यांतून मैत्री भावनेचा उत्कट आढळ झाला. आमच्या हार्दिक स्वागताबद्दल आणि तुमच्या मैत्रीबद्दल आम्ही तुमचे कृतज्ञ आहोत. ही कृतज्ञता व्यक्त करण्यास पुरेसे शब्द माझ्यापाशी नाहीत. ही कृतज्ञता शब्दांनी व्यक्त करता येत नाही."

मायदेशी प्रयाण करण्यापूर्वी नेहरू म्हणाले, "सोविएत संघराज्यामधील सोळा दिवसांच्या वास्तव्यातील माझे अनुभव वर्णन करणे अवघड आहे. ती एक दीर्घ कथाच होईल. केवळ मलाच नव्हे तर भारतीयांनाही त्याची नेहमीच आठवण राहील. मला दर्शविण्यात आलेली मैत्री भावना व आतिथ्यशीलता मी बहुमोलाची मानतो. माझी अत्यंत सुखद स्मृती म्हणजे मैत्री भावनेने गाठीभेटी व बोलणी. आमचे संबंध किती उत्कट आहेत ते त्यावरून दिसून येते." [१३]

नेहरूंनी १९६१ साली सोविएत संघराज्याला तिसरी व अखेरची भेट दिली. आणखी एकवार सोविएत मैत्रीबद्ध भारताच्या पंतप्रधानांचे सोविएत लोकांनी उत्कट हार्दिक स्वागत केले. त्यावेळच्या आपल्या अधिकृत भेटीत नेहरूंनी आंतरराष्ट्रीय घडामोडींविषयी सोविएत

१३. फोटो आल्बम 'सोविएत संघराज्यात जवाहरलाल नेहरू', मॉस्को, १९५५.

भारतीय पत्रकार श्री. एच. डी. मालवीय यांनी १९६३ साली सोविएत जॉर्जियाला भेट दिली होती. तेथे त्यांनी काखेतियाच्या गुर्दजानी जिल्ह्यातील लेनिन सामुदायिक शेताला भेट दिल्यानंतर पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केला. नंतर भारतीयांना व त्यांचे महान नेते नेहरू यांना शुभेच्छा प्रदर्शित करण्यात आल्या. दिमित्री मर्माश्विली म्हणाले, " भारत एक महान राष्ट्र आहे आणि त्याचे नागरिक अतिशय महान लोक आहेत, हे आम्हांला ठाऊक आहे. त्यांनी किती प्रखर लढे दिले आणि साम्राज्यवाद्यांकडून त्यांचे कसे शोषण होत होते याची आम्हांला माहिती आहे.

" पण आता भारताला स्वातंत्र्य मिळाले आहे. नेहरूंच्या रूपाने त्यांना एक महान नेता लाभला आहे. ते दोनदा जॉर्जियात आले. एकदा त्यांची सुकन्या त्यांच्यासमवेत होती. आम्ही त्यांना पाहिले आहे. ते आमचे सन्मित्र आहेत. त्यांनी जागतिक शांततेसाठी धिटाईने प्रयत्न केले हे आम्हांला ठाऊक आहे. स्वातंत्र्य भक्कम व्हावे आणि आर्थिक प्रगती साध्य व्हावी म्हणून ते जनतेचे नेतृत्व करीत आहेत. " [१६]

जवाहरलाल नेहरू भारताचे महान सुपुत्र होते. ख्यातनाम राजकारणी होते; शांततेचे व शांततापूर्ण आंतरराष्ट्रीय संबंधांचे जाज्वल्य पुरस्कर्ते होते. सोविएत व भारतीय लोकांमध्ये मैत्री–सहकार्य वृद्धिंगत व्हावे, या गोष्टीला त्यांचा मनःपूर्वक पाठिंबा होता. शेकडो, नव्हे हजारो सोविएत लोकांना त्यांना भेटण्याची व त्यांच्याशी बोलण्याची सुसंधी लाभली. सोविएत लोकांना त्यांचा विसर पडणार नाही.

१६. 'सोविएत लॅन्ड', १९६३, अंक १९.

२

जागतिक व्यवहारातील नेहरूंचा मार्ग

भारताचे पंतप्रधान आणि त्याचबरोबर परराष्ट्रमंत्री या नात्याने जवाहरलाल नेहरू हे भारताच्या विदेश धोरणाचे शिल्पकार आणि अंमलबजावणीकार होते.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी १९२७ साली नेहरूंनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील संघर्षांचे विश्लेषण करताना दाखवून दिले होते की, भारत आणि सोविएत संघराज्य यांच्यामध्ये संघर्ष होण्याचे काहीच कारण नाही. त्यावेळी साम्राज्यवादी राष्ट्रे सोविएत संघराज्य या पहिल्या समाजसत्तावादी राष्ट्राला दुर्बल करण्याचे आणि चिरडून टाकण्याचे प्रयत्न करीत होती. नेहरूंनी असे प्रतिपादन केले की, ब्रिटनच्या लाभासाठी आम्हाला कह्यात ठेवण्यासाठी साम्राज्यवादी खेळामध्ये आमचा प्याद्यासारखा उपयोग केला जाणार नाही, हे त्यांनी आम्हास स्पष्ट केले पाहिजे.

काहीही झाले तरी साम्राज्यवादी युद्धामध्ये भारत ओढला जाऊ नये ही धारणा आणि कोणत्याही परिस्थितीत भारताला त्या युद्धामध्ये सहभागी होण्यास भाग पाडले जाऊ नये ही मागणी १९२७ च्या अखेरीस भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या ठरावात व्यक्त झाली आहे. तो ठराव म्हणजे पहिलाच धोरणविषयक दस्तऐवज होता. त्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची विदेश धोरणाची तत्त्वे अंतर्भूत होती. तदनंतरच्या वर्षी ठरावातील मूलभूत तरतुदींचे काँग्रेस वारंवार प्रतिपादन करीत असे. दुसऱ्या महायुद्ध काळापूर्वी हा ठराव म्हणजे भारताच्या विदेश धोरणाचा प्रमुख आधार बनला होता.

हिटलर सत्तेवर आल्यानंतर, एबिसिनियाच्या जनतेवर फॅसिस्ट इटलीने केलेले आक्रमण आणि स्पेनमधील नागरी युद्ध या घटनांनंतर नेहरूंच्या विदेश धोरणात फॅसिझम आणि नाझीझम यांचा जोरदार धिक्कार करण्यात आला. फॅसिझम हे साम्राज्यवादाचे आणि वंशवादाचे मूर्तिमंत प्रतीक आहे, आणि भारतीय जनतेने त्याच्या विरुद्ध लढावे, असे नेहरूंना वाटत होते.

२२ फेब्रुवारी १९४० रोजी अब्दुल कलम आझाद यांना पाठविलेल्या पत्रात नेहरू यांनी लिहिले होते की, "रशियाला दुर्बल बनविणे" हे ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे नेहमीच धोरण असते. या पत्रात नेहरू पुढे म्हणतात, "म्हणून रशियाच्या बाबतीत असलेल्या

आपला पाठिंबा दर्शविला आणि भावी स्वतंत्र भारताला आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार मान्यता दिली.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये घडलेल्या तदनंतरच्या घटनांनी दाखवून दिले की, कोणत्याही गटात समाविष्ट न होण्याचे नेहरूंचे पक्के धोरण असे गट करणाऱ्यांच्या विरुद्ध आखण्यात आले होते. अशा रीतीने, नेहरू यांचे धोरण निःसंदिग्धपणे साम्राज्यवादविरोधी स्वरूपाचे होते.

आक्रमक गट प्रामुख्याने सिएटो गट स्थापन करण्याच्या साम्राज्यवादी राष्ट्रांच्या धोरणाने भारताला लष्करी धोका निर्माण केला. त्यामुळे नेहरूंना कळून चुकले की, भारताला आपल्या भूतकाळातील वासाहतिक वारशातून मुक्त व्हावयाचे असेल आणि आपल्या आर्थिक मागासलेपणाचे निर्मूलन करावयाचे असेल तर त्यासाठी आवश्यक असलेली शांतता संपादन करण्यासाठी भारताने केवळ एखाद्या गटात सहभागी न होण्याने भागणार नाही. याची जाणीव असल्यामुळे नेहरूंच्या नेतृत्वाखालील भारत सरकारने तटस्थतेच्या धोरणाचा अवलंब करण्याचे ठरविले. तटस्थतेच्या धोरणाचा अर्थ कोणत्याही गटात सामील न होणे, सार्वत्रिक निःशस्त्रीकरणासाठी आणि वसाहतवादाच्या निर्मूलनासाठी साम्राज्यवादी युतीविरुद्ध सक्रिय कार्य करणे. या धोरणाच्या निर्मितीसाठी आणि विशेषतः पुढे आफ्रिका व रशिया यामधील संबंधांचा पाया बनलेली शांततामय सहअस्तित्वाची तत्त्वे आखण्यासाठी नेहरूंनी फार मोठा हातभार लावला होता, हे सर्वज्ञात आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अधिकाधिक देश वासाहतिक अवशेष झिडकारून देऊ लागले तसतसे ते भारताच्या धोरणाचा अवलंब करू लागले. परिणामतः तटस्थतेच्या धोरणाची घोषणा ही वासाहतिक गुलामगिरीतून मुक्त होणाऱ्या प्रत्येक देशाची पहिली विदेश धोरणविषयक कृती होती.

नेहरू हे बांडुंग परिषदेचे एक निमंत्रक आणि संघटक होते. या परिषदेमध्ये आशिया आणि आफ्रिका येथील नवोदित देशांच्या विदेश धोरणाचा मार्ग आखण्यात आला.

असंलग्नतेच्या धोरणापुढे अनेक अडचणी आल्या असल्या तरी ते धोरण नेहरूंच्या हयातीतच कसोटीला उतरले आहे. लोकसभेत बोलताना १३ एप्रिल १९६४ रोजी नेहरूंनी जाहीर केले की, असंलग्नतेचे धोरण भूतकाळात केवळ समर्थनीय ठरले असे नव्हे तर त्याची वाढत्या प्रमाणावर आवश्यकता वाटू लागली आहे. त्या प्रसंगी नेहरूंनी केलेले विधान हे भारताच्या विदेश धोरणाच्या संबंधातील त्यांचे राजकीय मृत्युपत्र होते.

एक अद्वितीय मुत्सद्दी, एक महान पंडित, मानवतावादी आणि तत्त्वज्ञ या नात्यानेच केवळ नव्हे तर असंलग्नतेच्या धोरणाचे शिल्पकार आणि सोविएत संघराज्याचे सच्चे मित्र या नात्यानेही सोविएत जनता नेहरूंचा आदर करते.

जवाहरलाल नेहरू आणि त्यांचे वारस यांनी तयार केलेल्या आणि कार्यवाही केलेल्या भारताच्या विदेश धोरणाचे मूलभूत तत्त्व म्हणजे सोविएत संघराज्य आणि इतर समाज-

सत्तावादी देश यांच्या वरोवर मैत्री. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे सोविएत संघराज्य आणि भारत यांनी ९ ऑगस्ट १९७१ रोजी केलेला शांतता, मैत्री आणि सहकार्याचा करार. या करारामुळे आशिया आणि अखिल जग यामधील शांततेसाठी उभय देशांत परस्परसंबंध आणि निकटचे सहकार्य यांचा आणखी विकास करण्यास नवी संधी उपलब्ध झाली.

सोविएत कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस लिओनिद ब्रेझनेव नोव्हेंबर १९७३ च्या आपल्या भारतभेटीच्या वेळी भाषण करताना म्हणाले, " सोविएत संघराज्य आणि भारत यांच्या प्रतिनिधींनी आपल्या उभय देशांतील संबंधांचे स्वरूप निश्चित ठरवून गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना शांततामय सहअस्तित्वाचे आदर्श उदाहरण असे स्वरूप दिले आहे. हे अगदी विनचूक आहे, विभिन्न समाज असलेल्या दोन शेजारी राष्ट्रांमधील शांतता-मय सहअस्तित्व आहे. हे सहअस्तित्व प्रामाणिक आणि निष्ठावंत आहे. हे सहअस्तित्व प्रेमाने व्यापून गेले असून उभय देशांना उपयुक्त आहे. " २

2. L. I. Brezhnev. Our Course : Peace and Socialism part four. Novosti press Agency Publishing House, Moscow 1974, p. 121.

इवान माइस्की
अकादमिशिएन, ब्रिटनमधील भूतपूर्व
सोविएत राजदूत (१९३३–१९४३)

भारताचे राष्ट्रीय नेते

नेहरू आणि सोविएत नेते यामधील संबंधांविषयी अधिक माहिती उपलब्ध करून घेण्यासाठी भारताला स्वातंत्र्य लाभल्यानंतरच्या काळात आम्ही नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू मेमोरिएल म्युझियमला मदत करण्याची विनंती केली. त्या म्युझियमचे उपसंचालक व्ही. एस्. जोशी यांनी आमच्या मागणीला त्वरित प्रतिसाद दिला आणि आम्हाला ब्रिटनमधील भूतपूर्व सोविएत राजदूत इवान माइस्की यांच्या १० ऑक्टोबर १९३८ च्या पत्राची छायाचित्रित प्रत दिली. त्या पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे आहे :

" प्रिय नेहरू,

आपण सोविएत संघराज्याला अधिकृत भेट देऊ शकत नाही, हे ऐकून वाईट वाटले. कारण त्या भेटीची आपण किती प्रतीक्षा करीत होता हे मला माहीत आहे. आपणांस ही भेट पुढे ढकलण्यास भाग पाडण्यात आले आहे. तथापि, भविष्यकाळात आपणास कधीतरी ही भेट देण्यास वेळ सापडेल, अशी मला आशा वाटते.

" जिनेव्हा येथे आपणास भेटताना मला नेहमीच अतिशय आनंद होत असे. तेथील आपल्या भेटीच्या माझ्या आठवणी ताज्या आहेत. "

" आपली कन्या आणि भगिनी यांच्या प्रकृतीत आता संपूर्ण सुधारणा झालेली नसली तरी बरीच सुधारणा घडून आलेली असेल अशी आशा आहे. "

आय्. माइस्की " [१]

जिनेव्हामधील भेट कोणत्या परिस्थितीत झाली ? नेहरूंनी स्वतः त्याचा काहीही उल्लेख केलेला नाही. त्यांनी आपल्या **आत्मचरित्रात** सोविएत संघराज्याला भेट देण्याच्या आपल्या इच्छेसंबंधी किंवा या संदर्भात इवान माइस्कीबरोबर झालेल्या भेटीचा त्यांनी काहीही उल्लेख केलेला नाही. इवान माइस्की यांना भेटून त्यांच्याकडून खुलासा करून घेण्याशिवाय मार्ग नाही.

१ A Bunch of Old Letters, Bombay 1958. p. 291.

मी अकादमिशियन इवान माइस्की यांना त्यांच्या मॉस्को येथील निवासस्थानी भेटलो. त्या भेटीसंबंधीचा वृत्तान्त पुढे देत आहे :

नेहरूंची माझी स्वित्झर्लंड येथे भेट कशी झाली, याचे मी स्मरण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यावेळी मी सोविएतचा ब्रिटनमधील राजदूत होतो. मी आणि नेहरू यांचे संबंध जोडून आणण्याचे कार्य नेहरूंचे एक मित्र व्ही. के. कृष्ण मेनन यांनी केले. मी कृष्ण मेनन यांना वारंवार भेटून त्यांच्याशी भारताचे सार्वजनिक नेते, व राजकारणी आणि सोविएत संघराज्य यांमधील संबंध यासह सर्व प्रश्नांवर चर्चा करीत असे. माझा नेहरूंबरोबरचा सर्व पत्रव्यवहार कृष्ण मेनन सांभाळीत असत. खरे म्हणजे, जवळ जवळ चाळीस वर्षांनंतर आमच्या पत्रांचा आशय स्मरणातून सांगणे सोपी गोष्ट नाही. नेहरूंनी सोविएत संघ राज्याला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि त्या संकल्पित भेटीसाठी मी सर्व व्यवस्था केली होती, एवढे मला आठवते. परंतु काही विशिष्ट परिस्थितीमुळे आणि आम्हास नियंत्रण करता येणार नाही अशा अडचणीमुळे नेहरूंनी ती भेट दिलीच नाही. तुमच्या जवळ त्या पत्राची प्रत आहे, ते पत्र ही भेट रद्द झाल्याच्या संदर्भात आहे.

ब्रिटनमधील सोविएत राजदूत या नात्याने मी जिनेव्हाला वारंवार भेट देत असे. तेथेच माझ्या नेहरूंशी अनेक भेटी झाल्या. त्या भेटींचा माझ्यावर फार मोठा प्रभाव पडला. त्या वेळी नेहरूंनी सोविएत संघराज्याबरोबर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यास आणि उभय देशांमधील सबंध सुधारण्यासाठी बरेच परिश्रम घेतले. त्याकाळी भारत आणि सोविएत संघराज्य यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे अधिकृत संबंध अस्तित्वात नसल्यामुळे आणि भारत आणि सोविएत संघराज्य यांच्यामधील संबंधांना प्रतिबंध करण्यासाठी ब्रिटिश अधिकारी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असल्यामुळे ही गोष्ट किती अवघड होती, याची कल्पना करता येईल.

मला पुढील गोष्ट आठवते. सोविएत विदेशव्यापार प्रतिनिधिमंडळामार्फत एका भारतीय कंपनीने सोविएत निर्मित टेक्स्टाईल मशिन खरेदी केली होती. त्या यंत्राची जुळणी करण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी एक सोविएत अभियंता भारतात पाठवावयाचा होता. मात्र तो भारतात पोहोचू शकला नाही. त्या भारतीय कंपनीने केलेल्या विनंतीला आणि आमच्या सूचनेला ब्रिटिश अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही आणि आमच्या अभियंत्याला प्रवेशाचा व्हिसा नाकारला. ब्रिटिश वसाहतवादी प्रशासनाने प्रत्येक वेळी नेहरूंना अडथळे केले यात शंका नाही. धोका बाजूला सारून नेहरूंनी युरोपातील डाव्या शक्तीशी संबंध प्रस्थापित केले इतकेच नव्हे तर सोविएत मुत्सद्यांबरोबर संबंध प्रस्थापित करण्यापर्यंत मजल गाठली.

नेहरूंसारख्या एका थोर व्यक्तीला भेटण्याचे भाग्य मला लाभले होते. ते एक अद्वितीय नेते आणि सच्चे भारतीय नेते होते. त्यांना युरोपातील आणि आशियातील राजकीय शक्तींच्या रचना आणि लढा यांची माहिती होती. त्याकाळी आपल्या देशात असलेल्या विलक्षण बिकट परिस्थितीची त्यांना संपूर्ण जाणीव होती. रशियन जनतेबरोबर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याची त्यांची उत्कट इच्छा होती. सोविएत संघराज्याला पुनः भेट

द्यावी आणि १९२७ साली सोविएत संघराज्याला प्रथम भेट दिल्यानंतर तेथे घडून आलेले बदल पाहण्याची इच्छा त्यांनी माझ्याशी बोलताना वारंवार व्यक्त केली होती. रशियन जनता आणि भारतीय जनता यांच्यामध्ये बऱ्याच बाबतीत साम्य आहे आणि महान जनतेप्रमाणे त्यांनी परस्पर मैत्रीने आणि शांततेने राहावे, असे नेहरू यांना वाटत होते.

पावेल येर्झिन
१९४७ साली भारतात असलेले
सोविएतचे चार्ज दी अफेअर्स

मैत्रीचा पाया

१४ आणि १५ ऑगस्ट १९४७ ची रात्र भारतीय इतिहासात उल्लेखनीय आहे. त्या रात्री भारत स्वतंत्र झाला.

भारत आणि सोविएत संघराज्य आणि इतर समाजसत्तावादी राष्ट्रे यांमधील मैत्री आणि सहकार्य नवोदित भारताचे स्थान आंतरराष्ट्रीय पटावर भक्कम करण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते.

ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी निर्माण केलेले अडथळे नाहीसे होण्याबरोबर भारत आणि सोविएत संघराज्य यांच्यामध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. असे संबंध प्रस्थापित करण्यासाठी उभय देशांनी घेतलेल्या प्रयत्नांबद्दल धन्यवाद.

भारताचे सोविएत संघराज्यामधील पहिले राजदूत म्हणून नेहरूंच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित यांची नेमणूक करण्यात आली. भारतातील सोविएतचे पहिले राजदूत म्हणून एक ख्यातनाम मुत्सद्दी के. व्ही. नोविकोव यांची नेमणूक झाली. त्यांनी नोव्हेंबर १९४७ मध्ये आपल्या पदाची सूत्रे हाती घेतली.

भारतातील सोविएत दूतावासाच्या उद्घाटनास उपस्थित राहण्याची आणि सतत पाच वर्षे भारताच्या विविध क्षेत्रांतील ख्यातनाम व्यक्तींना व नेत्यांना भेटण्याची संधी लाभणे सुदैवाची गोष्ट होय.

भारतामध्ये सोविएत दूतांचे आगमन होण्याच्या एक महिना आधी मी नवी दिल्ली येथे पोहोचलो. आवश्यक ती सर्व व्यवस्था करणे आणि दूतावासाची योग्य इमारत शोधणे ही कामगिरी माझ्यावर सोपविण्यात आली होती. मला भारतीय सरकारी अधिकाऱ्यांनी साहाय्य केले.

नवी दिल्ली येथील माझ्या आगमनाच्या दुसऱ्या दिवशी माझे जवाहरलाल नेहरूंनी स्वागत केले. भारत सरकारने सोविएत दूतावासासाठी योग्य इमारत पाहिली असल्याची आणि अधिक जागा नंतर पाहण्यात येईल अशी माहिती त्यांनी मला दिली. भूतपूर्व त्रावणकोर संस्थानाच्या प्रतिनिधीच्या दिल्ली येथील निवासाची इमारत सोविएत दूतावासासाठी देण्यात आली होती, हे पाहून राजदूत नोविकोव अतिशय खूष झाले. ही इमारत दिल्लीमधील अतिशय सुंदर इमारतींपैकी एक होती.

भारताच्या स्वातंत्र्याच्या अगदी सुरुवातीच्या काळात राजनैतिक शिष्टाचारांना काटेकोरपणाचे स्वरूप देण्यात आलेले नव्हते आणि नेहरू पंतप्रधान या नात्याने दूतावासाकडून अथवा राष्ट्रीय संघटनांकडून आयोजित केल्या जाणाऱ्या प्रत्येक स्वागत समारंभाला उपस्थित राहात असत. त्याखेरीज एखाद्या शास्त्रीय संशोधन संस्थेचा अथवा शैक्षणिक संस्थेचा असे पायाभरणी समारंभ जवळजवळ रोजच आयोजित केलेले असत. अशा समारंभांना नेहरू उपस्थित राहात आणि छोटेसे भाषण करीत. त्यामुळे त्यांच्याशी आमची अनेक वेळा औपचारिक भेट होत असे. सोविएत मुत्सद्यांना भेटून सोविएत दूतावासाचे कार्य कसे काय चालू आहे आणि सोविएत दूतावासाला काही अडचणी आहेत किंवा काय असे विचारण्यास नेहरू आले नाहीत, असा एकही प्रसंग मला आठवत नाही. सोविएत दूतावासातील प्रत्येक स्वागत समारंभाला नेहरू उपस्थित राहात असत आणि भारतात येणाऱ्या सोविएत प्रतिनिधिमंडळाचे ते व्यक्तिशः स्वागत करीत असत.

भारतातील नागरिकांना सोविएत संघराज्याबद्दल किती आस्था वाटते, हे पाहण्याची संधी सोविएत दूतावासाच्या कर्मचाऱ्यांना दिल्ली येथे येताक्षणीच पाहावयास मिळाली. सोविएत मुत्सद्यांचे दिल्ली येथे आगमन झाले अशी बातमी स्थानिक वृत्तपत्रात येताच भारताच्या सर्व कानाकोपऱ्यांतून सोविएत दूतावासात पत्रे येऊ लागली. आपल्या उभय देशांत प्रस्थापित झालेल्या राजनैतिक संबंधाचे त्या पत्रांमधून स्वागत करण्यात आले होते आणि सोविएत जनतेला समाजसत्तावादी उभारणीत यश लाभावे अशी इच्छा व्यक्त करण्यात आली होती. सोविएत चित्रपट, आणि सोविएत जीवनासंबंधी माहिती देणारी छायाचित्रे, पुस्तके यांची मागणी अनेक पत्रांमधून करण्यात आलेली होती.

सोविएत संघराज्य आणि भारत यांमधील संबंध हळूहळू विकसित होत होते. सुरुवातीला वस्तुविनिमयासंबंधी करार करण्यात आले. सोविएतकडून खते, वृत्तपत्रीय कागद आणि काही प्रकारची यंत्रसामग्री भारताकडे पाठविण्यात येत होती. तर भारताकडून चहा, कापूस, ज्यूट आणि पारंपरिक निर्यात वस्तू सोविएतला निर्यात केल्या जात होत्या.

१९५५ च्या उन्हाळ्यात जवाहरलाल नेहरूंनी सोविएत संघराज्याला अधिकृत भेट दिली त्यावेळी भारत आणि सोविएत संघराज्य यांच्यामध्ये कायम पायावर आधारित स्थिर संबंध प्रस्थापित करण्यात आले. तेव्हापासून उभय देशांच्या सरकारी प्रतिनिधींच्या परस्परांच्या देशांना भेटी हे सोविएत-भारत संबंधाचे एक स्वरूप बनले आहे.

मिखाएल मेन्शिकोव
१९५३–५७ या काळात भारतात
असलेले सोविएत राजदूत.

नेहरूंशी भेट

भारतातील सोविएत राजदूत म्हणून मी १९५३ साली पदाची सूत्रे हाती घेतली. दिल्लीला जाणारे माझे विमान मुंबई येथे थोडा वेळ थांबले असता माझी भारतीयांशी, इस्कसच्या पदाधिकाऱ्यांशी पहिली भेट झाली. त्या वेळी व्यक्त करण्यात आलेल्या हार्दिक शुभेच्छा, हस्तांदोलने आणि पुष्पहारांचा वर्षाव अद्यापि माझ्या स्मरणात आहे.

एकदा दिल्लीमध्ये जवाहरलाल नेहरू यांची भेट घेतली. त्यावेळी ते भारताचे पंतप्रधान आणि विदेशमंत्री होते. मी त्यांच्या अभ्यासिकेत प्रवेश करताच नेहरू आपल्या आसनावरून उठले आणि आम्ही हार्दिक हस्तांदोलन केले.

भारतातील पूरग्रस्तांच्या साहाय्यार्थ सोविएत रेड क्रॉस संस्था आणि रेड क्रेसेन्ट संस्था यांच्या कार्यकारिणीच्या वतीने नेहरूंना २५०,००० रुबल्सचा चेक देण्याची सूचना मला देण्यात आली होती. चेकचा स्वीकार करताना नेहरूंनी कृतज्ञता व्यक्त केली आणि ते पुढे म्हणाले की, दर वर्षी येणारे दुष्काळ, पूर आणि अधूनमधून उद्‌भवणारी वादळे आणि धरणीकंप यांमुळे भारताची परिस्थिती अधिकच दारुण झाली आहे. ते म्हणाले, भारत सरकारला समस्येच्या स्वरूपाची जाणीव आहे; परंतु नैसर्गिक आपत्तींना सक्रियपणे तोंड देण्यासाठी पुरेशी साधनसामग्री उपलब्ध नाही.

नेहरूंनी मला भारताचा दौरा करण्याचा सल्ला दिला. ते स्मितहास्य करीत म्हणाले, माझ्यासह अनेकांनी भारतासंबंधी लिहिले आहे. परंतु स्वतः देश पाहणे आणि लोकांना भेटणे उत्तम.

मी नेहरूंचा सल्ला मानला आणि त्यांना धन्यवाद दिले. "माझ्या" भारतामध्ये मला अमर्याद सौंदर्य पाहावयास सापडले आणि अतिशय परिश्रम करणारे व आदरातिथ्यशील लोक आढळले.

भारताला स्वातंत्र्य देण्याचे ज्या साम्राज्यवाद्यांनी नाकारले होते ते साम्राज्यवादी त्याकाळी भारताच्या आर्थिक अडचणींचा फायदा घेऊन भारतावर आपले वर्चस्व पुनः प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होते. आपल्या देशाच्या स्वतंत्र विदेश-धोरणाचा एक प्रमुख भाग म्हणून नेहरू सोविएत संघराज्याकडे मित्रत्वाने पाहात होते.

आपल्या उभय देशांतील मैत्रीपूर्ण संबंध दरवर्षी विस्तारत आहेत. माझ्या पहिल्या

नेहरू-भेटीनंतर सुमारे सहा महिन्यांनी डिसेंबर १९५३ मध्ये भारत आणि सोविएत संघ राज्य यांच्यामध्ये पाच वर्षांच्या मुदतीसाठी पहिला व्यापारी करार झाला. तद्नंतर भिलाई येथे भारताचा पहिला पोलाद कारखाना उभारण्यासाठी, अवजड अभियांत्रिकी कारखाना उभारण्यासाठी, खाणकामाची उपकरणे तयार करणारा कारखाना उभारण्यासाठी, दृक्साधक काचा तयार करणारा कारखाना उभारण्यासाठी आणि कोर्बा कोळसा विभागात कोळसा खाण उभारण्यासाठी साहाय्य देण्यासाठी करार करण्यात आले. सुरतगढ येथे भारतातील पहिले सरकारी शेत उभारण्यासाठी आणि नेवेली येथे औष्णिक केंद्र उभारण्यासाठी करार करण्यात आले. भूस्तरशास्त्रीय पाहणी करण्यासाठी आणि तेल-उत्पादन करण्यासाठी सोविएत विशेषज्ञ भारतीय विशेषज्ञांना मदत करीत आहेत. भारत आणि सोविएत संघराज्य यांच्यामध्ये नियमित हवाई व जलवाहतूक सुरू झाली आहे. या सर्व व्यवहारांत नेहरूंनी वैयक्तिक लक्ष घातले आणि योग्य वाटाघाटींकडे लक्ष पुरविले आणि काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांचे निर्मूलन केले.

त्या वर्षी आपल्या उभय देशांतील पहिला शास्त्रीय व सांस्कृतिक विनिमय सुरू झाला. अनेक सोविएत प्रतिनिधी मंडळे भारतात आली. सोविएत संघराज्याच्या समाजसत्तावादी उभारणीच्या यशःसिद्धीचे दर्शन घडविणारी अनेक प्रदर्शने आयोजित करण्यात आली. भारतानेही सोविएत संघराज्यात अशाच प्रकारची प्रदर्शने आयोजित केली. अशा विनिमयाचे नेहरूंनी सर्व प्रकारे स्वागत केले. भारताला भेट देणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधी मंडळाचे ते स्वागत करीत असत, यावरून याची साक्ष पटते.

सोविएत संघराज्याबरोबरील मैत्रीपूर्ण संबंधाच्या नेहरू यांच्या धोरणामुळे भारतातील काही विशिष्ट गटांकडून निर्माण केल्या जाणाऱ्या गैरसमजाला आणि विरोधाला नेहरूंना तोंड द्यावे लागले, याचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. भारत आणि सोविएत संघराज्य यांच्यामध्ये व्यापक प्रमाणावर अधिष्ठित समेटाच्या भावनेसंबंधी काही लोक संशय व्यक्त करीत होते. यासंबंधी ते उघड विरोध करीत असत. सरकारमधील आपल्या सहकाऱ्यांच्या युक्तिवादाकडे नेहरू दक्षतेने लक्ष पुरवीत आणि विधायक टीकेचा व सूचनांचा स्वीकार करीत असत. तथापि सोविएत संघराज्याबरोबरील भारताच्या संबंधाबद्दल त्यांची भूमिका ठाम होती. आपल्या स्वतःच्या देखरेखीखाली त्यांनी भारत-सोविएत संबंधाचा घनिष्ट विकास होण्यासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी केली. सोविएत संघराज्याबरोबरील संबंधांचा विकास रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे प्रयत्न त्यांनी हाणून पाडले.

सोविएत संघराज्याबरोबरील मैत्री दृढ करण्यासाठी आणि भारताच्या विकासासाठी समाजसत्तावादी मार्ग अनुसरण्यासाठी नेहरू सातत्याने प्रयत्न करीत आहेत, असे भारताचे भूतपूर्व उपराष्ट्रपती डॉ. एस्. राधाकृष्णन वारंवार म्हणत असत.

नेहरूंचे लहान मुलांवर फार प्रेम होते. त्या प्रेमाची परतफेड करण्यात आली आहे. १४ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिन भारतात बालकदिन म्हणून साजरा केला जातो. त्या

दिवशी भारतातील मुलांना सुट्टी असते. आंतरराष्ट्रीय चित्रकला प्रदर्शनातील विजेत्या सोविएत मुला-मुलींची पारितोषिके नेहरूंनी माझ्या हाती दिली आहेत.

नेहरूंना सौंदर्याची चांगलीच जाण होती. त्यांचे निसर्गावर प्रेम होते. त्यांच्या सांस्कृतिक अभिरुचीमध्ये विविधता होती. विशेषतः त्यांना राष्ट्रीय नृत्ये आणि शास्त्रीय संगीत फार आवडे. भारताच्या दौऱ्यावर असलेल्या सोविएत बॅले पथकाचा कार्यक्रम ते सहसा चुकवीत नसत.

भारतातील माझ्या चार वर्षांच्या काळात सोविएतचा राजनैतिक प्रतिनिधी म्हणून नेहरूंना व्यक्तिशः माझ्याबद्दल फार आस्था वाटत असे. कधी तातडीचे काम निघाल्यास नेहरू विनाविलंब मला भेटायची संधी देत असत. मग ती वेळ दिवसाची असो वा रात्रीची असो. एखादा अहवाल ऐकल्यावर अथवा वाचल्यावर नेहरू आपले मत त्वरित देत असत किंवा आपला दृष्टिकोण व्यक्त करीत असत.

नेहरूंची कार्यक्षमता विलक्षण होती. ते दिवसाचे १७–१८ तास काम करीत असत. ते कधीही सुट्टी घेत नसत. मी त्यांना एकदा विचारले, "पंतप्रधान महाशय, आपल्या प्रकृतीकडे इतके दुर्लक्ष करणे चांगले काय?" नेहरूंनी विनोदाने उत्तर दिले की, "काम जर स्वारस्यपूर्ण असेल तर ते करीत असतानाच आराम मिळतो." त्यांचे काम नेहमीच स्वारस्यपूर्ण असे. नेहरू अखेरपर्यंत स्वतःशी प्रामाणिक राहिले आणि आपल्या जीवनाच्या अखेरच्या घटकेपर्यंत ते सक्रियपणे काम करीत राहिले.

ईवान बेनेदिक्तोव
सोविएत संघराज्याचे
१९५८ ते १९६७ पर्यंत भारतातील राजदूत
सोविएत-भारत सांस्कृतिक संबंध समाजाचे उपाध्यक्ष.

भारताचे सुपुत्र

भारतीय प्रजासत्ताकात सोविएत राजदूत म्हणून मी काम केले, त्या काळात नेहरूंना औपचारिक रीत्या भेटून त्यांच्याशी प्रमुख राजकीय प्रश्नांवर चर्चा करण्याची तसेच अनौपचारिक रीत्याही त्यांच्या निवासस्थानी भेटण्याची मला संधी लाभली.

या प्रथितयश राजकारणपटूच्या राजकीय चातुर्याने मी प्रत्येक वेळी अगदी थक्क होऊन गेलो. ते तेवढेच विनयशीलही होते. नेहरूंची निरीक्षणशक्ती दांडगी होती. त्यांना मार्मिक विनोदबुद्धीची देणगी लाभली होती, तसेच त्यांना मुले फार आवडत असत. त्यांच्या सदऱ्याच्या बटनावर ते लाल गुलाबाचे फूल लावीत असत ते जणू काय त्यांच्या निसर्ग-प्रेमाचेच प्रतीक होते.

नेहरू यांना आपल्या लोकांबद्दल व देशाबद्दल नितांत प्रेम होते. वासाहतिक छळवणुकीपासून मुक्तता करण्यासाठी आणि नवजात भारतीय प्रजासत्ताकाचे राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य दृढ करण्यासाठी चाललेल्या भारतीय जनतेच्या लढ्याला त्यांनी आपले सारे जीवन अर्पण केले.

विविध औद्योगिक प्रकल्पांच्या व धरणांच्या, शाळांच्या व प्रयोगशाळांच्या कोनशिला बसविण्यासाठी अथवा वैज्ञानिक संशोधन केंद्राचे व पाणीपुरवठा योजनांचे उदघाटन करण्याच्या निमित्ताने नेहरू वारंवार देशभर दौरे करीत असत. त्यांच्या त्या दौऱ्यांतून आपल्या जनतेबद्दलचे त्यांचे प्रेम प्रकर्षाने दिसून येत असे. या दौऱ्यांच्या काळात नेहरू आपल्या हजारो देशबांधवांना भेटून त्यांच्याशी उघड चर्चा करीत असत. त्यांच्या देशबांधवांना त्यांच्याबद्दल अत्यंत आदर व प्रेम होते.

नेहरू जात्याच फार समर्थ व चतुर होते; तसेच ते फार कार्यक्षम होते. त्यामुळे ते भारतीय समाजातील गुंतागुंतीच्या प्रक्रियांचे योग्य प्रकारे आकलन करू शकले. रशियातील महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीच्या यशःसिद्धीचा ते फार गौरव करीत असत. समाजसत्तावादी समाजाची उभारणी करण्याच्या सोविएत जनतेच्या शौर्यशाली प्रयत्नांकडे ते बारकाईने पाहात असत व त्याबद्दल त्यांच्या मनात अत्यंत सहानुभूती होती. भावी कालाबद्दल आशा निर्माण झाली ती मुख्यत्वे सोविएत रशियामुळे व जगासाठी त्याने जे काही

केले आहे त्यामुळे, असे त्यांनी लिहून ठेवले आहे.

भारत व सोविएत संघराज्य यांच्या दरम्यानच्या मैत्री-सहकार्याला चालना मिळण्याला नेहरू कारणीभूत झाले. अवजड उद्योगधंद्यांच्या प्रमुख राष्ट्रीय विभागांचा व शक्तीच्या साठ्यांचा विकास केला तरच भारताला खरेखुरे आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करता येईल ही गोष्ट नेहरूंना चांगली ठाऊक होती. त्यामुळे त्यांनी लोह-पोलाद व अवजड अभियांत्रिकी कारखान्यांचा, कोळसा व तेल-उत्पादक उद्योगिकांचा व विद्युत केंद्रांचा विकास करण्याच्या कामी सोविएत संघराज्याशी सहकार्य करण्याला फार महत्त्व दिले.

राष्ट्राराष्ट्रांदरम्यानच्या परस्पर समजुतीच्या व विश्वासाच्या उद्दिष्टाचा आणि शांततामय सहअस्तित्वाच्या व असंलग्नतेच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या उद्दिष्टाचा सातत्याने पुरस्कार करणारे दूरदृष्टीचे राजकारणपटू म्हणून सोविएत जनता नेहरूंना ओळखते. देशातील विशिष्ट सामाजिक पद्धतीचा विचार न करता सर्व देशांशी चांगले संबंध विकसित केले, तरच भारताला आपले स्वातंत्र्य राखता येईल असे त्यांनी वारंवार भर देऊन सांगितले. असंलग्नतेच्या धोरणामुळे सोविएत संघराज्याला भारताचे संपूर्णतया आकलन झाले व त्याने भारताला पाठिंबा दिला. नेहरूच या धोरणाचे शिल्पकार होते.

तणाव शिथिलता, आशियाई सामुदायिक सुरक्षितता, सर्वसाधारण व संपूर्ण निःशस्त्रीकरण, वसाहतवादाचे व वंशविद्वेषाचे अवशेष नष्ट करणे, वगैरे, आजच्या काळातील महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत स्वतः नेहरूंच्या सहकार्याने तयार करण्यात आलेले भारताचे धोरण अनेक बाबतीत या प्रश्नांबाबतच्या सोविएत संघराज्याच्या धोरणाशी मिळतेजुळते अथवा अत्यंत जवळचे आहे. म्हणून, आम्हाला खात्री वाटते की, नेहरूंनी वारसा म्हणून मागे ठेवलेल्या भारत-सोविएत मैत्रीच्या व सर्वांगीण सहकार्याच्या धोरणाचा विकास होईल व जसजसा काळ जाईल तसतसे ते अधिक भक्कम होईल, आणि जागतिक शांतता, सामाजिक न्याय व प्रगतीच्या उद्दिष्टांबद्दल कळकळ असलेल्या लोकांच्या मनःपटलावर त्यांचे नाव कायमचे कोरले जाईल.

३

नेहरू व सोविएत-भारत आर्थिक सहकार्य

" सोविएत संघराज्यावरोवरच्या आपल्या मैत्री-सहकार्यामुळे आम्हास खूप साहाय्य झाले आहे यात काही संशय नाही. ते केवळ आमच्या आर्थिक व सांस्कृतिक विकासाच्या क्षेत्रातच नव्हे. या मैत्रीमुळे आमची क्षितिजे अधिक विस्तृत झाली आहेत; जगात जे जे काही सर्व घडत आहे, त्याचे अधिक चांगल्या प्रकारे आकलन होण्यास आम्हास साहाय्य झाले आहे. विशेषतः सोविएत संघराज्याने भारताला केलेल्या वैज्ञानिक व आर्थिक साहाय्याचे आम्ही स्वागत करतो...सोविएत जनतेच्या भारताबद्दलच्या हार्दिक भावना अत्यंत मोलाच्या आहेत असे आम्ही समजतो. "

भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जानेवारी १९६३ मध्ये प्रावदा च्या वार्ताहराला दिलेल्या मुलाखतीवरून (सोविएत लॅन्ड, क्र. २२, १९६४.)

देशाच्या विकासाची समस्त जनतेच्या हिताच्या दृष्टीने देशाशी सुसंगती साधली नसेल व तो विकास देशाच्या मार्गदर्शनाने करण्यात येत नसेल, तर कोणत्याही देशाची व विशेषतः भारताची आधुनिक जगात आर्थिक व सामाजिक प्रगती घडून येणे अशक्य आहे ही गोष्ट भारताच्या राष्ट्रीय मुक्ती चळवळीच्या नेत्यांपैकी नेहरूंना प्रथम कळून चुकली होती.

भारतीय अर्थव्यवस्थेत सरकारी विभागाचा उदय झाला याचे कारण शासनाने उद्योगधंद्याचा संघटक या नात्याने वाढत्या प्रमाणावर कार्य करावे, शासनाने आपल्या नियोजन संस्थेद्वारे आर्थिक विकासाच्या अत्यंत महत्त्वाच्या शिखरांचे नियमन करावे, मालाच्या व सेवांच्या वितरणामध्ये तसेच देशातील बहुजन समाजाला सामाजिक व आर्थिक न्याय प्राप्त करून देण्याच्या कामी शासनाने निर्णायक भूमिका वठवावी अशी नेहरूंची निष्ठा होती.

१९३० ते १९३४ च्या दरम्यान नेहरूंनी तुरुंगाच्या कोठडीतून आपल्या मुलीला, इंदिरेला लिहिलेली सुप्रसिद्ध पत्रे वस्तुतः भारतीय जनतेलाच उद्देशून लिहिली होती. त्या

पत्रांवरून असे दिसते की, भारताला आर्थिक नियोजन लागू करणे शक्य आहे असे जोरदारपणे प्रतिपादन करणारे नेहरू हेच पहिले भारतीय असावेत.

दिनांक ९ जुलै १९३३ च्या पत्रात नेहरूंनी लिहिले होते, " पंचवार्षिक योजनेने रशियाचा चेहरामोहरा पार बदलून टाकला आहे. सरंजामदारी पद्धतीचा तो देश एकाएकी प्रगत औद्योगिक देश बनला. तेथे विलक्षण प्रमाणात सांस्कृतिक प्रगती घडून आली आहे; तेथील सामाजिक सेवा-संस्था, सामाजिक आरोग्यपद्धती व अपघात-विमा पद्धती जगात सर्वसमावेशक प्रगत समजल्या जातात. तेथील परिस्थिती फार चांगली नाही व तेथे तुटवडा आहे ही गोष्ट खरी असली, तरी इतर देशांतील कामगारांच्या डोक्यावर टांगती असलेली बेकारी व उपासमार या गोष्टी गेल्या आहेत." [१] नेहरूंनी पुढे म्हटले आहे, " पंचवार्षिक योजनेच्या यशस्वितेबद्दलच्या वादात काहीच तथ्य नाही. सोविएत संघराज्याची सध्याची अवस्था हे त्याला खरे उत्तर आहे. त्याचे आणखी उत्तर म्हणजे या योजनेने जगाच्या कल्पनाशक्तीवर आपला प्रभाव पाडला आहे ही वस्तुस्थिती आहे. आता प्रत्येकजण 'नियोजना'ची तसेच पंचवार्षिक, दशवार्षिक, व त्रैवार्षिक योजनांची भाषा करतो. सोविएतांनी जगात जादू भरून टाकली आहे" [२] सोविएत संघराज्याच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या फलिताचे विश्लेषण नेहरूंनी या शब्दांत सारांशरूपाने सांगितले आहे.

नेहरूंनी अनेक देशांच्या आर्थिक विकासाचा काळजीपूर्वक अभ्यास केला. त्यामुळे ते असा निष्कर्ष काढू शकले की, भारताला आपले कष्टाने मिळविलेले राष्ट्रीय स्वातंत्र्य बळकट करायचे असेल व ठाम आर्थिक व सामाजिक प्रगतीचा पाया घालायचा असेल, तर त्याने आधुनिक राष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या विकासाला प्रथम प्राधान्य द्यायला हवे. दुसरी गोष्ट अशी की, नेहरू जेव्हा राष्ट्रीय उद्योगधंद्याबाबत बोलत, त्या वेळी त्यांना सर्वप्रथम अवजड उद्योगधंदा अभिप्रेत होता. या संदर्भात, नेहरूंनी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या संदर्भात राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीत केलेली भाषणे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. नेहरू म्हणाले, " भारताचे औद्योगिकीकरण करून त्याचा विकास करण्याची आपली इच्छा असेल—आणि आपला तो हेतू आहे—तर आपण भारताचे खरोखरीच औद्योगिकीकरण करणे अत्यावश्यक आहे...औद्योगिक भारताचा इमला उभारण्यासाठी आपण मुळे रुजवून पाया घालणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे अवजड उद्योगधंद्याचा विकास करण्याला आपण प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे." [३]

देशाच्या आर्थिक विकासाचा पाया म्हणून राष्ट्रीय अवजड उद्योगधंद्यांचा विकास करणे हे नेहरूंनी तयार केलेल्या व अमलात आणलेल्या योजनाबद्ध आर्थिक विकासाचे एक मूलभूत

१. 'ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी', लंडन, १९४९, पाने ८५६–८५७.
२. ,, ,, ,, ,, पान ८५७.
३. 'कॉमर्स मुंबई', २८ जानेवारी १९५६, पान १५८.

तत्त्व होते. औद्योगिकीकरण हे सामर्थ्यशाली शक्तीच्या पायावर आधारलेले असायला हवे याबद्दल नेहरूंची खात्री झाली होती. त्यामुळे, विद्युतनिर्मितीविषयक सुविधांचा विकास करण्याला प्राधान्य देण्यात आले.

आर्थिक सामर्थ्याचा विचार केल्यास आज भारताची प्रमुख अशा दहा देशांत गणना होते. सध्या भारतापाशी अद्ययावत जलविद्युत व औष्णिक विद्युत केंद्रे आहेत, मोठी लोह-पोलाद संकुले आहेत, कार्यक्षम असे अवजड अभियांत्रिकी कारखाने आहेत, आण्विक री-ॲक्टर व इलेक्ट्रॉनिक उद्योगधंदाही आहे. प्रामुख्याने समाजसत्तावादी देशांशी, आणि सर्व-प्रथम म्हणजे सोविएत संघराज्याशी निकट आर्थिक, वैज्ञानिक व तंत्रशास्त्रीय सहकार्य केल्यामुळे भारत हे साध्य करू शकला. त्या देशांनी सहकारी मालकीच्या औद्योगिक कारखान्यांच्या विकासासाठी मदत देण्यावर भर दिला. ७० हून अधिक प्रकल्प अस्तिवात आले हे या सहकार्याच्या परिणामकपणाचे एक ठळक उदाहरण आहे. त्यांपैकी पन्नासाहून अधिक प्रकल्प भारत-सोविएत आर्थिक सहकार्याच्या क्रमात सुरूही झाले आहेत.

तथापि, भारताच्या औद्योगिक व कृषिविकासाच्या आड येणारे काही प्रश्न अद्याप सोडवायचे राहिले आहेत. पक्षपात न करता निरीक्षकाच्या दृष्टीने पाहिल्यास, ही गोष्ट अगदी स्पष्ट दिसून येईल की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारताने त्या अगोदरच्या दोन शतकांच्या काळापेक्षा अधिक प्रगती केली आहे.

२ फेब्रुवारी १९५५ रोजी दिल्ली येथे उभय देशांच्या सरकारांच्या दरम्यान संबंधित करार झाला आणि अशा प्रकारे भारत व सोविएत संघराज्य यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्य सुरू झाले. त्या करारानुसार, भिलाई येथे १,०००,००० टन वार्षिक क्षमतेचा पोलाद कारखाना उभारण्यात येणार होता. समृद्ध व भरभराटीला आलेल्या औद्योगिक भारताच्या भावी काळाचे स्पष्ट चित्र नेहरूंना दिसत होते व त्यांचा तसा पक्का विश्वास होता आणि त्याच्या जोडीला सोविएत संघराज्य आपल्या मित्रवत शेजाऱ्याला साहाय्य करायला तयार होते, त्यामुळेच भिलाई कारखान्याची उभारणी करण्याबाबतचा निर्णय घेणे शक्य झाले.

पोलाद व बीज हा कोणत्याही देशाच्या औद्योगिक विकासाचा पाया असतो असे नेहरूंचे मत होते आणि ते अगदी बरोबर होते. भारताला आपले राजकीय स्वातंत्र्य व स्वाधीनता, आणि खरे म्हणजे आपले राष्ट्रीयत्व टिकवून ठेवायचे असेल, तर त्याने आर्थिक आत्मनिर्भरता साध्य करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणे आवश्यक आहे ही गोष्ट त्यांनी वारंवार भर देऊन सांगितली.

नेहरू भिलाईनगराला वरचेवर भेटी देऊन भिलाई प्रकल्पाच्या प्रगतीचा ते अगदी जवळून मागोवा घेत असत. डिसेंबर १९५७ मध्ये भिलाईचे उभारणीकार्य नुकतेच सुरू झाले होते, त्यावेळी नेहरूंनी भिलाईला प्रथम भेट दिली.

त्यानंतर दोन वर्षांनी बिलेट मिल सुरू झाली. त्या प्रसंगी नेहरूंनी पाठविलेल्या अभिवादनपर संदेशात त्यांनी म्हटले होते, " भिलाई कारखान्याची ही अखंड प्रगती उत्साह-

जनक असून सोविएत व भारतीय अभियंत्यांमधील सहकार्याचे ते एक आनंददायक प्रतीक आहे. यांपैकी बऱ्याच अभियंत्यांनी सोविएत संघराज्यात प्रशिक्षण घेतले असून या विविध गिरण्या चालविण्याचे कार्य ते करणार आहेत. भिलाई पोलाद कारखान्याच्या सर्व अधिकाऱ्यांचे, आणि विशेषतः सोविएत व भारतीय अभियंत्यांचे त्यांनी हा प्रकल्प यशस्वी केल्याबद्दल मी अभिनंदन करतो."[४]

ऑक्टोबर १९६० मध्ये रेलमार्ग व पोलादी सांगाडे तयार करण्याची पोलाद गिरणी सुरू करण्यात आली, त्या वेळी नेहरूंनी दुसऱ्यांदा भिलाईला भेट दिली. त्या प्रसंगी एका मेळाव्यासमोर भाषण करताना नेहरू म्हणाले, " भिलाई पोलाद प्रकल्प हे मोठ्या देशांमधील सहकार्याचे अद्वितीय असे उदाहरण आहे; गेल्या काही दिवसांत सोविएत रशियाचे अनुभवी अभियंते या ठिकाणी असून त्यांनी आम्हाला खूप साहाय्य केले आहे. आमचे तरुण प्रशिक्षण घेण्यासाठी सोविएत संघराज्यात गेले. त्यांचे या कारखान्याची उभारणी करण्याच्या दृष्टीने साहाय्य झाले आहे. उभय राष्ट्रांदरम्यानचे मैत्रीबंध बळकट करणे फार फायद्याचे आहे." [५] फेब्रुवारी १९६२ मध्ये नेहरूंनी भिलाईला तिसरी भेट दिली. मार्च १९६३ मध्ये त्यांनी भिलाईला चौथी भेट दिली, तीच त्यांची अखेरची भेट होय. त्या प्रसंगी नेहरू म्हणाले होते की, त्यांनी भिलाईला भेट दिली, त्या प्रत्येक वेळी नवीन खाणी, नवीन उत्पादने व अनुभवाने शहाणे झालेले लोक यंत्रे चालवीत असलेले पाहून त्यांना आनंद झाला. भिलाई हे भारत व सोविएत संघराज्य यांच्या दरम्यानच्या फलदायी सहकार्याचे प्रतीक आहे असेही त्यांनी म्हटले.

भारताच्या एकूण पोलाद-उत्पादनापैकी एक-तृतीयांश पोलाद सध्या भिलाई पोलाद कारखान्यात उत्पादित होते. सोविएत कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस लिओनिद ब्रेझनेव यांनी नोव्हेंबर १९७३ मध्ये भारताला भेट दिली. त्या भेटीची परिणती म्हणून, कारखान्याची वार्षिक क्षमता ७,०००,००० टनांपर्यंत वाढविण्याच्या कामी सोविएत संघराज्याने सहकार्य करण्याच्या बाबतीत करार करण्यात आला होता.

सोविएत संघराज्याच्या साहाय्याने पार पाडण्यात आलेला भिलाई हा मोठ्या प्रमाणावरील पहिला औद्योगिक प्रकल्प आहे. भिन्न समाजपद्धती असलेल्या देशांदरम्यानच्या सहकार्याला परस्पर लाभावर व भागीदारांच्या संपूर्ण समानतेवर आधारलेल्या सहकार्याला उत्कृष्ट भवितव्य असून ते अजोड असल्याचे त्याने स्पष्टपणे दाखवून दिले आहे. भिलाई पोलाद कारखाना पूर्ण झाल्यानंतर भारताचे आर्थिक स्वातंत्र्य भक्कम करण्याबाबतच्या सोविएत सहकार्यात ठाम वाढ झाली व ते यंत्र-उभारणी, विद्युत, तेल-उत्पादन, कोळसा-उत्खनन या मूलभूत उद्योगधंद्यांत तसेच औषधनिर्मितीच्या व शेतकीच्या क्षेत्रातही पसरले.

४. ' सोविएत लॅन्ड', १९६४, क्र. २३–२४.
५. ' सोविएत लॅन्ड', १९६४, क्र. २३–२४.

वेनियामिन दिमशित्स
सोविएत संघराज्याच्या मंत्रिमंडळाचे उपाध्यक्ष;
१९५७ ते १९५९ च्या दरम्यान भिलाई
पोलाद कारखान्याच्या उभारणी कार्याचे
प्रमुख अभियंते

भिलाई–भावी काळातील भारताचे प्रतीक व नांदी

मी नेहरूंना भिलाई पोलाद कारखान्याच्या उभारणी स्थलावर, तसेच दिल्ली येथे औपचारिक प्रसंगी भेटलो आहे. आपल्या जनतेची परिस्थिती सुधारण्यासाठी भारत व सोविएत संघराज्य यांच्या दरम्यान मैत्री प्रस्थापित करून ती दृढ करण्यासाठी आपले जीवन वाहून घेतलेले सद्गृहस्थ म्हणून नेहरू सदैव माझ्या स्मरणात राहतील.

विशेषतः डिसेंबर १९५७ मध्यावर नेहरूंनी भिलाईला दिलेली भेट मला आठवते. त्यावेळी त्यांनी सबंध उभारणी-स्थलाचा दौरा केला. खुल्या भट्टीच्या विभागाचा पहिला खांब तसेच पत्रे तयार करण्याच्या गिरण्यांचे सुरुवातीचे स्तंभ त्यांच्या उपस्थितीत उभारण्यात आले. या प्रचंड उभारणी-स्थळाच्या प्रत्येक अंगाबाबत त्यांना स्वारस्य असल्याचे दिसून आले. धातूचे सांगाडे तयार करण्याच्या विभागात, अलीकडेच बसविण्यात आलेल्या, धातूचे पत्रे कापण्याच्या यंत्रांपैकी पहिल्या यंत्राचा खटका त्यांना दाबण्यास सांगण्यात आले. अद्याप ते खाते पूर्ण झाले नव्हते. वस्तुतः, त्या वेळी त्यावर छप्परही नव्हते व कडाक्याचे उन्ह पडले होते. उष्णकटिबंधातील हवामान सोविएत अभियंत्यांना कसे काय मानवते यासंबंधी नेहरूंनी चौकशी केली. त्यावेळी उपस्थित असलेल्यांमध्ये अभियंते एन्. बी. लोबोत्स्की हे होते. उष्ण हवामानाचेही फायदे असतात असे त्यांनी उत्तर दिले. वस्तुतः, खात्याची उभारणी चालू असतानाही, बसविण्यात आलेली काही साधनसामग्री चालू करण्यात आल्यामुळे खाते संपूर्णतया चालू होईपर्यंतच्या काळात बरेच उत्पादन काढण्यात आल्याचेही त्या अभियंत्यांनी सांगितले.

भिलाई कारखान्याचे उभारणीकार्य चालू झाल्यादिवसापासूनच आमच्या गरजा पूर्ण होतील याकडे नेहरूंनी लक्ष दिले. नेहरूंना स्वारस्य आहे या गोष्टीचा फायदा घेण्यात येऊ नये याबाबत सर्व उभारणी-कामगारांनी दक्षता बाळगली ही गोष्ट खरी, तरीही कामाची गती रोखून धरणाऱ्या काही समस्यांबाबत चर्चा करण्याचा मोह काहींना टाळता आला नाही.

विशेषतः, विशाखापट्टण बंदरात सोविएत साधनसामग्री उतरविण्याच्या बाबतीत निर्माण झालेल्या समस्या सोडविण्याच्या कामी नेहरूंनी जे साहाय्य केले, त्याबद्दल उभारणीकारांना कृतज्ञता वाटली. एक वेळ नेहरूंनी असे सुचविले की भिलाईसाठी साधनसामग्री घेऊन येणारी काही जहाजे मुंबई व कलकत्त्याकडे वळविण्यात यावीत, या सूचनेमुळे परिस्थिती खूप सुधारली व उभारणीस्थळाला साधनसामग्री पुरविण्याच्या कार्याला गती प्राप्त झाली.

त्यानंतर, १००,००० लोक उपस्थित असलेल्या प्रचंड सभेत भाषण करताना नेहरू म्हणाले की, भारतापाशी स्वतःचा सामर्थ्यशाली असा अवजड उद्योगधंदा असल्याखेरीज तो चांगल्या प्रकारे प्रगती करू शकणार नाही. भारतातील शेतांना पाणी-पुरवठा करायचा होता. हे करण्यासाठी भारताला धरणे, विद्युत केंद्रे व औद्योगिक कारखाने बांधायचे होते. त्यासाठी धातूची आवश्यकता होती. ते म्हणाले की, भारतात उच्च प्रतीच्या लोखंडाचे संपन्न असे साठे आहेत, परंतु अगदी अलीकडच्या काळापर्यंत या संपत्तीला अक्षरशः हात लावण्यात आला नव्हता. सध्या एक प्रमुख पोलाद कारखाना उभारण्यात येत आहे. भारताच्या भावी काळाचे ते प्रतीक आहे. कितीही अडचणी आल्या, तरी आपल्या स्वतःच्या लोह-पोलाद उद्योगधंद्यांचा विकास करण्याची भारताने शिकस्त करायलाच हवी. सोविएत विशेषज्ञ भारतीयांना खूप साहाय्य करीत होते; त्यांना ते प्रशिक्षण देत होते व आपल्या तंत्रज्ञानाचा व अनुभवाचा लाभ देत होते. नेहरू म्हणाले की, त्याबद्दल आम्ही त्यांच्याबद्दल कृतज्ञ आहोत. आपल्या स्वतःच्या उद्योगधंद्याचा विकास कसा करावा, ही गोष्ट शिकून घेणे भारतीय अभियंत्यांच्या दृष्टीने कायमपणाने महत्त्वाचे आहे असे नेहरूंनी अगदी भर देऊन सांगितले.

भिलाईहून निघण्यापूर्वी नेहरू म्हणाले, " एक वेळचे आमचे स्वप्न साकार व्हायला व प्रत्यक्षात यायला आता सुरुवात होत आहे. भिलाई हे भारताच्या भावी काळाचे प्रतीक असून ती भावी काळाची नांदी आहे. "[1]

१९६५ व १९७० मध्ये सोविएत–भारत आर्थिक सहकार्याच्या दहाव्या व पंधराव्या वर्धापन–दिनाच्या सोहळ्याला उपस्थित असलेल्या सोविएत सरकारच्या प्रतिनिधिमंडळाचा प्रमुख म्हणून हजर राहण्याचे भाग्य मला लाभले. त्या वेळी इतर प्रकल्पांबरोबरच मी न चुकता भिलाई पोलाद कारखान्याला भेट दिली. मी त्या कारखान्यात दोन वर्षे काम केले होते व तो काळ माझ्या चांगलाच स्मरणात राहिला आहे. माझ्या दुसऱ्या भेटीच्या काळात कोक विभागाच्या उप–उत्पादननिर्मिती विभागाच्या कामाची पाहणी करण्यासाठी मी गेलो होतो. भिलाई कारखान्यात प्रत्यक्ष काम करीत असताना प्रशिक्षण घेण्यासाठी आलेल्या इराणी विशेषज्ञांच्या एका गटाला भेटल्याबद्दल मला आनंद झाला. ही गोष्ट मनोरंजक होती. कारखान्याचा विकास होत गेला व त्याचा विस्तार वाढला व त्याचबरोबर तो कारखाना

१. ' सोविएत लॅन्ड ', १९६४, क्र. १२.

चालविणाऱ्या लोकांचीही वाढ झाली, ही गोष्ट त्यावरून दिसून आली. गुंतागुंतीची लोह-पोलाद विषयक साधनसामग्री हाताळण्याचे शिक्षण घेत असताना त्यांना मिळालेल्या अनुभवाचा इतर देशातील आपल्या सहकाऱ्यांना लाभ देण्यास ते तयार होते. आज त्या कारखान्याचे उत्पादन म्हणजे भारताच्या लोह-पोलाद उद्योगधंद्याची ध्वजनौका बनले आहे. भारतीय अभियंते त्या कारखान्याचे उत्पादन ठामपणाने वाढवीत असल्याचे पाहून नेहरूंना आनंद झाला असता व त्यांच्याबद्दल अभिमानही वाटला असता.

निकोलाय गोल्डिन
अवजड उद्योगधंदा–उभारणी मंत्री, १९५४ ते
१९६१ या दरम्यान भिलाई पोलाद कार
खान्याच्या उभारणी कार्याचे प्रमुख अभियंते
१९७० पासून सोविएत-भारत सांस्कृतिक
संबंध समाजाचे अध्यक्ष

नवभारताची नवीन मंदिरे

नेहरूंनी भिलाईला भेटी दिल्या त्या वेळी, तसेच कामानिमित्त मी दिल्लीचे दौरे केले त्या काळात नेहरूंना अनेक वेळा भेटण्याचे सद्‌भाग्य मला लाभले. नेहरूंशी माझ्या भेटी-गाठी झाल्या व बोलणी झाली. त्यांचा माझ्यावर एवढा जबरदस्त प्रभाव पडला की, त्यांची मनोज्ञता व विशाल दृष्टिकोण यांचे मी कौतुक करायला लागलो. त्या काळात विविध राजकीय विचारप्रणालींच्या सर्व वृत्तपत्रांनी त्या ' अपूर्व प्रयोगा 'वर विस्तृतपणाने भाष्य केले. त्या काळात शीतयुद्धाला अगदी जोर चढला होता व नेहरूंच्या निश्चित स्वरूपाच्या तटस्थतेच्या धोरणाचा निर्लज्जपणाचे धोरण म्हणून काही पाश्चिमात्य मंडळी धिक्कार करीत होती. अशा परिस्थितीतही, भारत व सोविएत संघराज्य यांच्या दरम्यान सर्वांगीण सहकार्य करण्यात यावे असे नेहरूंनी प्रतिपादन केले. एवढेच नव्हे, तर त्यांनी आपले विचार कार्यवाहीतही आणले. रशियन विशेषज्ञ अकार्यक्षम आहेत, रशियन तंत्रशास्त्र मागासलेले आहे, तसेच व्यवहाराच्या दृष्टीने सहकार्य करण्याची सोविएतांमध्ये कुवत नाही असे आरोप करणाऱ्या, भारत-सोविएत सहकार्याच्या शत्रूंच्या ' भाकितां'चे स्मरण करून दिले तरी पुरे होईल; ' लाल प्रचारा 'च्या कारवायांबद्दल तर बोलायलाच नको. पूर्वीच्या सर्व कल्पना झुगारून खोटेपणा व सत्य यांमधील भेद ओळखण्यासाठी, आणि जगातील पहिल्या समाजसत्तावादी देशाशी विविध क्षेत्रांतील उभयपक्षी संबंधांचा विकास करण्याच्या धोरणाचा अवलंब करण्यासाठी थोर राजकारणपटूची दृष्टी व हिंमत असावी लागते. नेहरूंच्या अंगी हे सर्व गुण होते.

भिलाई येथील उभारणी-कामगारांच्या सामुदायिक सभेतील त्यांचे भाषण मला आठवते जमलेल्या श्रोत्यांपुढे भाषण करताना, भारतातील सर्वसामान्य लोकांशी बोलताना नेहरू नेहमी जी साधी भाषा वापरीत, त्याच भाषेत ते म्हणाले की, आपण भक्कम व स्वतंत्र व्हावे; दारिद्र्यावर, मागासलेपणावर व निरक्षरतेवर मात करावी असे भारताला वाटत असेल, तर त्याने आपल्या अर्थरचनेच्या सहकारी विभागात अवजड उद्योगधंद्याचा पाया

घालणे आवश्यक आहे. सर्व प्रमुख उद्योगधंदे सरकारी नियंत्रणाखाली आणले, तरच राहणीमान सुधारण्याच्या दृष्टीने अनुकूल अशी परिस्थिती निर्माण होऊ शकेल, असे त्यांनी भर देऊन सांगितले. ते म्हणाले की, "मूलभूत औद्योगिक उत्पादनांच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्याच्या आपल्या प्रयत्नांत आपणांस साहाय्य करण्यासाठी तुमचे रशियन बांधव या ठिकाणी आलेले आहेत ही गोष्ट तुम्ही पाहातच आहात. या ठिकाणी ते राहतात, तुमच्या बरोबरीने काम करतात व त्यांच्या विस्तृत अनुभवाचा तुम्हाला लाभ देतात. एक काळ असा होता की, त्यांनाही अगदी शून्यातून सुरुवात करावी लागली. परंतु रशियन लोकांनी खूप कष्ट घेतले व त्यामुळे रशियाची जगातील अत्यंत सामर्थ्यशाली राष्ट्रांत गणना होऊ लागली. काम कशा प्रकारे करावे हे तुम्ही तुमच्या रशियन सहकाऱ्यांपासून शिकावे अशी माझी इच्छा आहे. कारण, या ज्ञानामुळे तुम्हाला इथल्यासारखे इतर अनेक कारखाने, नव-भारताची नवीन मंदिरे उभारता येतील."

भारताच्या औद्योगिकीकरणाच्या प्रगतीकडे नेहरूंनी खूप लक्ष पुरविले. त्याचे एक उदाहरण पुढे देत आहे : भारतातील एक-तृतीयांश पोलाद आज ज्या ठिकाणी तयार होत आहे, तो प्रचंड भिलाई पोलाद कारखाना उभारण्यासाठी सिमेंट, बांधकामात वापरण्यासाठी लागणारे पोलाद, इलेक्ट्रोड, ॲसिटिलिन, वगैरे गोष्टींचा वेळेवर पुरवठा होणे आवश्यक होते. भारतात या गोष्टींचा त्या वेळी तुटवडा होता व कधी कधी आयात करण्यात आलेला माल यायला उशीर होत असे. कारखान्याच्या पहिल्या विभागाचे, झोतभट्टीचे काम पूर्ण व्हायला आले होते. त्यावेळी थोडाही विलंब परवडण्यासारखा नव्हता. त्या प्रकल्पावर ६०,००० हून अधिक लोक काम करीत होते. शिवाय अनेक यंत्रे व उपकरणे होती ती वेगळीच. उभारणीच्या काळात भारताला एका दिवसाचा अंदाजे १००,००० रुपये खर्च येत होता. मी कामानिमित्त दिल्लीला गेलो असता, अशी परिस्थिती असल्याचे पंत-प्रधानांना कळविले. मी भिलाईला येतो न येतो तेवढ्यात सरकारी विभागातील धातु-निर्मितीच्या तीन कारखान्यांच्या उभारणीला अग्रक्रम दिल्याची घोषणाही झाली.

ऑक्टोबर १९६० मध्ये नेहरूंनी भिलाईला भेट दिली होती. त्यांची ती भेट मला आठवते. त्यावेळी श्री. स्वर्णसिंग त्यांच्यासोबत होते. अनेक वर्षे ते पोलाद, खाण व इंधन खात्याचे मंत्री होते व ते बऱ्याचदा नेहरूंबरोबर असत. श्री. सिंग यांचे व आमचे संबंध चांगले होते ही गोष्ट मला याप्रसंगी सांगावीशी वाटते. आमच्या विनंत्या व सूचना ते लक्षपूर्वक ऐकून घेत असत, आणि उष्णकटिबंधीय हवामानाचा सराव नसलेल्या सोवि-एत विशेषज्ञांना वातानुकूलन-यंत्रे, योग्य असे अन्न, वगैरे पुरविण्यापासून अगदी सर्व छोटे-मोठे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने त्यांना शक्य असे सर्व काही ते करीत असत.

त्या सुमारास आम्ही रेलमार्ग व पोलादी सांगाडे तयार करण्याची गिरणी सुरू करीत होतो. विशेषतः गिरणीचे उत्पादन, रेलमार्गाचा दर्जा व प्रमाण, त्यांची लांबी, ते अधिक काळ वापरता येण्याच्या दृष्टीने उष्णोपचार पद्धतीचा वापर करून त्यांचा पृष्ठभाग अधिक

घट्ट करणे कितपत शक्य आहे, परदेशी बाजारपेठेत त्यांची विक्री होण्याची शक्यता आहे का वगैरे अगदी तंत्रशास्त्रीय बाबींच्या संदर्भात नेहरूंनी विचारलेले प्रश्न व त्यांचे भाष्य मला आठवते. उष्ण पोलादाच्या पांढऱ्या गोलकांपासून व चिपांपासून उपयुक्त उत्पादने आपल्या डोळ्यांदेखत तयार होत आहेत असे केवळ दृश्य पाहून नेहरू मोहून जात असत असे नव्हे. आपल्या देशाला व जनतेला या यंत्रांपासून जास्तीत जास्त लाभ कसा करून घेता येईल या कल्पनेने ते भारलेले होते. भिलाई व रांची येथे, दुर्गापूर व अंकलेश्वर येथे, तसेच सुरतगढ व मुंबई येथे काम केलेले व राहिलेले शेकडो सोविएत विशेषज्ञ व त्यांचे कुटुंबीय नेहरू यांच्या बद्दलच्या माझ्या मताशी सहमत होतील अशी माझी खात्री आहे. सोविएत साहाय्याने उभारण्यात आलेल्या औद्योगिक कारखान्यांना भेटी देण्याच्या निमित्ताने ते ज्या ज्या ठिकाणी जात त्या वेळी सोविएत अभियंत्यांच्या व इतर विशेषज्ञांच्या राहणीमानाबाबत न चुकता चौकशी करीत असत. सोविएत विशेषज्ञांच्या मुलांच्या शाळांनाही त्यांनी भेटी दिल्या, हौशी लोकांनी सादर केलेल्या जलाशयांना व क्रीडा-स्पर्धांनाही ते उपस्थित राहिले. थोर राजकारणपटू व भारत-सोविएत मैत्रीचे शिल्पकार म्हणून नेहरू सोविएत जनतेच्या अनेक पिढ्यांच्या स्मरणात राहतील अशी मला खात्री वाटते.

बोरिस रोमानोव
सोविएत दूतावासामधील
आर्थिक, सल्लागार १९५७–६३

वसुधारा––समृद्धीची गंगोत्री

भारतातील माझ्या कारकीर्दीत नेहरूंना भेटण्याची संधी मला खूप वेळा मिळाली. खास करून १६ डिसेंबर १९५७ हा दिवस माझ्या चांगलाच स्मरणात आहे. भिलाई पोलाद कारखान्याची उभारणी तेव्हा चालू होती आणि त्या दिवशी नेहरू हे बांधकाम पाहण्यास आले. या ठिकाणी प्रत्येक गोष्टीत ते कमालीचा रस घेत असल्याचे अगदी सुरुवातीपासून दिसून येत होते. थकव्याचा मागमूसही न दाखविता एकामागून एक खात्याची ते बारकाईने पाहणी करत होते आणि प्रश्न विचारून कारखान्याच्या तांत्रिक बाजूचे शक्य तेवढे संपूर्ण ज्ञान करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता. विशेषतः दगडी कोळशाच्या भट्टीची काँक्रीटची चिमणी उभी करण्यासाठी कोणते साहित्य वापरण्यात आले, याविषयी त्यांना खास औत्सुक्य होते. नेहमीप्रमाणे परांच्या न लावता जवळ जवळ १०० मीटर उंचीपर्यंत या चिमणीची उभारणी तोपर्यंत झालेली होती.

तेल संशोधन व उत्खनन करण्याच्या प्रश्नाकडे नेहरूंनी बरेच लक्ष पुरविले. भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या या मौल्यवान वस्तूचा शोध घेण्यासाठी सोविएत तज्ज्ञ आपल्या भारतीय सहकाऱ्यांच्या हातात हात घालून झटत होते. या उत्खनन विभागांना नेहरूंनी वरचेवर भेटी दिल्या. या संदर्भातील माझी एक आठवण. खंबायतच्या आखातात सोविएत विशेषज्ञ आपल्या भारतीय सहकाऱ्यांना संशोधनात्मक उत्खनन करण्यास मदत करत होते. एक दिवस नेहरू तेथे आले. एका ठिकाणी तेलाचा जोरदार फवारा उसळून आला आणि जवळच उभे असलेल्या नेहरूंना त्याने न्हाऊ घातले. आम्ही विशेषज्ञ त्यांच्या बाजूलाच उभे होतो. आम्हांला काहीसे संकोचल्यासारखे झाले; पण जराही विचलित न होता उलट नेहरू उद्गारले, " ही शेरवाणी पेहनूनच मी लोकसभेत जाईन. आमच्याजवळ स्वतःचे तेल आहे, हे एकदा सर्वांना कळू द्या. "[1]

नेहरूंनी या तेलाच्या विहिरीला ' वसुधारा ' म्हणजे ' समृद्धीची गंगोत्री ' असे नाव दिले

१९६३ साली मे महिन्यात अंकलेश्वर येथील तेलाच्या खाणींना नेहरूंनी भेट दिली. तेथील तेल कामगारांशी बातचित करण्यात त्यांनी आख्खा दिवस घालविला. त्यावेळी ते

१. **सोविएत लँड**, १९६४. क्र. १२

म्हणाले की, सोविएत संघराज्याच्या स्नेहशील सहाय्याने सापडलेल्या अंकलेश्वरच्या तेलामुळे केवळ गुजरातचीच नव्हे तर अखिल भारताची आर्थिक प्रगती व भरभराट होईल. सोविएत संघराज्याच्या स्नेहशील सहकार्यामुळे भारताच्या तेल उद्योगाची प्रगती होत आहे आणि समाजसत्तावादाच्या वाटचालीत भारताचे पाऊल त्यामुळे पुढे पडत आहे, असे नेहरूंनी प्रतिपादले.

नंतर कोयाली येथील तेलशुद्धीकरण कारखान्याची कोनशिला नेहरूंनी बसविली. त्यावेळी केलेल्या भाषणात ते म्हणाले की, भारताचा अव्वल दर्जाचा मित्र असलेल्या सोविएत संघराज्याच्या सहाय्यामुळेच गुजरात राज्यातील या तेलशुद्धीकरण कारखान्याचीही उभारणी करता आली आहे. या कारखान्यामुळे उभय देशांमधील संबंध अधिक बळकट होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सोविएत संघराज्याची क्षमता अपार असून त्याने तंत्रज्ञानात प्रचंड प्रगती केली आहे आणि भारताला सोविएत अनुभवापासून बरेच शिकण्यासारखे आहे, असे ते म्हणाले. कोयाली कारखान्याला तेल पुरविणाऱ्या अंकलेश्वरला व भिलाईला नेहरूंनी दिलेल्या भेटींच्या वेळी त्यांना वरचेवर भेटण्याचे भाग्य मला लाभले आहे.

रांची येथील अवजड यंत्रउभारणी कारखाना आणि दुर्गापूरचा खाण-साहित्याचा कारखानासुद्धा सोविएत मदतीनेच बांधण्यात आला. या कारखान्यांतील पहिले विभाग सुरू करण्यासाठी १९६३ च्या नोव्हेंबरच्या मध्याला नेहरू रांची व दुर्गापूर येथे गेले होते. पंतप्रधानपदाच्या कामाचा दाब आणि गंभीर आजार असून सुद्धा मोठे औद्योगिक प्रकल्प सुरू करण्यासाठी होणाऱ्या समारंभात भाग घेण्यासाठी नेहरू सवड काढत नि आपली शक्ती वेचत, या गोष्टीचा आम्हाला अचंबा वाटे.

शांततेच्या व देशकल्याणाच्या उद्दिष्टाला संपूर्णपणे वाहून घेणारा पुरुष आणि सोविएत संघराज्यावरोबर प्रत्येक क्षेत्रात घनिष्ट मैत्री व सहकार्य करण्याचा पुरस्कर्ता म्हणून नेहरूंची स्मृती माझ्या मनात चिरंतन राहील.

अलेक्झांडर सेलिवानोव

सोविएत कृषितज्ज्ञ. राजस्थान वाळवंट लागवडीस आणण्यासाठी १९५६ मध्ये पाठविलेल्या गटाचे सभासद. सुरतगड येथे हे तीन वर्षे होते आणि त्यांच्या डोळ्यांदेखतच वाळवंटाचा हा भाग ओळखू न येण्याइतका बदलला.

सुरतगढ शेतावर नेहरू

१९५९ एप्रिल महिन्यातील गोष्ट. सुरतगढ शेताची पाहणी करण्यासाठी पंतप्रधान नेहरू तिथे येत आहेत, हे वृत्त आजूबाजूच्या गावांतून वणव्यासारखे पसरले. गंगापूर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यामधून आपल्या मुलामाणसांना घेऊन शेतकऱ्यांची रीघ सुरतगढकडे लागली.

स्वतः श्री. नेहरू, इंदिरा गांधी, राजस्थानचे मुख्यमंत्री, केंद्रीय कृषिमंत्री आणि शेताचे व्यवस्थापक यांच्या गाडीचे सारथ्य माझ्याकडे सोपविण्यात आले होते. नेहरूंनी माझ्याशी हस्तांदोलन केले आणि फिरून माझी भेट झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. एक वर्षापूर्वी दिल्लीतील एका समारंभात माझी ओळख करून देण्यात आली होती, हे त्यांना आठवत होते.

रंदमहाल रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या शेताच्या भागापासून पाहणी–फेरी सुरू झाली. लागवड योजनेची प्रगती कुठवर आली, कोणकोणती यंत्रे वापरण्यात येत आहेत, अंग-मेहनतीसाठी किती कामगारांची आवश्यकता आहे, आणि शेतीची नवी यंत्रे भारतीयांना वापरता येतात की नाही, या प्रत्येक गोष्टीत नेहरू रस घेत होते. गव्हाच्या शेतापाशी गाडी पोहोचली, तेव्हा तिथे मळणीचे काम जोरात चालले होते. नेहरू गाडीतून उतरले आणि एका जोड मळणीयंत्रावर चढले. तेथून धान्याची धार कणग्यात कशी पडत आहे, हे त्यांना पाहता येत होते. मळणीचे काम पाहता पाहता नेहरूंनी ट्रॅक्टर ड्रायव्हर, जोडमळणी यंत्र-चालक, यंत्रज्ञ व शेतकामगार यांच्याशी बातचीत केली आणि त्यांची स्पष्टीकरणे लक्षपूर्वक ऐकून घेतली. ते अगदी अनौपचारिकपणे वागत होते आणि आपल्या भोवतीच्या मैत्रीच्या व खुल्या वातावरणात त्यांनी आम्हाला सहजपणे नेऊन सोडले.

सुरतगढला पोहोचता पोहोचता दिवस मावळून गेला. शहराचा चौक माणसांनी अक्षरशः फुलून गेला होता. तिथे उभारलेल्या व्यासपीठावर नेहरू चढले आणि संथ आवाजात त्यांनी आपले भाषण सुरू केले. दिवसभरात आपण जे पाहिले त्याचा आढावा घेऊन ते म्हणाले की, भारतात जर अशी आणखी शेते असती तर त्याचा अन्नप्रश्न केव्हाच सुटला असता.

कालपरवापर्यंत वाळवंट असलेल्या जमिनीला सुजल-सुफळ बनविणाऱ्या कृषियंत्रचालकांचे उत्कृष्ट काम, भारताची राष्ट्रीय अर्थव्यवस्था विकसित करण्यास हातभार लावणारे सोविएत संघराज्य आणि भारतीय तज्ज्ञांच्या खांद्याला खांदा लावून झटणारे सोविएत तज्ज्ञ यांच्याविषयी त्यांनी पुनःपुनः धन्योद्‌गार काढले. नवजीवनाच्या उभारणीत भारतीय शेतकऱ्यांपुढे असणाऱ्या समस्यांचेही त्यांनी विवेचन केले.

रात्री जेवणाच्या वेळी नेहरूंनी सोविएत शेत कामगार व तज्ज्ञ यांचे जीवनमान व कामाची परिस्थिती यांविषयी आस्थेवाईकपणे चौकशी केली. त्याचप्रमाणे स्थानिक वातावरणाशी त्यांनी कसे काय जमवून घेतले आहे, हेही विचारले. त्यांची दक्षता, ओलावा आणि आमच्या स्वास्थ्याविषयी त्यांना वाटत असलेली काळजी पाहून आम्ही पुलकित झालो. अतिशय चारित्र्यसंपन्न, नितळ मनाचा आणि दयार्द्र अंतःकरणाचा माणूस म्हणून नेहरूंची मला सदैव आठवण राहील.

गेल्या काही वर्षांत शेतीच्या क्षेत्रातील भारत-सोविएत सहकार्य अनिरुद्धपणे वाढले आहे आणि कृषि-उत्पादनाच्या अनेक अंगांना त्याने गवसणी घातली आहे. हिस्सार, रायचूर, झारसुगढ, जलंधर व कन्नानूर या पाच ठिकाणी निघालेल्या शेतांसाठी शेतीयंत्रे, अवजारे, त्यांचे सुटे भाग नि जोड-भाग सोविएत संघराज्याने देणगीदाखल भारतास दिले आहेत.

भारतीय सरकारी शेती महामंडळाचे अध्यक्ष एम. आर. कृष्णन यांनी एका मुलाखतीत सांगितल्याप्रमाणे निरनिराळ्या जातींच्या पिकांसाठी उच्च दर्जाचे बियाणे पुरविण्यासाठी इतर सरकारी शेतांबरोबरच सुरतगढच्या मुख्य शेताचा फार मोठा उपयोग झाला आहे आणि शेतीची यंत्रे व यांत्रिक सहाय्य घेतल्यामुळे कोणते लाभ होतात, याचे उत्तम उदाहरण या शेताने घालून दिले आहे. वस्तुतः या शेतांना प्रचंड पिकाच्या पैदाशीच्या अद्ययावत रीतींचा अभ्यास करण्याची प्रायोगिक केंद्रे मानता येईल...

उत्तम लोकरीच्या मेंढ्या व बकऱ्या यांची निपज कशी करावी, तसेच सूर्यफूल, साखर-कंद यांसारखी नवी पिके कशी घ्यावी, याचे ज्ञान भारतीय पशुतज्ज्ञांना व शेतकामगारांना देण्यासाठी सोवित संघराज्य मदत करीत आहे.

याउलट आर्द्र हंगामी वातावरणात रुजू शकतील, अशी नव्या प्रकारची बी-बियाणी शोधून काढण्याबाबत भारतीय बागाईतदारांनी व बियाणे-तज्ज्ञांनी मिळविलेल्या व्यापक अनुभवाचा लाभ सोविएत धान्योत्पादक घेत आहेत.

अलेक्सी वर्लामोव
रांची येथील अवजड यंत्रबांधणी कारखान्याच्या उभारणीस्थलावरील १९५९ ते ६३ या काळातील मुख्य तज्ज्ञ

नेहरूंचे स्वप्न साकार झाले

१९५५ च्या जूनमध्ये नेहरूंनी सोविएत संघराज्याला पहिली अधिकृत भेट दिली. यावेळी त्यांनी स्वेर्दलोस्क येथील उरलमाश अवजड यंत्र-उभारणी कारखाना बघितला. उरलमाश हा प्रचंडातील प्रचंड कारखाना आहे आणि अशा प्रकारच्या कारखान्यांची भारताला नितांत आवश्यकता आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी नंतर व्यक्त केली.

यंत्रबांधणी हा उद्योगांचा कणा आहे आणि यांत्रिक अवजारे व यंत्रोपकरणे यांवाचून उद्योग, आधुनिक शेती, वाहतूक किंवा एकंदरच आधुनिक भारत यांचा विकास करणे अशक्य आहे, हे भारतीय प्रजासत्ताकाच्या पंतप्रधानांनी ओळखले होते. म्हणूनच भारतात उरलमाशसारखा कारखाना उभारण्याची सूचना नेहरूंनी केली.

यानंतर रांची येथे सोविएत सहाय्याने अशा प्रकारचा कारखाना उभारण्यात आला. या प्रकारची उभारणी चालू असताना त्याच्या प्रगतीकडे नेहरूंचे बारकाईने लक्ष होते आणि बांधकामाच्या जागेला ते वरचेवर भेट देत असत. १९६३ च्या नोव्हेम्बर महिन्यात त्यांनी रांचीला शेवटची भेट दिली आणि या कारखान्याचे पहिले विभाग सुरू करण्याच्या समारंभात त्यांनी भाग घेतला. या वेळी कारखान्यात इतरत्र जोडणीची व सांधणीची कामे अतिशय वेगात चालली होती.

भारताच्या औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने रांची कारखान्याचे महत्त्व किती अमोल आहे, हे या कारखान्यातील कामगारांच्या मेळाव्यापुढे बोलताना नेहरूंनी सांगितले. देशाच्या औद्योगिक विकासाला वेग आणण्यासाठी कामगारांनी व इंजिनियरांनी प्रयत्नांची कसूर करू नये, असे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले की, या कार्यात रांची कारखान्याचा हिस्सा कमी महत्त्वाचा नसेल. त्यांचे हे उत्तेजक शब्द ऐकून आम्ही उत्साहित झालो आणि हा कारखाना शक्य तितक्या लवकर व जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे बांधून पुरा करण्यासाठी आम्ही सोविएत व भारतीय इंजिनियर, तंत्रज्ञ आणि कामगार नेटाने कामास लागलो.

आज रांची कारखाना हा भारतातील अशा प्रकारचा सर्वांत मोठा कारखाना बनला आहे. या कारखान्याची योजनाबद्ध क्षमता तो क्रमशः गाठील, तेव्हा तो अधिकाधिक कार्यक्षम कारखाना होईल आणि त्याला जास्तीत जास्त व अखंड नफा होऊ लागेल.

१८ नोव्हेंबर १९७३ रोजी 'सोत्सियालिस्तिचेस्कया इंदुस्त्रिया' या पत्रात प्रसिद्ध झालेल्या 'काळाने पारखलेले' या लेखात रांची कारखान्याचे महाप्रबंधक डी. आर. शास्त्री म्हणतात, "सोविएत संघराज्यातील आरेखन संस्थांसहित जवळ जवळ ९३ संघटना आपला अनुभव व तंत्रज्ञान आम्हांला द्यावयास तयार आहेत, हे जाणून आम्हांला धन्यता वाटली. ब्लूप्रिंटस् व तांत्रिक नकाशे तयार करण्यास त्या आम्हाला मदत करतात. त्यामुळे अतिशय आधुनिक अशा ७४० औद्योगिक उपकरणांचे उत्पादन करणे शक्य झाले आहे. या नकाशांच्या आधारे आपल्या ग्राहकांच्या गरजा ओळखून आणि स्थानिक कामाची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक त्या कच्च्या मालाच्या व घटकांच्या उपलब्धतेनुसार भारतीय आरेखक या मालाचे आरेखन करू लागले आहेल. विविध प्रकारच्या क्षेत्रांत अतिकुशल तज्ज्ञ तयार करण्याच्या कामी सोविएत संघराज्य भारताला मदत करीत आहे. विशेषतः रांची येथील अवजड यंत्र-उभारणी कारखान्यात काम करणारा सोविएत तज्ज्ञांचा गट भारतीय इंजिनियरांना व कामगारांना आपल्या तंत्रज्ञानाचा व अनुभवाचा लाभ उत्साहाने घेऊ देत असतो. या कारखान्यात एक उत्साहवर्धक वातावरण भरलेले असते आणि त्यात सच्ची मैत्री व परस्पर सामंजस्य यांचा फार मोठा हिस्सा असतो. कारखान्याच्या उत्पादनावर या वातावरणाचा लक्षणीय प्रभाव पडला आहे."

आज या कारखान्याचे उत्पादन भिलाई नि बोकारो, अंकलेश्वर नि हरद्वार, मुंबई नि कलकत्ता येथे पुरविले जाते. जड उद्योगाच्या साहित्यात भारताला स्वयंपूर्ण बनविण्याचे नेहरूंचे स्वप्न आता साकार होत आहे.

प्राध्यापक अलेक्झांडर लिबोव
सोविएत–भारत सांस्कृतिक संबंध समाजाच्या लेनिनग्राद शाखेच्या मंडळाचे सभासद. भारतीय रेडक्रॉसच्या विनंतीनुसार १९५८ ते ६१ या काळात दिल्लीत काम करणाऱ्या सोविएत बालरोग तज्ज्ञांच्या गटाचे प्रमुख. खाली त्यांचा उतारा दिला आहे.

अविस्मरणीय आठवण

नव्या दिल्लीतील वैद्यक महाविद्यालयाच्या बाल-रोग विभागात आम्ही काम करीत होतो तिथे असताना मुलांच्या संसर्गजन्य रोगांवर व्याख्यानांचे एक सत्र मी दिले आणि या विषयावर एक क्रमिक पुस्तकही लिहिले. हे क्रमिक पुस्तक प्रकाशित करण्यास सोविएत रेड क्रॉसने मला सहाय्य केले. सांसर्गिक रोगांना आळा घालण्याच्या कामी आणि रोगनिवारक दक्षतेच्या आयोजनासंबंधी भारतीय वैद्यक तज्ज्ञांनी गोळा केलेली माहिती आणि या बाबतीतील सोविएत अनुभव मी या पुस्तकात ग्रथित केला होता. या पुस्तकाविषयी तुम्हाला सांगायचे कारण असे की, त्यामुळे मला नेहरूंना भेटायची संधी मिळाली. आयुर्वेदिक व युनानी या दोन प्राचीन वैद्यक पद्धतींमधील विविध तंत्रे भारतीय डॉक्टर अनेक शतकांपासून वापरत आले आहेत आणि या प्राचीन वैद्यक पद्धतींची आधुनिक तंत्राच्या आधारे फेरतपासणी व्हावी, असे मत नेहरूंनी १९५७ साली डॉ. जी. बोरकर यांच्या 'स्वतंत्र भारतातील आरोग्य' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत व्यक्त केले होते.

नेहरूंच्या मागे कामाचा कितीही व्याप असला तरी आरोग्याच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या घडामोडींचा मागोवा घेण्यासाठी ते सवड काढीत. सर्वात महत्त्वाचा प्रश्न कोणता आहे, याचे त्यांना पूर्ण आकलन होते. " निव्वळ रोग बरे करणे म्हणजेच आरोग्य-संवर्धन वा राष्ट्रातील आरोग्याचा दर्जा उंचावणे नव्हे, रोग-निर्मूलन हे सर्वात महत्त्वाचे आहे, " असे त्यांनी या प्रस्तावनेत म्हटले होते.

भारतात आम्ही आल्यानंतर अल्पावधीतच आमच्या भारतीय सहकाऱ्यांशी विचार-विनिमय करून आम्ही 'बालरोगाच्या समस्या' हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. नंतर या पुस्तकाची एक प्रत आम्ही नेहरूंच्या निवासस्थानी धाडली. काही दिवसांनंतर मला एक पत्र आले. हे पत्र मी जपून ठेवले आहे. त्यात म्हटले होते:

" प्रिय प्राध्यापक लिबोव,

बालसंगोपनाविषयी भारतीय व सोविएत डॉक्टरांनी संयुक्तपणे संकलित केलेली पुस्तिका पाठविल्याबद्दल मी आपला आभारी आहे. या महत्त्वाच्या विषयाची आस्था बाळगणाऱ्या येथील सर्वांनाच ती उपयुक्त ठरेल, याविषयी मला खात्री वाटते.

आपला,
जवाहरलाल नेहरू. "

माझे क्रमिक पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर थोड्याच दिवसांनी राजकुमारी अमृत कौर यांनी मला जेवावयास बोलावले होते. त्यांनी मला नेहरूंचे एक पत्र दाखविले. त्यात त्यांनी म्हटले होते," " उद्या, १३एप्रिल रोजी प्रश्नोत्तरांचा तास संपल्यावर, म्हणजे १२-१५ च्या सुमारास संसद भवनातील माझ्या खोलीत प्रा. लिबोव यांची भेट घेण्यास मला आनंद वाटेल. "

बरोबर नियोजित वेळी संसदभवनातील आपल्या खोलीत नेहरू आले. तिथे आम्ही तिघेजण होतो; पंतप्रधान, राजकुमारी अमृत कौर नि स्वतः मी. संसर्गजन्य रोगांविषयी क्रमिक पुस्तक लिहून मी फार चांगली कामगिरी बजावली, असे नेहरूंनी या भेटीत मला सांगितले. ते पुढे म्हणाले की, भारताचा हा एक नंबरचा शत्रू आहे आणि दुसरा शत्रू खराब पाणी व सांडपाण्याच्या निचऱ्याचा अभाव हा आहे. खरे म्हणजे भारतीयांना शून्यातूनच सुरुवात करावयाची आहे. परंतु सोविएत संघराज्याचा अनुभव भारताच्या दृष्टीने अतिशय मोलाचा आहे. एक काळ असा होता की, सोविएत रशियापुढेही रोगांना आळा घालण्याची आणि योग्य पाणीपुरवठा-पद्धती संघटित करण्याची समस्या उभी होती. सोविएत जनतेने हे प्रश्न चांगल्या प्रकारे हाताळले आहेत आणि आपल्यालाही यात यश येईल, अशी आशा भारतीयांना वाटते, असे नेहरूंनी शेवटी सांगितले.

ग्रामीण भागातील रोगनिवारणाच्या अद्ययावत पद्धती कोणत्या आहेत आणि सोविएत संघराज्यात आरोग्यसेवेचे आयोजन कसे केले जाते, याविषयी नेहरूंनी मला प्रश्न विचारले. मी शक्य तितकी तपशीलवार माहिती देण्याचा प्रयत्न केला; त्याचबरोबर त्यांचा फार वेळ घेणे योग्य नाही, हे भान ठेवून मुख्य मुद्यांवरच मी भर देत होतो. तथापि नेहरू प्रश्नांमागून प्रश्न विचारत होते आणि माझ्या उत्तरांशी भारतातील परिस्थिती ते पडताळून पाहात असल्याचे मला जाणवत होते. आपल्या लोकांच्या गरजा व प्रश्न काय आहेत, याचे सखोल ज्ञान असणारा आणि आरोग्य सेवेच्या मूलभूत प्रश्नांची उकल करण्याची कुवत असणारा हा एक असामान्य मुत्सद्दी आहे, याविषयी नेहरूंचे प्रश्न पाहून माझ्या मनात तिळमात्र शंका राहिली नाही.

या भेटीचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला आहे.

४

नेहरूंविषयी सोविएत प्राच्य पंडित

अकादेमिशियन वोवोजान गफुरोव
सोविएत विज्ञान प्रबोधिनीच्या प्राच्याभ्यास संस्थेचे संचालक

महान जनतेचा थोर सुपुत्र

विद्यमान जगात जागतिक शांतता व सामाजिक प्रगती मोलाची मानणाऱ्या सर्वांच्या अंतःकरणात नेहरूंच्या उदात्त, मानवतावादी आदर्शांचे पडसाद उमटतात. सोविएत संघराज्यात जवाहरलाल नेहरूंचा अतिशय आदर केला जातो आणि ते सुविख्यात आहेत. नेहरूंची देशभक्ती, दुर्दम्य शक्ती नि अव्वल दर्जाचा निर्धार यांचे दर्शन जागतिक शांततेसाठी नि आपल्या जनतेच्या कल्याणासाठी त्यांनी चालविलेल्या लढ्यात ठळकपणे झाले असून सोविएत जनतेवर त्यांचा नेहमीच प्रभाव पडला आहे.

नेहरूंना खूप वेळा भेटण्याचे सद्भाग्य मला लाभले आहे. ते लोकोत्तर मुत्सद्दी व राजकारणी होते; त्याचप्रमाणे हुशार इतिहासकार नि राजकीय पत्रकारही होते.

त्यांचा साधेपणा नि मानवता पाहून मी थक्क झालो. त्यांच्यामागे सरकारी कामकाजाचा व्याप काही कमी नसे. तरीही विविध थरांतील नि जगभरच्या लोकांशी बोलायला त्यांना आवडत असे.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आमच्या संस्थेचा जो जो सभासद भारतात जाऊन आला, त्या प्रत्येकाला नेहरूंची भेट होण्याची संधी मिळाली.

निरनिराळ्या उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्येही माझी नेहरूंशी गाठ पडत असे आणि आपणाला एक सामान्य सहभागी समजावे, असा त्यांचा कटाक्षपूर्वक आग्रह असे, हे मला दरवेळेस दिसून आले. परिषदेस उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाला योग्य त्या आदराने व कदराने वागविण्याची काळजी ते कसोशीने घेत. नेहरू मृदू आवाजात बोलत; पण त्यांचा युक्तिवाद अगदी बिनतोड असे. त्यांची भाषणे नेहमी मुद्याला धरून आणि योग्य युक्तिवादाने भरलेली असत.

नेहरू हे महान जनतेचे थोर सुपुत्र होते.

अकादेमिशियन येवगेनी झुकोव

१९६४ च्या नोव्हेंबर महिन्यात दिल्लीत भरलेल्या शांतता व आंतरराष्ट्रीय सहकार्य विषयक जागतिक परिषदेतील सोविएत प्रतिनिधी मंडळाचे हे नेते होते. या परिषदेची एक बैठक जवाहरलाल नेहरूंविषयी झाली. येवगेनी झुकोव नेहरूंना अनेकदा भेटलेले होते. सदर बैठकीत त्यांनी केलेल्या भाषणाचा काहीसा संक्षिप्त गोषवारा येथे देत आहोत

साम्राज्यशाहीचा कडवा विरोधक

आज जवाहरलाल नेहरूंची जयंती आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रात त्यांनी केलेले उदात्त कार्य, शांतता टिकवण्यासाठी आणि राष्ट्राराष्ट्रांतील मैत्री बळकट करण्यासाठी त्यांनी केलेले अविरत प्रयत्न यांचे आदरपूर्वक स्मरण आज यानिमित्त आपण करीत आहोत. भारत व सोविएत संघराज्य यांच्यामधील मैत्रीचे संबंध बळकट करण्यासाठी नेहरूंनी प्रचंड हातभार लावला. भारताशी व इतर देशांशी मैत्री वाढविण्यास उत्सुक असलेल्या सोविएत जनतेला या क्षेत्रातील नेहरूंच्या कार्याचे फार मोल वाटते.

निर्विवाद तटस्थतेचे धोरण म्हणून एरवी ओळखल्या जाणाऱ्या असंलग्नतेच्या धोरणाशी नेहरूंचे नाव अविभाज्यपणे निगडित आहे. किंबहुना ते त्याचे शिल्पकार व पुरस्कर्ते होते. काही वेळा काही देशांमधील विशिष्ट वर्तुळांतून या धोरणावर निष्क्रियतेचे धोरण, आक्रमक शक्तींविरुद्ध लढा टाळण्याचे धोरण असा असमर्थनीय हल्ला केला जातो. हे कुंपणावर बसण्याचे धोरण आहे अशी त्याचा प्राचीन शब्दार्थ घेऊन संभावना केली जाते. वस्तुतः नेहरूंनी सातत्याने अवलंबिलेले आणि आजही बहुसंख्य असंलग्न देश अवलंबीत असलेले असंलग्नतेचे धोरण सुतराम निष्क्रिय नाही. आक्रमणाच्या प्रतिकाराचा तो एक प्रकार आहे. साम्राज्यवादी लष्करी गटांच्या, विदेशी लष्करी तळांच्या आणि अण्वस्त्रांच्या प्रसाराला आळा घालण्याचा तो प्रकार आहे. विकसनशील देशांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याला धोका निर्माण करणाऱ्या प्रतिगामी नि आक्रमक शक्तींना रोखण्याचा तो एक मार्ग आहे. इतर देशांना आपल्या आक्रमक गटांच्या नि गटबाजीच्या कक्षेत ओढण्यासाठी साम्राज्यवादी सत्ता आपली तथाकथित लष्करी मदत त्या देशांवर लादत असतात. ज्या देशांनी अलीकडेच वसाहतशाहीचे जू झुगारून लावले आहे, त्या देशात आपले वर्चस्व वाढविणे आणि अखेर तिथे

पुनः वसाहतशाही राजवटी प्रस्थापित करणे हा एकमेव हेतू त्यामागे असतो.

साम्राज्यशाहीच्या कारस्थानांना विरोध, बाहेरून होणाऱ्या कुठल्याही स्वरूपाच्या अतिक्रमणापासून राष्ट्रीय स्वातंत्र्याचे संरक्षण, सर्व प्रकारच्या नि आविष्कारांच्या वसाहतवादाचा धिक्कार नि त्याविरुद्ध लढा हा क्रियाशील असंलग्नतेच्या धोरणाचा गाभा आहे. या धोरणाला आता सबंध जगातील सर्व पुरोगामी जनतेचा विशाल पाठिंबा मिळाला असून तिच्या आदरास ते पात्र झाले आहे.

असंलग्नतेच्या धोरणाच्या वसाहतविरोधी स्वरूपावर मला खास करून भर द्यावयाचा आहे. नेहरूंच्या जीवन-कार्याचा आणि त्यांच्या हयातीतील अत्यंत कसोटीच्या क्षणातील कर्तृत्वाचा मागोवा घेणाराला नेहरू हे वसाहतशाही व साम्राज्यशाही यांच्या विरुद्ध सातत्याने झुंजणारे लढवय्ये होते, असाच निर्विवाद निष्कर्ष काढावा लागेल. अन्य निष्कर्ष निघूच शकत नाही. वसाहतशाहीच्या तुरुंगात त्यांनी काढलेल्या प्रदीर्घ वर्षांची आठवण या संदर्भात पुरेशी आहे.

१९५५ साली बांडुंग परिषदेत एक पत्रकार म्हणून मी उपस्थित होतो. आफ्रो-आशियाई देशांच्या या पहिल्याच व्यासपीठावरील नेहरूंच्या गतिमान हालचालींचा जातीने मागोवा घेण्याचे भाग्य मला लाभले आहे. बांडुंग परिषदेनंतरच्या काळात जगात संस्मरणीय बदल घडले आहेत आणि वसाहतशाहीला दारुण पराभव पत्करावा लागला आहे. तथापि साम्राज्यशाही अजून बरीच ताकदवान आहे आणि म्हणून जगातील जनतेने अव्वल दर्जाची दक्षता बाळगली पाहिजे. मात्र जवाहरलाल नेहरूंनी जगात सुरू केलेल्या आणि अविचलितपणे अंमलात आणलेल्या असंलग्नतेच्या धोरणाची यथार्थता व सुज्ञपणा काळाच्या कसोटीस उतरला आहे.

प्राध्यापक येवगेनी चेलीशेव
उपाध्यक्ष, सोविएत-भारत सांस्कृतिक संघ, जवाहरलाल नेहरू पारितोषिक विजेते

नेहरूंशी माझ्या भेटी

दिल्लीला जेव्हा जेव्हा मी 'त्या' घराला भेट देतो, तेव्हा तेव्हा भावनोत्कटतेने माझे मन भरून येते. एके काळी 'ते' नेहरूंचे घर होते. याच घरात मी नेहरूंना भेटलो होतो, आणि त्यांच्याबरोबर बोललो होतो. माझी स्मृती जागृत होते, आणि मला या भेटींचा तपशील संपूर्णपणे आठवतो. ज्या खोलीत भेटी झाल्या, त्या खोलीचा कोपरान् कोपरा मला आठवतो. पण मुख्य गोष्ट आठवते, ती ही की, या असामान्य माणसाच्या जवळ काय अद्‌भुत जादूची किमया होती! त्यामुळेच या विलक्षण माणसाने मला अगदी भारून टाकले होते.

नेहरूंच्या प्रामाणिक कळकळीमुळे, आणि भावनेच्या ओलाव्यामुळे माझ्यावर नेहमीचा परिणाम झालेला आहे. नेहरूजींच्या वागण्यात सहजता होती. आणि त्या वागण्यात त्यांचा उमदेपणा सहज दिसून येई. त्यावरोबरच नेहरूजींचा जबरदस्त जोषही त्यांच्या वागण्यात दिसून येई. ही व्यक्ती आपल्या ध्येयापासून कधीही विचलित होणार नाही, हे सहज दिसून येई. त्या ध्येयाकरिताच ही व्यक्ती जगत आहे, हे सहज लक्षात येई.

माझ्या छायाचित्रांच्या संग्रहात भारतातील अनेक छायाचित्रे आहेत. त्यामध्ये नेहरूंची चटकन घेतलेली छायाचित्रेही आहेत. (स्नैबशॉटस्) ही छायाचित्रे माझी खास आवडती आहेत. जेव्हा जेव्हा मी ती छायाचित्रे पाहतो, तेव्हा तेव्हा माझ्या स्मृती एकदम जागृत होतात. आणि भूतकालातील संस्मरणीय घटना माझ्या डोळ्यांसमोर येतात...

दिल्ली १९५५. दिल्लीमध्ये आंतरराष्ट्रीय तणाव कमी करण्याकरिता आशियाई राष्ट्रांची परिषद भरली आहे. नेहरू सोविएत प्रतिनिधींचे स्वागत करीत आहेत. त्यावेळी आशिया-आफ्रिका राष्ट्रांच्या एकतेची चळवळ, आणि जागतिक शांतता चळवळ, या दोन्हीही बाल्यावस्थेत होत्या; पण चांगले बाळसे धरू लागल्या होत्या.

नेहरूजींनी या चळवळीला जो हातभार लावला, हातभार कसला? जो आधार दिला, त्याचे मूल्यमापन करणेच अशक्य आहे. नेहरूजी हे एक वसाहतपद्धतीचे कट्टर विरोधक होते, ही गोष्ट तर जगजाहीर आहे. त्याचप्रमाणे सर्व आंतरराष्ट्रीय प्रश्न वाटाघाटींनीच सोडविले पाहिजेत, याबद्दलचा त्यांचा जाहीर पुरस्कार हाही जगजाहीर आहे.

आता हे दुसरे छायाचित्र पाहा. दिल्ली स्टेडियमवर नेहरूजी उभे आहेत, आणि त्यांच्या-भोवती मुलांचा घोळका आहे. त्यांच्या १९५६ च्या वाढदिवस समारंभाच्या प्रसंगी हे छायाचित्र घेतलेले आहे. छायाचित्रात पुष्पांचा समुद्र पसरलेला दिसतो. घोळक्या घोळक्याने लोक नाचताना दिसतात. सर्वांचे चेहरे आनंदी आणि हसरे !

' आनंदी आनंद गडे,
इकडे तिकडे चोहिकडे ! '

सर्वत्र आनंदी वातावरण. तमाम जनतेचे नेहरूंवर असलेले खरेखुरे प्रेमच त्यात व्यक्त होत होते.

दिल्लीच्या नेहरूंच्या निवासस्थानावरील माझ्या, आणि त्यांच्या झालेल्या भेटींच्या स्मृती मी फार हळुवारपणे जतन करून ठेवल्या आहेत. १९५९ साली पावसाळ्यात मद्रास येथे तिसरी अखिल भारतीय लेखक परिषद झाली. आमचे प्रतिनिधी-मंडळ या परिषदेहून दिल्लीला आल्याबरोबर नेहरूंनी आमचे स्वागत केले होते. मी स्वतः, प्रसिद्ध लेखक बोरिस पोलेवाय्, आणि बर्डी केरावाबायेव – आम्ही तिघेही जण कमालीचे उत्सुक, अस्वस्थ आणि उत्तेजित झालो होतो. याच मनःस्थितीत आम्ही नेहरूंच्या अभ्यासिकेत प्रवेश केला या प्रसंगी नेहरूजींना कोणत्या शब्दांत अभिवादन करावे, याचा आमच्यापैकी प्रत्येक जण विचारपूर्वक प्रयत्न करीत होता. नेहरूजींनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे झपाझप पावले टाकीत खोलीत प्रवेश केला. आमच्याकडे पाहून ते हसले, आणि आम्हाला, " आरामात बसा, " म्हणून त्यांनी सांगितले. त्यांनी हे उद्गार इतक्या सहज रीतीने काढले होते, की आमच्या मनावरील सगळा दाब एकदम नाहीसा झाला. आणि आम्हाला अगदी मनमोकळे वाटायला लागले. अत्यंत अनौपचारिक, आणि मैत्रीपूर्ण संभाषण सुरू झाले.

नेहरूंनी बोरिस पोलेवाय्, आणि बर्डी केरबाबायेव यांच्याशी बोलायला सुरवात केली. ते म्हणाले, " मला रशियन वाङ्मय अतिशय आवडते. एके काळी मी तोलस्तोय्, चेकाव, गॉर्की, आणि इतर रशियन लेखकांचे पुष्कळच वाङ्मय वाचले आहे. "

त्यांनी पुढे सांगितले की, आता त्यांना ललित वाङ्मय वाचायला फारशी फुरसतच मिळत नाही. पण तरी सुद्धा त्यातल्या त्यात वेळ काढून तुमची पुस्तके वाचण्याचा मी शक्यतो सर्व प्रयत्न करीन, असे आश्वासनही त्यांनी पोलेवाय्, आणि केरबाबायेव यांना दिले होते.

पोलेवाय्, आणि केरबाबायेव यांनी आपल्या कादंबऱ्या नेहरूजींना भेटीदाखल दिल्या. पोलेवाय् यांनी ' खऱ्याखुऱ्या माणसाची गोष्ट, ' (ए स्टोरी अबाउट अ रिअल मॅन), आणि केरबाबायेव यांनी ' निर्णायक पाऊल, ' (द डिसाईझिव्ह स्टेप) या कादंबऱ्या नेहरूजींना समर्पित केल्या. दोन्ही कादंबऱ्या अर्थातच इंग्लिश भाषांतरित होत्या.

नेहरूजी हे विज्ञान आणि संस्कृती या क्षेत्रांत तर नामवंत होते. या दोन्ही क्षेत्रांतील त्यांचा व्यासंग दांडगा होता. जो जो कोणी त्यांच्या सहवासात येई, आणि त्यांना ओळखी,

त्याच्या त्याच्यावर त्यांच्या विद्वत्तेचा पगडा पडल्याशिवाय राहत नसे. नेहरूजींनी स्वतः अनेक पुस्तके लिहिलेली आहेत. त्यावरून भारतीय लोकांनी जागतिक संस्कृतीत किती मोलाची भर घातलेली आहे, याची सहज कल्पना येऊ शकते. नेहरूजींचे लिखाण हे त्यांच्या प्रचलित अत्याधुनिक दृष्टिकोणाबद्दल प्रसिद्धच आहे. भारताच्या आणि इतर देशांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, आणि सांस्कृतिक विकासाच्या गुंतागुंतीच्या प्रश्नांना त्यांनी धीटपणे हात घालून, ते सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे 'भारताचा शोध' (द डिस्कव्हरी ऑफ इंडिया) पुस्तक, तर सोविएत युनियनमध्ये प्रसिद्धच आहे.

७ नोव्हेंबर, १९६३ रोजी नेहरूंना मी त्यांच्या सरकारी निवासस्थानातील अभ्यासिकेत भेटलो होतो. हीच आमची शेवटची भेट. सरकारी कामाचा त्यांच्यावर प्रचंड बोजा होता, त्यांची प्रकृतीही ढासळत होती, नाना प्रकारच्या चिंता त्यांना होत्या. पण तरी सुद्धा त्यांनी आमच्या सोविएत प्रतिनिधि-मंडळाला भेटण्यासाठी वेळ काढलाच! अमृतसर येथे भरलेल्या भारतीय शांतता-परिषदेसाठी आमचे प्रतिनिधी-मंडळ गेल्याच्या वेळची ही गोष्ट! या शेवटच्या भेटीच्या प्रसंगी मी पाहिलेले नेहरू, मी कधीच विसरणार नाही. अगदी आजतगायतसुद्धा त्यांचा तो सभ्य, सुसंस्कृत हळुवार आवाज माझ्या कानात गुंजत आहे. अगदी आजतागायतसुद्धा त्यांचे मैत्रीपूर्ण हस्तांदोलन मला आठवते, आणि त्यांचे ते मैत्रीपूर्ण स्मित हे तर माझ्या स्मरणातून कधीच जाणार नाही. त्या स्मितात त्यांच्या हृदयातील ओलावा, आणि मानव्य, यांचे लोभस दर्शन मला झाले होते.

व्लादिमीर बालावुशेविच
इतिहासशास्त्राचे डॉक्टर. सोविएत युनियनच्या प्राच्य विद्यासंस्थेच्या भारतीय शाखेचे प्रमुख. सोविएत-भारत सांस्कृतिक संघाचे उपाध्यक्ष.

नेहरूंचे ध्येय अमर राहो

१९२७ साली मी नेहरूंना प्रथम भेटलो. महान समाजवादी ऑक्टोबर क्रांतीच्या दहाव्या वाढदिवसाच्या समारंभासाठी ते आले होते. "मॉस्को हाऊसच्या" "कॉलम हॉल" मध्ये आमची भेट झाली होती. हॉल गच्च भरला होता. जमलेल्या श्रोतृवर्गात अनेक देशांहून आलेले सन्माननीय पाहुणे होते. सभेचे काम चालू असतानाच एकदम टाळ्यांचा कडकडाट झाला. शांतता भंगली. ब्रिटिश वसाहतवादाविरुद्ध लढणाऱ्या महान भारतीय जनतेच्या एका योद्धयाचे श्रोतृवर्ग स्वागत करत होता. मोतीलाल नेहरूंचे स्वागत करत होता. रुपेरी केस आणि शांत मुद्रा यामुळे मोतीलाल नेहरूंचा रुबाब औरच होता. त्यांच्याबरोबर त्यांचा उत्साही मुलगा जवाहरलाल हाही होता. त्याचप्रमाणे जवाहरलालची पत्नी कमला हीही होती. जवाहरलालची धाकटी बहीण ही पण होती. या सन्माननीय भारतीय पाहुण्यांचे हार्दिक स्वागत उत्साहाने करण्यात आले. आणि त्यांना मानाच्या जागी बसविण्यात आले. नेहरू मंडळींनी महान समाजवादी ऑक्टोबर क्रांतीच्या दहाव्या वाढ-दिवसाच्या निमित्त सोविएत युनियनला दिलेल्या या भेटीच्या महत्त्वावर जास्त भर देण्याचे काहीही प्रयोजन नाही. असे म्हणतात की, जवाहरलाल नेहरूंनी या भेटीसाठी खास आग्रह धरला होता. खरोखरच ही भेट फार महत्त्वाची होती, यात काहीच शंका नाही.

व्यासपीठापासून थोडासा दूरच मी बसलो होतो. पण तरीसुद्धा मी जे काही पाहिले त्याचा माझ्या मनावर फार खोल परिणाम झाला होता. त्या वेळी मी एक भारताचा तरुण अभ्यासक होतो. आणि आता तर अगदी माझ्या डोळ्यांसमोर महान भारतीय नेते बसले होते. त्यांच्याबद्दल मी खूपच वाचले होते. वसाहतवादाविरुद्ध चाललेल्या भारतीय जनतेच्या लढ्याचे हे नेते म्हणजे एक साक्षात प्रतीकच होते.

नेहरूंना भेटण्याचा आणखीही एक प्रसंग मला आठवतो. त्या बाबतच्या माझ्या स्मृती अगदी ताज्या आहेत. जानेवारी १९६४ मध्ये प्राच्य विद्या अभ्यासकांची दिल्लीमध्ये सव्विसावी आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. या परिषदेच्या सुरुवातीचाच हा प्रसंग. जवा-हरलाल नेहरू जेव्हा व्यासपीठावर चढले तेव्हा सगळे श्रोते एकदम उभे राहिले. टाळ्यांचा

प्रचंड कडकडाट करून त्यांनी जवाहरलालजींचे स्वागत केले होते. नेहमीप्रमाणेच नेहरूंचे हे भाषण अत्यंत परिणामकारक झाले. श्रोत्यांना त्यांनी आपले म्हणणे अगदी पटवून दिले होते. त्या प्रसंगी ते म्हणाले होते, की केवळ ज्ञानार्जनासाठीच भूतकालीन ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करणे चुकीचे आहे. भूतकालीन ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करून त्यापासून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग जर आपण आपले वर्तमानकालीन प्रश्न सोडवण्याकरता केला नाही, तर त्या ज्ञानाचा उपयोग काय ? आपण त्या ज्ञानाचा उपयोग आपले आजचे प्रश्न सोडवण्यासाठी केलाच पाहिजे.नेहरुजी व्यासपीठावरून खाली उतरले आणि त्यांनी सर्व प्रतिनिधींशी हस्तांदोलन केले. मीही त्यांपैकी एक होतो. समस्त श्रोतृवर्गाने मेघगर्जनेसारखा टाळ्यांचा कडकडाट केला होता. नेहरूंच्या बरोबर झालेली माझी ही भेट शेवटचीच ठरेल, असे मला स्वप्नात देखील वाटले नव्हते. आज नेहरू आपल्यामध्ये नाहीत यावर विश्वास ठेवणे आजसुद्धा मला अवघड वाटते ! एक गोष्ट मात्र नक्की, ज्या ध्येयासाठी नेहरूजी जगले आणि लढले, ते ध्येय एकामागून एक विजय प्राप्त करीत आहे आणि साकार होत आहे.



सवोहात अझिमजानोवा
इतिहासशास्त्राच्या डॉक्टर, सोविएत-
भारत सांस्कृतिक संघाच्या उपाध्यक्षा,
उझबेक विज्ञान विद्यापीठाच्या प्राच्य-
विद्या संस्थेच्या, शाखेच्या संचालिका

महान पंडित

सोविएत उझबेकिस्तानमधील आम्ही शास्त्रज्ञ आणि अभ्यासू, नेहरूंना फक्त एक महान मुत्सद्दी म्हणूनच ओळखतो, असे नाही. एक महान 'पंडित' म्हणूनही आम्ही त्यांना ओळखतो. केवळ नावानेच नव्हे तर ते प्रत्यक्षातही खरे खुरे 'पंडित' होते. प्राच्य विद्येच्या ज्ञानात आणि त्या ज्ञानाच्या विकासात त्यांनी मोलाची भर टाकलेली आहे. या बाबतीतली त्यांची ही कामगिरी खरोखर अगदी नजरेत भरण्यासारखी आहे. त्यांची दोन पुस्तके तर अगदी विश्वविख्यात झाली आहेत. ही दोन पुस्तके म्हणजे एक 'भारताचा शोध' (द डिस्कव्हरी ऑफ इंडिया) व दोन 'आत्मचरित्र' (ॲन ऑटोबायाग्रोफी). या दोन पुस्तकांत इतिहासाचे समालोचन आहे, संस्कृतीचे विवेचन आहे. आणि भारतीय जनतेच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याचे विवेचन आणि जोरदार पुरस्कार आहे, सोविएत वाचकांच्या तर या पुस्तकांवर नुसत्या उड्या पडत असतात. सोविएत युनियनमध्ये ही पुस्तके कमालीची लोकप्रिय झालेली आहेत. नेहरू एक विख्यात इतिहासतज्ज्ञ आहेत आणि त्यांचा दृष्टिकोणही अगदी शास्त्रशुद्ध आहे. यामुळे त्यांच्या नजरेची झेप भविष्याकाळातही फार दूरवर पोहोचते.

मी म्हणजे एक सामान्य उझबेक स्त्री, भारताचा अभ्यास करणाऱ्या अनेक अभ्यासकांपैकी एक साधी विद्यार्थिनी. मला तीन प्रसंगी नेहरूजी भेटले होते. त्यामुळे "लागेल दृष्ट माझी माझ्याच वैभवाला" असे मला वाटू लागले.

डिसेंबर १९६० साली मी भारताला भेट दिली होती. त्याप्रसंगी भारत-सोविएत सांस्कृतिक संघाने रवींद्रनाथ टागोर यांच्या संस्मरणार्थ एक खास अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनाला गेलेल्या सोविएत-भारत सांस्कृतिक संघाच्या प्रतिनिधी मंडळाची मी एक सदस्या होते. ही परिषद मुंबईला भरली होती. परिषदेमधे नेहरूजींनी त्या महान कवींच्या जीवनावर आणि कवितांवर एक प्रबंध वाचला होता. आम्हाला तो अनुभव एक आगळाच वाटला. नेहरू म्हणजे एक मुत्सद्दी, एक राजकारणी पुरुष अशीच तोपर्यंत आमची समजूत होती. पण आमच्यासमोर आता एक महान 'पंडित', एक महान विद्वान

बोलत होते !

नेहरूजींच्या भाषणात अनेक नवीन आणि ताज्यातवान्या कल्पना असल्यामुळे ते भाषण अत्यंत मनोरंजक वाटले. त्यांच्या भाषणाचा आमच्यावर खूप खोल परिणाम झाला होता. नेहरूंची सुसंस्कृत शिष्टसंमत वागणूक आणि शिष्टाचार, आपल्या जवळ असलेले ज्ञान आणि माहिती अगदी साध्या सरळ शब्दात मांडण्याची नेहरूजींची हातोटी, यामुळे ते त्यांचे म्हणणे कोणालाही सहज पटवून देत. १९६१ साली नेहरूजींनी उझबेकिस्तानला भेट दिली होती. त्यावेळी पुन्हा एकदा त्यांची-माझी गाठ पडली होती. उझबेकिस्तानात नेहरूजी जेथे जेथे गेले, तेथे-तेथे त्यांचे देवदुर्लभ स्वागतच झाले. ज्या व्यक्तीबद्दल अफाट प्रेम, आणि अतीव आदर लोकांना वाटत असतो त्याच व्यक्तीचे जनता असे स्वागत करीत असते. कामाच्या इतक्या पसाऱ्यात नेहरूंनी आमच्या प्राच्य विद्या संस्थेला भेट देण्याचे जेव्हा कबूल केले तेव्हा तर आम्ही सगळेच अगदीच भारावून गेलो होतो. त्या प्रसंगी झालेले आमचे संभाषण अत्यंत अनौपचारिक होते. वातावरणही अत्यंत मैत्रीपूर्ण होते. सहानुभूतीचा आणि प्रेमाचा ओलावा त्या वातावरणात काठोकाठ भरलेला होता. नेहरूंनी संस्थेच्या कामात आणि संस्थेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बाबतीतही अतिशय आस्था दाखविली. याच प्रसंगी नेहरूंनी सुप्रसिद्ध कवी खुश्रू देहलवी यांची हस्तलिखिते नजरेखालून घातली. आमच्या संस्थेने अशी अनेक पुरातन हस्तलिखिते आपल्या संग्रहालयात ठेवलेली आहेत. नेहरूंनी हस्तलिखित नजरेखालून घातल्यावरोबर असे उद्‌गार काढले होते की, कवी खुश्रू हे भारतास चांगलेच परिचित आहेत. भारतात असंख्य लोक त्यांच्यावर प्रेम करतात. उझबेक संस्कृती व भारतीय संस्कृती या दोघी अगदी एकमेकांच्या जवळ आहेत. त्यांच्यात खूपच साम्य आहे. १९६४ साली ४ जानेवारीला दिल्ली येथे प्राच्य विद्याभ्यासकांची एक परिषद दिल्ली येथे भरली होती. या परिषदेतच माझी व नेहरूजींची भेट झाली होती. हीच आमची शेवटची भेट ! माझ्या स्मरणात ही कायमची राहील. या गोष्टीला आता दहा वर्षे झाली आहेत. पण अजून सुद्धा नेहरूंचे ते खोचक आणि हुशार डोळे मला नेहमी दिसतात. व्यासपीठावरील भाषण करणारी त्यांची मूर्ती माझ्या नेहमी स्मरणात राहील. नेहरूंचे सविनय आणि दयाळू व्यक्तिमत्त्व नेहमी स्मरणात राहील. खरोखरच नेहरू एक जादूगारच होते. त्यांच्या मोहिनीचा प्रभाव हा भयंकर होता.

अलेक्झी लेव्कोवस्की,
अलेक्झांदर चिचेरोव
सोविएत विज्ञान–प्रबोधिनीचे प्राच्यविद्या
शाखेतील भारतविषयक (इंडॉलॉजी) संशोधक

नेहरूंची स्मृती जनमानसात कायमची वास करून आहे.

१९६३ सालची एप्रिल महिन्यातील ती सकाळ आम्ही कधीच विसरणार नाही. त्या दिवशी सूर्यप्रकाश स्वच्छ पडला होता. आम्ही दोघांनी भारतविषयक अभ्यास नुकताच सुरू केला होता. आम्हा दोघांना जवाहरलालजींना भेटण्यासाठी इंदिरा गांधींनी आमंत्रण दिले होते.

आम्ही दोघे अगदी हुरळून गेलो होतो. अगदी अस्वस्थ झालो होतो. आम्हा दोघांनाही नेहरूंसारख्या माणसाला भेटायचे म्हणजे काही साधीसुधी गोष्ट नाही, याची पूर्ण जाणीव होती. नेहरूंना भेटणाऱ्या माणसावरील जबाबदारीचे ओझे भेटीनंतर जास्तच वाढणार, याची आम्हाला जाणीव होती. खरं सांगायचं म्हणजे या आमंत्रणानंतर आम्ही आश्चर्य-चकितच झालो होतो. इतका कामाचा बोजा असताना सुद्धा नेहरूजींनी आम्हाला भेटण्यासाठी वेळ कसा शोधून काढला, याचे आम्हाला आश्चर्यच वाटत होते.

परराष्ट्रखात्यातील नेहरूंच्या खोलीत आम्ही छाती धडधडत असतानाच पाऊल टाकले. आम्हाला धास्ती वाटत होती. आमचे संभाषण फारच थोडा वेळ झाले. पण आमच्यावर त्याचा चांगलाच परिणाम झाला. हा परिणाम अत्यंत खोल होता, आणि पुष्कळ दिवस टिकणारा होता. नेहरूंचा भारदस्त रुबाबदारपणा, आणि त्यांचा आत्मिक उमदेपणा यांनी आम्ही खास प्रभावित झालो होतो. त्याचबरोबर त्यांचे सौजन्य, आणि त्यांची कळकळ यांनीही आम्ही तितकेच प्रभावित झालो होतो. नेहरूजींनी अतिशय लक्षपूर्वक आमचे म्हणणे ऐकून घेतले. भारतीय संस्कृती, इतिहास, भारताची आर्थिक प्रगती, यांचा अभ्यास सोविएत युनियनमध्ये कसा विकसित होत आहे, याची आम्ही नेहरूजींना कल्पना दिली. फूल ना फुलाची पाकळी म्हणून आम्ही त्यांच्यासाठी आणलेल्या भेटी अत्यंत नम्रपणाने त्यांच्या हवाली केल्या. या भेटी म्हणजे भारतविषयक अभ्यासूंनी लिहिलेली पुस्तके होती.

नेहरूजींनी अत्यंत कळकळीने आमचे आभार मानले. ते सोविएत प्राच्यविद्या संशोधकांच्या कार्यात अत्यंत रस घेत असतात, असेही त्यांनी आम्हांला सांगितले. सोविएत संशोधकांच्या भारतविषयक अभ्यासाला ते खास महत्त्व देत होते. कारण या अभ्यासामुळे सोविएत आणि भारतीय जनता यांच्यामधील मैत्रीपूर्ण संबंध वाढतील, असेही त्यांचे मत असल्याचे

त्यांनी आम्हांला सांगितले. सध्या भारतविषयक अभ्यासू कोणत्या विषयाचा अभ्यास करीत आहेत, अशी पृच्छा त्यांनी केली. आणि आम्ही सध्या भारताच्या प्राचीन इतिहासाचा, आणि मध्ययुगीन इतिहासाचा,सध्या अभ्यास करीत आहोत, अशी त्यांना माहिती दिली. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीचा, आणि भारतीय जनतेच्या राष्ट्रीय विमोचन संग्रामाचा सोविएत अभ्यासू अभ्यास करीत आहेत, असेही आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्याचबरोबर भारताच्या प्रचलित सामाजिक, आणि आर्थिक विकासाच्या मुख्य मुख्य प्रश्नांचाही आम्ही अभ्यास करीत आहोत, हेही आम्ही त्यांना सांगितले. आम्ही खास संशोधक असल्यामुळे नेहरूजींना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसबद्दलही अनेक प्रश्न विचारण्याचा मोह आम्हांला आवरता आला नाही. नेहरू हसले, आणि म्हणाले, की, एका मिनिटात या महत्त्वाच्या प्रश्नांना त्रोटक उत्तर देणे त्यांना बिलकूल आवडत नाही. आणि तुमचेही त्याने समाधान होणे अशक्य आहे. कारण तुम्ही खास संशोधक आहात, नुसतेच पत्रकार नाही आहात, असेही त्यांनी आम्हाला सुनावण्यास कमी केले नाही. तुम्ही तुमचे सध्याचे काम पुरे करा, आणि तुमचा साऱ्या देशाचा दौरा संपला की मग पुन्हा भेटायला या, अशी त्यांनी सूचना केली. त्यांनी पुढे असेही सांगितले की, दौरा आटोपल्यानंतर आमच्यावर काय परिणाम झालेला आहे, हे ऐकण्यास ते उत्सुक आहेत. त्यानंतर ते आमच्या प्रश्नांची तपशीलवार उत्तरे देतील, असेही त्यांनी आश्वासन दिले.

पण ही दुसरी भेट होऊच शकली नाही. नेहरूंची प्रकृती मध्यंतरीच्या काळात खूपच ढासळली होती, आणि त्यामुळे विश्रांतीसाठी त्यांना दिल्ली सोडणे भाग पडले होते. भारताच्या पंतप्रधानांबरोबर झालेल्या या भेटीच्या स्मृती, आम्ही नेहमीच अत्यंत प्रेमाने जतन करू. नेहरू हे सोविएत जनतेचे मित्र होते. त्यांना सोविएत जनतेविषयी अत्यंत कळकळ होती. नेहरू विख्यात मुत्सद्दी होते, आणि त्याचबरोबर विद्वान, अभ्यासू पंडितही होते. याबरोबरच नेहरूंचा लोभस साधेपणा, त्यांचा विनय, आणि नेहरूंचे मानव्य, या गोष्टीही सहज लक्षात येते.

५

महान मानवतावादी

ज्या ज्या सोविएत नागरिकांना नेहरूंना भेटण्याची, आणि त्यांच्याबरोबर बोलण्याची संधी मिळाली आहे, त्या सर्वांना जर पहिल्याप्रथम कशाची जाणीव झाली असेल, तर ती त्यांच्या मानवतावादाची ! या महान भारतीय पुढाऱ्याच्या मानवतावादामुळे मुख्यतः त्यांना भेटणारे लोक, त्यांच्याकडे आकर्षित होत. आणि नेहरूंबरोबरचा त्यांचा पुढील बर्ताव, या नेहरूंच्या मानवतवादावरच आधारित होत असे. प्रसिद्ध सोविएत प्राच्यविद्या पंडित बोबोजान् गाफुरॉव यांनी नेहरूंबाबतीत खालीलप्रमाणे उद्‌गार काढले होते; ते म्हणतात की, नेहरूंच्या दर्जाच्या मुत्सद्द्याने मानवतावादाच्या तत्त्वांत आणि प्रश्नांत कळकळीने रस घ्यावा, हे स्वाभाविकच होते. मानवतावादाचे ध्येयच तसे विशाल, आणि आकर्षक आहे. भारतीय सामाजिक, वैचारिक बैठकीलाही ते धरूनच आहे. भारताच्या सगळ्या प्रगतिशील परंपरेलाही ते साजेसेच आहे. पण एवढ्यानेच नेहरूंच्या मानवतावादाचे संपूर्ण विश्लेषण होऊ शकत नाही. तर नेहरूंच्या वेळच्या भारताच्या तत्कालीन प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीही नेहरूंचा मानवतावाद आवश्यक होता. त्यावेळच्या भारताच्या राष्ट्रीय विमोचन-क्रांतीमधूनच हे प्रश्न नैसर्गिक रीतीने विकसित झाले होते. मध्ययुगीन भारताच्या अनेक परंपरा भारताच्या प्रगतीला अडथळा आणीत होत्या. त्याचप्रमाणे वसाहतवादाचे जोखड भारताच्या मानगुटीवर बसले होते. वसाहतवाद्यांनी भारतावर भयंकर दडपशाही चालविली होती. या वास्तव परिस्थितीत नेहरूंचा मानवतावाद हा अत्यावश्यकच होता, असेच म्हणावे लागेल. भारतातील तमाम जनतेला नेहरूंनी आवाहन केले होते. कारण जनताच हे महान क्रांतिकारक कार्य पार पाडू शकते, असा नेहरूंना विश्वास वाटत होता. भारताची त्यावेळची परिस्थितीच अशी होती, की यापुढील भारताचा सामाजिक, आणि राजकीय विकास व्हायचा असेल, तर त्यासाठी काहीतरी नवीन मार्ग शोधून काढण्याची आवश्यकता होती. भारतीय जनतेला म्हणूनच आवाहन करण्याची, नितांत आवश्यकता होती. इतकेच नव्हे, तर हेच तर्कनिष्ठ, आणि सुसंगत होते.

अशा तऱ्हेने मानवतावादी नेहरूंनी-राजकारणी पुरुष, आणि मुत्सद्दी यांनी आपल्या कार्यास सुरुवात केली. नेहरूंच्या लिखाणात त्यांनी पुष्कळ वेळा ऐतिहासिक व्यक्तींच्या खास महत्त्वाबद्दल लिहिलेले आहे. व्लादिमीर लेनिन यांच्याबद्दलचे नेहरूंचे मूल्यमापन हे फारच महत्त्वाचे आहे. व्लादिमीर लेनिन यांच्या वैचारिक, आणि प्रत्यक्षात केलेल्या राजकीय

चळवळींबद्दल नेहरूंनी केलेले मूल्यमापन अतिशय महत्त्वाचे आहे. क्रांतीचा नेता, तत्त्वचिंतक, वैचारिक नेता, राजकारणी पुरुष म्हणून लेनिनने केलेल्या सर्वच गोष्टी नेहरूजी मान्य करतात असे नव्हे. पण एक गोष्ट मात्र खरी आहे की, नेहरूंनी लेनिनबद्दल बोलताना आणि लिहिताना नेहमीच अत्यंत कळकळीने लेनिनची प्रशंसाच केलेली आहे.

कष्टकरी जनतेचे जीवन सुखी करण्याच्या भावनेने प्रेरित झालेला, आणि त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून, त्या ध्येयासाठी आपले सगळे जीवन समर्पित करणारा एक महान मानव म्हणून नेहरूजी लेनिनकडे पाहतात. लेनिन एक थोर विचारवंत, ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचा ठरणारा पुढारी होता, अशी लेनिनची प्रतिमा नेहरूजींच्या लिखाणात, आणि बोलण्यात दिसून येते. लेनिनने क्रांतीचे सिद्धांत, आणि प्रत्यक्ष क्रांतिकारक चळवळ यांची उत्कृष्ट सांगड घातली होती, असेच विश्लेषण नेहरूंनी केलेले आहे.

नेहरूंनी पुढे असेही लिहिले आहे की, कालाच्या प्रवाहाबरोबरच लेनिनचे माहात्म्यही वाढत गेले, आणि लेनिन हे जगातील काही थोड्या अमर व्यक्तींच्या पंक्तीत जाऊन बसले. लेनिन आजही जिवंत आहेत. पण ते स्मारकात नाहीत, चित्रांत आणि छायाचित्रांत नाहीत तर ते त्यांनी केलेल्या प्रचंड कार्यात, आणि कोट्यवधी कामगारांच्या हृदयात जिवंत आहेत, असेही नेहरूंनी लिहिले आहे. या कोट्यवधी कामगारांनी लेनिनच्या उदाहरणावरून स्फूर्ती घेतली आहे, आणि त्या स्फूर्तीपासूनच आपला भविष्यकाळ सुखी होईल, असे हे कामगार समजत आहेत, इतक्या स्पष्ट शब्दांत नेहरूंनी लेनिनला आदरांजली वाहिलेली आहे.

मार्क्स आणि लेनिन यांच्या ग्रंथांचा अभ्यास केल्यानंतर नेहरू लिहितात, "इतिहासाची आणि सामाजिक विकासाची एक लांबलचक साखळी आहे. हे ग्रंथ वाचल्यानंतर या साखळीत काहीतरी अर्थ आहे, काहीतरी कार्यकारणभाव आहे हे समजून येते. आणि भविष्यकालासंबंधीची अजाणता पुष्कळशी कमी होते."[1] नेहरूंच्या जागतिक दृष्टिकोणावर 'विरोध-विकासवाद' आणि ऐतिहासिक जडवाद' यावर आधारलेल्या विचारसरणीच नेहरूंवर किती परिणाम झाला होता, हे यावरून दिसून येते.

नवसमाज निर्माण करण्याकरिता सोविएत युनियनमध्ये झालेल्या प्रचंड कामगिरीनेही नेहरूंवर खूपच परिणाम झालेला दिसून येतो. या कामगिरीमुळे नेहरूंना जागतिक, सामाजिक प्रक्रियेचा एक नवा दृष्टिकोण प्राप्त झालेला दिसतो. लेनिनने घोषित केलेले महान मानवतावादाचे ध्येयच सोविएत युनियनमध्ये साकार होत आहे, हे नेहरूंनी प्रत्यक्षातच पाहिले, आणि सोविएत युनियनची ही प्रचंड कामगिरी म्हणजे लेनिनचे जिवंत स्मारकच होय, असेच त्यांना वाटले.

भारताचा पुनरुद्धार करण्याच्या लढ्याच्या प्रवाहातच नेहरूंची एका गोष्टीबाबत जास्त जास्त खात्री पटत गेली. पिळवणूक, आणि जुलूमजबरदस्ती, मग ती कोणत्याही स्वरूपात

१ 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया', पान १४.

असो, नाहीशी झालीच पाहिजे, याबद्दल नेहरूंची खात्री पटली. त्याचप्रमाणे सरंजामशाही पिळवणूक, धार्मिक झगडे, वंशभेदावर आधारलेल्या विषमतेचा प्रचार, एखाद्या राष्ट्राच्या इतिहासाचे मुद्दाम अवमूल्यन करणे, वसाहतवाद, फॅसिझम, साम्राज्यवाद, या सर्व गोष्टी नष्ट झाल्याच पाहिजेत, हेही नेहरूंना पटले. मानवजातीचा संतुलित विकास व्हावयाच्या मार्गांत हेच मुख्य अडथळे आहेत, हेही नेहरूंना पटले होते. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातही हेच मुख्य अडथळे आहेत, असेही नेहरूंना पटले होते.

नेहरूंच्या मानवतावादाचे व्यवच्छेदक लक्षण हे होते की, त्यांनी वसाहतवादाशी किंवा साम्राज्यवादाशी कुठल्याही प्रकारची तडजोड कधीही केली नाही. जागतिक जनतेच्या विमोचन-संग्रामाचा गाभा म्हणजे वसाहतवादाविरुद्ध लढा हाच होय असा नेहरूंना दृढ-विश्वास वाटत होता.

नेहरूंनी त्यांच्या देशाला म्हणजे भारताला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरही वसाहतवादाविरुद्ध चाललेल्या लढ्याला अविरत पाठिंबा दिला. वसाहतवादाविरुद्ध चाललेल्या संग्रामातील नेहरू हे एक खंदे आणि निष्ठावंत लढवय्ये होते. नेहरूंनी जवळ जवळ सर्व तत्कालीन प्रश्नांची छाननी जी केली तिला त्यांनी वसाहतवादाविरुद्ध लढा हाच निकष लावला होता असेही म्हणता येईल. वसाहतवादाविरुद्ध चाललेल्या लढ्याचे त्यांना स्वाभाविकपणेच आकर्षण वाटत होते. कारण वसाहतवादाचे घोर दुष्परिणाम त्यांनी प्रत्यक्षात पाहिले होते आणि अनुभवलेले होते. नवस्वतंत्र देशातील जनतेने वसाहतवादाविरुद्ध लढा अखंडपणे चालू ठेवणे हेच आजच्या मानवतावादाचे मुख्य कार्य होय असेच नेहरू आग्रह-पूर्वक सांगत असत.

भांडवलशाही समाजातील व्यथांची नेहरूंना तीव्र जाणीव होती. भारतीय जनतेचा लढा चालू असतानाच नेहरूंनी काही आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रातील उद्दिष्टेही निश्चित केली होती. वासाहतिक आणि सरंजामशाही पिळवणूक नष्ट केल्यानंतर भारतीय जनतेने भांडवलशाही मार्ग स्वीकारता कामा नये असेच नेहरूंचे ठाम मत होते.

भारतीय जनतेसमोर नेहरूंनी कित्येक दशके आग्रहपूर्वक समाजवादी सामाजिक पद्धत हीच आदर्श पद्धत होय असे प्रतिपादिले होते. लखनौमध्ये १९३६ साली भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनातील नेहरूंचे भाषण चांगलेच गाजले होते. ते म्हणाले, "जगाच्या आणि भारताच्या समोर आज जे प्रश्न उभे आहेत ते सोडविण्याची गुरुकिल्ली म्हणजे 'समाजवाद' हीच होय, अशी माझी पक्की खात्री पटली आहे. आणि ज्यावेळी मी 'समाजवाद' हा शब्द वापरतो तेव्हा मला 'भोंगळ मानवतावाद' अभिप्रेत नाही. 'समाजवाद' हा शब्द मी शास्त्रशुद्ध आर्थिक दृष्टीनेच वापरीत असतो. अर्थात 'समाज-वाद' म्हणजे केवळ आर्थिक तत्त्व नव्हे, त्याची व्याप्ती त्याहून पुष्कळच मोठी आहे. 'समाजवाद' हे एक जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. आणि म्हणूनच मला त्याचे आकर्षण वाटते. गरिबी, प्रचंड बेकारी, सर्वच दृष्टीने मानवाचा झालेला अधःपात, भारताच्या

जनतेची गुलामगिरी ही जर कायमची दूर करायची असतील तर समाजवादाशिवाय तरणोपाय नाही असे माझे ठाम मत आहे. दुसरा कुठलाही मार्ग मला दिसत नाही. समाजवादाची कास आपण जर धरली तर अर्थातच आपल्या समाजरचनेत असंख्य क्रांतिकारक आणि राजकीय वदल करावे लागतील. शेतीच्या क्षेत्रात आणि औद्योगिक क्षेत्रातही प्रस्थापित 'आहेरे' लोकांचे हितसंबंध निकालात काढावे लागतील. सरंजामशाही नष्ट करावी लागेल. संस्थानातील राजेशाहीही नष्ट करावी लागेल. याचा अर्थ हाच होऊ शकतो की, खाजगी मालमत्तेची प्रथाच नष्ट करावी लागेल. अगदी थोड्याशा मर्यादेपर्यंतच तिला वाव राहील.' सध्याची नफेबाजीवर आधारलेली पद्धतच नष्ट करावी लागेल. आणि तिच्या जागी उच्च दर्जाची सहकारी समाजपद्धती आणावी लागेल. या सर्वांचा एकच अर्थ आहे, आपल्याला आपल्या भावनांत, आपल्या सवयींत आणि आपल्या इच्छा-आकांक्षात आमूलाग्र परिवर्तन करावे लागेल. थोडक्यात सांगायचे म्हणजे एक नवी संस्कृतीच निर्माण करावी लागेल. सध्याच्या भांडवलशाही पद्धतीशी या नव्या संस्कृतीचे कसलेही साम्य असणार नाही. ही नवी संस्कृती भांडवलशाही पद्धतीपेक्षा मुळातच अजिबात भिन्न असेल.[२]

'सोविएत युनियन'मध्ये मानवतावादाने खरोखरच मूळ धरले आहे, हे नेहरूंच्या सहज लक्षात आले होते. नेहरूंना अशीही पक्की खात्री पटली होती की आधुनिक जगाच्या सर्व मुख्य प्रश्नांच्या बाबतीत भारत आणि सोविएत युनियन यांचा दृष्टिकोण समानच आहे. युद्ध आणि शांतता, वसाहतवादाचे निर्मूलन, मानवजातीच्या सामाजिक पिळवणुकीविरुद्ध आणि जुलूम-जबरदस्तीविरुद्ध चाललेला लढा, मानवजातीचा विकास या सर्व प्रश्नांवर सोविएत युनियनमधील जनता आणि भारतीय जनता यांचा दृष्टिकोण समान असल्यामुळे या दोन्ही देशांतील लोक एकत्र येणारच असा नेहरूंना दृढविश्वास वाटत होता. या दोन्ही देशांतील लोक एकत्र येऊन मैत्रीचा भक्कम पाया घालतील अशी नेहरूंना खात्री वाटत होती. या दोन्ही देशांतील जनतेत नक्कीच सामंजस्य निर्माण होईल याबद्दल नेहरूंना शंकाच नव्हती.

नेहरूंच्या मानवतावादी मतांमुळे नेहरूंना देशादेशांमधील शांतता आणि मैत्री टिकविण्याच्या आणि वाढविण्याच्या कामात खूपच रचनात्मक कार्य करता आले. या कार्यातच त्यांचा मानवतावाद साकार झाला होता. आपल्या देशाच्या मूलभूत गरजा आणि जागतिक शांतता या दोन्ही गोष्टींमध्ये नेहरूंना कसलाही विरोध आहे असे वाटले नाही. नेहरू हे खरेखुरे देशभक्त होते आणि म्हणूनच त्यांना याची जाणीव होती. भारतात जर राष्ट्रीय पुनरुत्थान व्हावयाचे असेल आणि भूतकालाची कात टाकून नव्या जोमाने भारताचा जर पुनरुद्धार व्हायचा असेल तर जागतिक शांतता टिकून राहिलीच पाहिजे अशी नेहरूंची

२. जे. नेहरू : 'इंडियाज फ्रीडम', लंडन १९६२, पान ३५.

खात्री पटली होती. नेहरू असे म्हणत की, भारताच्या विकासाची आणि पुनरुद्धाराची आपली सुखस्वप्ने जर युद्धाचा वणवा पेटला तर त्यात जळून खाक होतील. जर आपले जग युद्धाच्या वणव्यात सापडले आणि त्याच विवंचनेत पडले तर मग कसला विकास आणि कसले नवीन भवितव्य ! मानवाच्या मानवतावादी आकांक्षा—केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या कुठल्याही देशात—जर सफल व्हावयाच्या असतील तर जागतिक शांतता टिकलीच पाहिजे. हीच मुख्य शर्त आहे असे नेहरू म्हणत. म्हणून सर्व मानव समाजाने, प्रत्येक देशाने, इतकेच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीने अविरत कार्यरत राहून जागतिक शांतता टिकविण्याची पराकाष्ठा केली पाहिजे असेच नेहरू ठासून सांगत. खरोखर जागतिक शांतता टिकविणे म्हणजेच आपली संस्कृती टिकवणे होय यावरच नेहरू भर देत.

नेहरू हे भारत आणि सोविएत युनियन यांच्यामध्ये निरनिराळ्या क्षेत्रांत सहकार्य व्हावे आणि ते अखंड वाढत रहावे याबाबत अगदी निश्चिंत होते. या मतापासून ते कधीही चळले नाहीत. आतापर्यंतच्या विवेचनावरून हे कोणालाही सहज समजण्यासारखे आहे.

१९४६ साली भारतातील ब्रिटिशांचा वसाहतवाद संपुष्टात यायला सुरुवात झाली होती. पहिली संधी मिळाल्याबरोबर आशियाई राष्ट्रातील परस्परसंबंधाबाबत विचार करण्यासाठी नेहरूंनी दिल्लीत परिषद भरविली. आणि मुख्य गोष्ट म्हणजे या परिषदेला हजर राहण्याचे निमंत्रण सोविएत प्रतिनिधींनाही दिले. तेव्हापासूनच सोविएत युनियन आणि भारत यांच्यामधील सांस्कृतिक संबंध हे वाढतच गेले आहेत. दोन्ही देशांच्या प्रतिनिधींच्या भेटी-गाठी वरचेवर होऊ लागल्या. सांस्कृतिक देवघेवीसंबंधाने दोन्ही देशांत झालेल्या करारात शिक्षण, कला, विज्ञान आणि तंत्रशास्त्र या क्षेत्रांत जास्तीत जास्त सहकार्य व्हावे अशी तरतूद करण्यात आली आहे. या करारांचे दरवर्षी नूतनीकरण करण्यात येते. उपरिनिर्दिष्ट क्षेत्रांत कार्य करणारे निरनिराळे लोक दोन्ही देशांना भेटी देत असतात. करारातच तशी तरतूद करण्यात आली आहे.त्याचप्रमाणे दोन्ही देशांत असलेल्या स्त्रियांच्या आणि युवकांच्या संघटनांचे प्रतिनिधीही वरचेवर एकमेकांच्या देशाला भेटी देत असतात. या भेटी सारख्या वाढतच आहेत. दोन्ही देशांतील वाङ्मय एकमेकांना उपलब्ध व्हावे यासाठी भाषांतराच्या कार्याला नेहमीच उत्तेजन आणि पाठिंबा देण्यात येतो. याबाबत कसलीही कसूर करण्यात येत नाही. दोन्ही देशांत ज्ञानाच्या विविध क्षेत्रांतील पुस्तकांची आणि मासिकांची सतत देवघेव चालूच असते. दोन्ही देशांत प्रदर्शने भरविली जात असतात. इ. इ.

सोविएत युनियन व भारत यांच्यामध्ये आज जे जिवंत मैत्रीपूर्वक संबंध प्रस्थापित झालेले दिसतात ही कोणाची कामगिरी ? अर्थात महान मानवतावादी, विचारवंत, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचीच ! त्यांच्या 'अल्पस्वल्प' कामगिरीचाच हा प्रताप !

इल्या एरेनबुर्ग
लेखक, लेनिन शांतता-पारितोषिकाचे विजेते, यांनी
१९५६ साली भारताला भेट दिली होती. "भारत
भेट–काही स्मृती," या त्यांच्या पुस्तकात त्यांनी
त्यांच्या भारत-भेटीचे वर्णन केले आहे.

नेहरू : कलावंत, राजकारणी, भारताचा खरा सुपुत्र

माझ्या ६५ व्या वाढदिवसाच्या दिवशीच मी दिल्लीला पोहोचलो होतो. काही लोक असे म्हणतात, की माणसाला वृद्धापकाळात सर्व काही चांगले समजते. निदान गद्धेपंचविशी पेक्षा तरी त्याला जास्त अक्कल आलेली असते ! मला ठाऊक नाही. पण समजा, वृद्धावस्थेत लोकांचे ज्ञान वाढते, हे जरी कबूल केले, तरी सुद्धा कुठल्याही गोष्टीचे वृद्धापकाळात आश्चर्य वाटत नाही. असे आश्चर्य फक्त तरुणपणीच वाटत असते. मला भारताचे आश्चर्य वाटले. भारत–दर्शन झाल्यानंतर आपण अगदी नव्यानेच जगाकडे पाहात आहोत, असे मला वाटले....

नेहरूंची पुस्तके ज्यांनी ज्यांनी वाचली आहेत, त्यांना त्यांना असेच वाटेल की, नेहरू एक अद्वितीय संभाषणप्रचुर असले पाहिजेत. नेहरूंजवळ प्रचंड ज्ञानभांडार होते. आणि नेहरूंचे जीवन हे अत्यंत नाट्यपूर्ण होते. नेहरूंनी अनेक अनुभव घेतले होते, आणि अनेक प्रसंगांतून ते पार पडले होते. नेहरूंना भेटण्याचा, आणि त्यांच्याबरोबर बोलण्याची सुखदायक संधी जेव्हा मला मिळाली, तेव्हा माझ्या डोक्यात मुख्यतः एकच गोष्ट घोळत होती. जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या लढ्यात भारत कोणती भूमिका पार पाडू शकेल, हेच मला मुख्यतः समजावून घ्यायचे होते. नेहरूंनी आपली मते, ठामपणे अतिशय वक्तृत्वपूर्ण शैलीत मांडली. त्यांचा देश शांततेप्रेमी आहे, आणि त्यांच्या देशाचे धोरण शांततेवरच आधारलेले राहील, हे त्यांनी पटवून दिले. नेहरूंमध्ये कलावंत, आणि अनुभवी राजकारणी पुरुष यांचा सुंदर मिलाफ झाला होता. कलावंताची नाजूक सूक्ष्मता, आणि राजकारणी पुरुषाचे व्यावहारिक अनुभव यांच्या या सूक्ष्म मिलाफाने नेहरूंचे व्यक्तिमत्त्व फारच लोभस वाटे. त्याचबरोबर नेहरूंना भारतातील सामान्य माणसाबद्दल अतिशय प्रेम वाटत होते; या भारताच्या सामान्य माणसाबरोबर नेहरूंनी अगदी जिवंत संबंध प्रस्थापित केले होते.

मॉस्को येथील वास्मानिया रस्त्यावरून आपल्या मोटारीतून गेलेले नेहरूही मला आठवतात. लोकांचे घोळकेच्या घोळके नेहरूंच्या मोटारीवर फुले उधळीत होते. मॉस्कोचे नागरिक नेहरूंचे स्वागत करीत होते. फुले कदाचित् उत्तरेकडील साधी लिलॅक फुलेच असतील.

पण मॉस्कोवासियांचे अंतःकरण हे बिलकूल थंड नव्हते. त्या अंतःकरणात प्रेमाची आणि मायेची ऊब होती.

माझे नशीब थोर ! नेहरूंबरोबर एक सबंध संध्याकाळ मी घालविली होती. आमच्या गप्पा अगदी रंगात आल्या होत्या. नेहरूंनी, त्यांना तत्त्वज्ञानावर बोलण्याची भीती वाटते, असे मला सांगितले. तत्त्वज्ञानावर मल्लिनाथी करणे, हे तत्त्ववेत्त्यांचे काम आहे, त्यांचे नाही, असेही ते म्हणाले.

मी काही धंदेवाईक राजकारणी नाही. तेव्हा भारताच्या पंतप्रधानांनी आपल्या देशाकरिता काय केले, आणि काय केले नाही, या प्रश्नाचे उत्तर दुसऱ्या लोकांवरच सोपविलेले बरे. भारत हा एक प्राचीन देश आहे. विविधतेने नटलेला देश आहे, देशात अनेक गुंतागुंती आहेत, आणि या देशाला वसाहतवाद्यांनी पुरेपूर लुबाडलेले आहे. अशा देशावद्दल बोलण्यासाठी नेहरूंहून योग्य माणूस कोठे आढळणार ? त्यांच्याबरोबर सर्व प्रकारच्या विषयांवर चर्चा करणे, अगदी सोपे काम होते. नेहरू म्हणजे एक स्वयंप्रज्ञ माणूस ! विशाल दृष्टिकोण असलेला !

राजकीय प्रश्नांत नेहरूंनी आपल्या स्वतःला कधीच संपूर्णपणे गुरफटून घेतले नव्हते. शासनाच्या दैनंदिन प्रश्नांच्या चौकटीबाहेरील अनेक प्रश्नांत नेहरू लक्ष घालीत, आणि ते सोडविण्याचा प्रयत्न करीत. कदाचित् त्यांच्या देशाचा सांस्कृतिक वारसा, जो त्यांना मिळाला होता, त्यामुळेच असे होत असावे. हा वारसा शेकडो वर्षांच्या परंपरांचा वारसा होता. नेहरू हे अगदी हाडाचे भारतीय होते. पण तरीसुद्धा भारताचा राष्ट्रपुरुष हा सांस्कृतिक दृष्टीने, आणि आत्मिक दृष्टीने जगापासून अलग पडावा, आणि एकांतात जगापासून फटकून राहावा, असे त्यांना वाटत नव्हते. नेहरूंनी माझ्याबरोबर लिओ तोलस्तोय्, रोमे रोलाँ आणि बर्नार्ड शॉ, यांच्या ग्रंथांबद्दल चर्चा केली. बर्नार्ड शॉची काही भाषणे त्यांनी स्वतःही ऐकली होती, असेही ते म्हणाले. ऑक्टोबर क्रांतीची पहिली बातमी त्यांना कशी, कधी, आणि कोठे मिळाली, हेही त्यांनी मला सांगितले होते. लेनिनने समग्र मानवाचा विचारच बदलून टाकला, असेही ते म्हणाले. त्याबाबतीतील लेनिनची कामगिरी फार फार मोठी आहे, असेच त्यांचे मत होते.

जागतिक शांतता परिषदेच्या कौन्सिलच्या ब्यूरोची बैठक दिल्ली येथे चालू असतानाही एकदा आम्ही नेहरूंच्या भेटीस गेलो होतो. त्या प्रसंगी ते अत्यंत उत्साहाने शांततेबद्दल बोलले होते. आपल्या जमान्यातील शांतता चळवळ ही एक महान चळवळ आहे असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते.

अनातोली सफ्रोनोव
लेखक, आफ्रो–आशियाई एकता चळवळीच्या
सोविएत शाखेचे उपाध्यक्ष

नेहरू : शांततेचे व आफ्रो-आशियाई ऐक्याचे समर्पित कैवारी

भारताच्या इतिहासातील एका सबंध कालखंडावर जवाहरलाल नेहरूंची प्रतिमा उमटलेली आहे. या कालखंडाशी जवाहरलाल नेहरू एकरूप झालेले आहेत. या कालखंडात भारताने वसाहतवादाविरुद्ध राष्ट्रीय विमोचन-संग्राम केला. या कालखंडात भारताने स्वतःचा पुनरुद्धार केला. भारतीय जनतेचे जीवन सुखकर व्हावे, म्हणून या कालखंडात भारतीय जनता धडपडत होती.

गेल्या दोन दशकांत भारताला अनेकवेळा भेट देण्याची मला संधी मिळाली. मी हे माझे सद्भाग्यच समजतो. सोविएत युनियन आणि भारत यांची मैत्री सारखी वृद्धिंगत होत आहे. ही मैत्री जास्त जास्त मजबूत होत आहे. भारताच्या सर्व प्रकारच्या थरांतील लोकांत या मैत्रीने खोलवर मूळ धरलेले आहे, याचा मला अत्यंत आनंद झाला होता. ही मैत्री दोन देशांतील सामंजस्यावर, आणि दोन्ही देशांतील परस्परविश्वासावर आधारलेलीआहे, याचेही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. जवाहरलाल नेहरूंची याबाबतीत कामगिरी ही अगदी एकमेवाद्वितीयच आहे. नेहरूंची ही एक खास वैयक्तिक कामगिरीच आहे असेच म्हटले पाहिजे.

आफ्रो–आशियाई एकतेच्या चळवळीपाठीमागेही नेहरू हीच शक्ती होती.

१९५५ साली आम्ही आठ दिवस भारतात होतो. आफ्रो-आशियाई परिषदेची तयारी चालली होती. त्यावेळी मला आणि अनेक देशांतील प्रतिनिधींना नेहरूंना वारंवार भेटण्याची संधी मिळाली होती. नंतर दिल्ली येथे भरलेल्या आफ्रो–आशियाई लेखकांच्या परिषदेच्या अनेक बैठकींनाही भारताचे पंतप्रधान हजर राहिले होते. जीवनातील अनेक गोष्टींत नेहरू रस घेत होते. त्यामुळे प्रत्येकाला त्यांचे कौतुकच वाटत असे. नेहरू राजकारणी होते, नेहरू तत्त्ववेत्ते होते; नेहरू लेखकही होते. तिन्ही भूमिका एकटे नेहरू पार पाडीत होते.

नेहरूंचे सारे जीवन, आणि कार्य शांततेला पाठिंबा देण्यात व्यतीत झाले होते. अगदी पोटतिडिकीने त्यांनी जागतिक शांततेचा पुरस्कार केला होता. यामुळे जगातील कोट्यवधी लोक या महान मानवतावाद्याचे चाहते बनले होते. अर्थात सोविएत युनियनमधील जनताही नेहरूंची अत्यंत चाहती होती. आफ्रो-आशियाई जगात नेहरू म्हणजे एक असामान्य, आणि

अद्वितीय व्यक्ती म्हणूनच ओळखले जात होते. आफ्रो-आशियातील निरनिराळ्या साम्राज्य-विरोधी शक्तींमध्ये एकजूट घडवून आणण्यात, आणि ती टिकविण्यात नेहरूंचा सिंहाचा वाटा होता. आफ्रो-आशियाई राष्ट्रांतील भक्कम एकजुटीची कल्पना, ही काही प्रासंगिक, आणि हवेतील नाही, हे नेहरूंनी मुद्दाम वारंवार भर देऊन सांगितले आहे. उलटपक्षी एकजूट करून एकमेकांच्या जवळ येण्यासाठी प्रयत्न करणे, हे आफ्रो-आशियाई देशांच्या बाबतीत स्वाभाविकच आहे. कारण या देशांच्या स्वातंत्र्यलढ्यातच ही प्रवृत्ती निर्माण झाली आहे. वासाहतिक जुलूम-जबरदस्तीला टक्कर देण्याच्या लढ्यातूनच ही प्रवृत्ती निर्माण झालेली आहे. वासाहतिक पिळवणुकीचा या साऱ्या देशांना भयंकर द्वेष, आणि तिरस्कार वाटत होता, त्यामधून ही प्रवृत्ती निर्माण झालेली आहे.

नव्यानेच राजकीय स्वातंत्र्य मिळविलेल्या देशांनी आपल्या स्वातंत्र्याचा बचाव केला पाहिजे, आपल्यापुढील अनेक गुंतागुंतीचे सामाजिक प्रश्न सोडविले पाहिजेत, यावर नेहरूंनी भर दिला होता. आणि ते योग्यच होते. हे प्रश्न खरोखरच गंभीर आणि निकडीचे आहेत, असे नेहरूंनी मुद्दाम भर देऊन सांगितले होते. आफ्रो–आशियाई एकतेची चळवळ, ही केवळ ऐतिहासिक अपरिहार्यतेमुळे, भौगोलिक शेजारधर्मामुळे, किंवा समान सामाजिक, आणि आर्थिक प्रश्न उद्‌भवल्यामुळे आधारित झालेली नसून फार मोठ्या विशाल काळावर ही आधारित आहे, असेही बजावण्यास नेहरूंनी कमी केले नाही. या सर्व आफ्रो–आशियाई देशांसमोर पूर्वीप्रमाणेच आजही अनेक समान प्रश्न आहेत; त्यामुळेच या सर्व देशांत एकजुटीची चळवळ ही फोफावत आहे. या सर्व देशांना एकत्र गुंफणारा मुख्य धागा हा आहे की, वसाहतवादाविरुद्ध आणि वंशवादाविरुद्ध सगळ्यांनाच लढायचे आहे. वसाहतवाद, आणि वंशवाद, मग ते कोणत्याही स्वरूपात असोत, सर्व आफ्रो–आशियाई देश त्यांना तीव्र विरोध करीत असतात. वसाहतवाद, आणि साम्राज्यवाद यांपासून स्वतःला मुक्त करून घेणे, हाच आफ्रो-आशियाई एकतेचा मुख्य आधारस्तंभ आहे. नेहरूंनी यावर वारंवार भर दिलेला आहे. नेहरूंच्या या आवाहनाला सर्वच आफ्रो–आशियाई देशांत नेहमीच उत्साही, आणि जोरदार प्रतिसाद मिळालेला आहे.

नववसाहतवाद्यांच्या कारस्थानांचा नेहरूंनी जोरदार धिक्कार केलेला आहे. आफ्रिकेतील जनतेच्या शौर्यशाली लढ्यांची नेहरूंनी उत्साहाने प्रशंसा केली आहे. आफ्रिकेतील जनतेत झालेली जागृती, आणि त्यांचा विमोचनसंग्राम, ही विसाव्या शतकातील एक महान घटना आहे, असे नेहरूंनी ठासून सांगितलेले आहे. आफ्रो-आशियाई एकतेच्या प्रश्नांवरील नेहरूंची मते, त्याचप्रमाणे निरनिराळ्या देशांतील प्रगतिशील सर्व चळवळींनी एकत्र येण्याची आवश्यकता, याबाबतची नेहरूंची मते, ही स्पष्ट आहेत. त्याचबरोबर आफ्रो-आशिया देशांत आणि अखिल जगात शांतता टिकविण्यासाठी लढा करणेही अत्यावश्यक आहे असेही नेहरूंनी ठासून सांगितले आहे. या दोन्ही मतांत कसलीही विसंगती नाही. ती परस्परांना पूरकच आहेत. नवस्वतंत्र देशांना राष्ट्रीय पुनर्रचनेचे कार्य, तसेच पुनरुद्धाराचे कार्य त्याचा

प्रमाणे त्यांना आव्हान देणारे दुसरेही अनेक प्रश्न केवळ शांततेच्या वातावरणातच सोडविता येतील यासाठी जागतिक शांततेचा कधीही भंग होऊ देता कामा नये असेच नेहरूंनी वारंवार ठासून आणि भर देऊन सांगितले आहे.

इराक्ली आबाशिदझे
कवी, नेहरू पारितोषिकाचे विजेते

नेहरूंविषयी अनुभव

डिसेंबर १९५६ ! दिल्ली येथे आशियाई लेखकांची परिषद ! नेहरूजी व्यासपीठावर चढले आणि मी त्यांना ताबडतोब ओळखले. 'भारताचा शोध' हे त्यांचे पुस्तक रशियन भाषेत १९५५ सालीच प्रसिद्ध झाले होते, आणि मी, ते पुस्तक चांगलाच रस घेऊन वाचले होते. आता मी ते पुस्तक लिहिणाऱ्या लेखकाला समक्षच पहात होतो. मी जोराजोराने टाळ्या वाजवायला सुरूवात केली. मी टाळ्या त्या संस्मरणीय अधिवेशनातच वाजविल्या असे नव्हते. खरं म्हणजे मी गेले वर्षभर टाळ्या वाजवीतच होतो. पुस्तक वर्षापूर्वी पहिल्याने वाचल्यापासूनच ! ह्या प्रसंगी माझ्या समोर एक महान योद्धा उभा होता. ह्या योद्धयाने वसाहतवादी ब्रिटिशांच्या तुरुंगात अनेक वर्षे कारावास भोगला होता. आशियातील एक विचारवंत म्हणून नेहरू विख्यातही होते. कलावन्त म्हणूनही नेहरूंची ख्याती होती. आणि आज तर ते स्वतंत्र भारताचे पंतप्रधान होते. नेहरूंनी स्वतः बद्दल एकदा म्हटले होते,

"मी सुद्धा एक जगावेगळाच माणूस होतो. माझ्या हृदयातही काहीतरी खोल दडलेले होते. हे गूढ मला स्वतःला कधीच उकलले नाही."[1]

बहुधा मला नेहरू कधीच समजले नसावे, आणि आत्तासुद्धा मला नेहरू खरोखर समजतात की नाही याची शंकाच आहे. नेहरूंचे व्यक्तिमत्वच तसे गुंतागुंतीचे आहे. पण मला असे वाटते की, नेहरूंच्या विचारातील मुख्य गाभा माझ्या लक्षात आलेला आहे. भारताच्या या थोर सुपुत्राच्या विचाराचे सार माझ्या लक्षात आले आहे. माणसाचे जीवन सध्याच्या पेक्षा पुष्कळच जास्त सुखावह झाले पाहिजे यावर नेहरूंचा दृढ विश्वास आहे. समग्र मानव जात सध्या जे जीवन जगत आहे त्यापेक्षा जास्त चांगले जीवन जगण्याला ती खरोखरच लायक आहे. आणि तिचा तो हक्कही आहे. हेच नेहरूंच्या विचाराचे सार आहे. आपले जीवन जास्त सुखी व्हावे यासाठी मानवजातीने कोणता मार्ग स्वीकारला पाहिजे याचीही नेहरूंना कल्पना आली होती. नेहरूंच्या समोर सोविएत युनियनचे जिवंत उदाहरण होते. सोविएत युनियन म्हणजे लेनिनची कर्मभूमी. लेनिनबद्दल नेहरूंना अतीव आदर नेहमीच वाटत होता.

१. 'भारताचा शोध', पान २७.

भारताच्या पंतप्रधानांनी फारच सुंदर भाषण केले. त्यांनी त्यांचे भाषण महात्म गांधीच्या 'त्या' सुप्रसिद्ध मागणीवरच आधारले होते. महात्मा गांधीनी अशी मागणी केली होती.

"आज आपण जीवनावश्यक गोष्टी जनतेला दिल्या पाहिजेत...मला आज अशी कला आणि साहित्य पाहिजे की जे कोट्यवधी जनतेला समजू शकेल."[२]

साम्राज्यवादाविरुद्ध लढणाऱ्या भारतातील कलावंतांना आणि साहित्यिकांना उद्देशून महात्मा गांधीनी वरील उद्‌गार काढले होते. नेहरूंनी जगातील सर्वच सृजनशील कलावंताना व साहित्यिकांना उद्देशून आवाहन केले होते की "जागते रहा. साम्राज्यवाद्यांची कारस्थाने चालूच आहेत" जागतिक शांततेसाठी आपले प्रयत्न द्विगुणित उत्साहाने चालू ठेवा, मानवजातीने आतापर्यंत साध्य केलेल्या प्रगतीचे संरक्षण करा, मानवतावादाच्या महान सुंदर ध्येयाचा झेंडा फडकत ठेवा, स्वातंत्र्य आणि लोकशाही चिरंतन टिकवून धरा असे आवाहनही नेहरूंनी जगातील सर्व सृजनशील साहित्यिकांना व कलावंताना केले होते. नवस्वतंत्र देशातील लेखकांवर तर त्यांनी आपल्या आवाहनात खास भर दिला होता. हे नवस्वतंत्र देश स्वतंत्र रीतीने आपला विकास नुकतेच साधू लागल्यामुळे या देशातील लेखकांना खास आवाहन करणे नेहरूंना आवश्यक वाटत होते. या लेखकांसमोर असलेल्या अडचणींचीही नेहरूंना जाणीव होती या लेखकांसमोर असलेल्या प्रश्नांची विशेषतः त्यांच्या भाषेच्या आणि साहित्य क्षेत्रातील विकासाशी निगडीत असलेल्या प्रश्नावरही नेहरूंनी प्रकाश टाकला होता आणि मार्गदर्शनही केले होते.

नेहरूंचा हा मुद्दा आम्हा सोविएत लेखकांच्या तर तावडतोब लक्षात आला. सोविएत युनियनच्या नेत्रदीपक विकासकार्यातील सोविएत कलावंत आणि साहित्यिक यांची कामगिरीही तितकीच नेत्रदीपक विकासकार्याच्या प्रत्येक अवस्थेत ही कामगिरी सहज डोळ्यांत भरते. सोविएत लेखकांनी आणि कलावंतांनी समाजवादाच्या आणि साम्यवादाच्या प्रस्थापन कार्यात आणि विकास कार्यात केलेल्या कामगिरीचे मोल हे कोणीही नाकारू शकणार शकणार नाही. त्याचप्रमाणे आमच्या सोविएत मातृभूमीच्या शत्रूंशी झालेल्या झगड्यात आणि युद्धात सोविएत साहित्यिकांनी आणि कलावंतांनी बजावलेल्या महान कामगिरीचाही कोणाला विसर पडणे शक्य नाही.

सोविएत वाङ्मय आणि इतर देशातील वाङ्मय आणि कला यांना प्रचंड अनुभव मिळाला असला पाहिजे अशीही जवाहरलाल नेहरूंना बहुधा जाणीव असावी. सोविएत युनियनमधील वास्तव जीवनाचा नेहरूंनी चांगलाच अभ्यास केला होता. सोविएत युनियनमधील मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मानवी प्रयत्नांनी अनेक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. नेहरूंच्यावर याचा खोलवर परिणाम झाला होता.

२. कित्ता, पान ३४२.

—जून १३, १९५५! भयंकर उकडत होते. आम्ही त्बिलीसी विमानतळावर भारतीय पाहुण्यांची वाट पहात होतो. आपल्या पाहुण्यांना योग्य अशी हवाही आपण निर्माण केली आहे असा विनोदही करीत होतो. नेहरू त्बिलीसी विमानळावर उतरले. त्यांच्यावरोवर त्यांच्या सुकन्या इंदिरा गांधी होत्या. आणि त्यांच्या परिवारात आणखीही काही मंडळी होती.

विमान जमिनीला टेकल्यावरोवर विमानाचा दरवाजा उघडला आणि राष्ट्रीय पोषाखातील एक उंच आणि नाजूकशी व्यक्ती पायऱ्या उतरू लागली. त्या व्यक्तीच्या हातात एक चंदनी काठीही होती. ही व्यक्ती चालत चालत ध्वनिक्षेपकाजवळ गेली. आणि या व्यक्तीने स्वागताच्या भाषणाला प्रत्युत्तर दिले.

" तुमच्या या विशाल देशात ज्या ज्या ठिकाणी आम्ही गेलो त्या त्या ठिकाणी आमचे हार्दिक स्वागत करण्यात आले. या सभांतील वातावरणच असे होते की आम्हाला आपल्या कुटुंबातच आलो आहोत असे वाटले. भारतीय जनता आणि सोविएत जनता ही खरोखरच एकाच गोतावळ्यातील आहेत. अशीच आमची भावना झाली...शांतता टिकवून ठेवणे ही एक तातडीची कायमची गरज आहे असे मला नेहमीच वाटते. आणि आजच्या काळात तर शांततेची खासच गरज आहे. यात मला शंका वाटत नाही. " [३]

त्याच दिवशी आमच्या सन्माननीय पाहुण्यांसाठी एक सहलीचा कार्यक्रम आम्ही आयोजित केला होता. त्बिलीसी शहरापासून खूप उंच असलेल्या डोंगरावरील एक सरळ उभ्याने उंच जाणारी रेल्वे (फनीक्युलर रेल्वे) आम्ही त्यांना दाखविणार होतो. डोंगराच्या शिखरावरील निरीक्षणकेंद्र त्यांना दाखविणार होतो. एखाद्या व्यासपीठासारखे किंवा मचाणासारखे हे केंद्र बांधण्यात आले होते. या केंद्रावरून पायथ्याशी असलेले शहर फारच सुंदर दिसते. आणि रात्री जेव्हा बिजलीच्या बत्त्या शहरात चमकू लागतात तेव्हा तर तो देखावा विशेषच सुंदर दिसतो. आणि पहाणारा माणूस अगदी भारावून जातो. नेहरू आणि इंदिरा गांधी या दोघांनीही हा देखावा पाहून प्रसंशेचे उद्गार काढले.

दुसऱ्या दिवशी नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी रूस्तावी शहराला भेट दिली. हे शहर त्बिलीसीपासून वीस किलोमीटर अंतरावर आहे. गेल्या युद्धानंतर ते वसविण्यात आले. आज रूस्तावी सोविएतचे लोखंड आणि पोलाद उद्योगाचे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. शहरात चक्कर मारून झाल्यानंतर नेहरूंनी सांगितले की, लवकरच सोविएत मदतीने भारतातही एक लोखंड आणि पोलाद प्रकल्प उभारण्याच्या कार्याला सुरुवात होईल. अर्थात ते भिलाईच्या पोलाद कारखान्याबद्दलच बोलले होते. आज तर अर्थातच भिलाई कारखाना हा विश्वविख्यात झालेला आहे.

जाता जाता सहज आठवले म्हणून सांगतो. भिलाई येथे जॉर्जियन तज्ज्ञही पुष्कळ वर्षे

३. ' सोविएत लँड', १९७३ क्रमांक १०.

काम करीत होते. १९५६ साली मी दिल्लीतील जनपथ हॉटेलमध्ये रहात असताना भिलाई येथे काम करीत असलेल्या जार्जियन अभियंत्यांचा एक गट मला भेटायला आला होता. त्यांनी मला त्यांच्या भारतातील वास्तव्यातील अनेक गमती सांगितल्या. असो, आपल्याला पुन्हा त्बिलीसीला गेले पाहिजे.

नेहरूंनी आणि त्यांच्या परिवारातील मंडळींनी शहरात आणि आसमंतात चक्कर टाकली आणि शहर पाहिले. १५ जूनला नेहरूंनी प्रयाण केले. तत्पूर्वी नेहरूंनी प्रयाणापूर्वी एक दिवस अगोदर म्हणजे १४ जूनला निरोपाचे भाषण केले होते. हे भाषण शहरातील विमानतळावर झाले होते. नेहरू म्हणाले होते,

" याप्रसंगी तुमच्यासमोर, सूर्यप्रकाशाने नेहमीच प्रज्वलित असलेल्या जॉर्जियाला साक्षी ठेवून मी माझ्या शुभेच्छा व्यक्त करतो. ही भेट माझ्या कायमची स्मरणात राहील. "

जाता जाता आणखीनही एक गोष्ट सांगावीशी वाटते. त्यापूर्वी सोविएत युनियनला नेहरूंनी दिलेल्या भेटीतच ती आम्हाला समजली आणि नेहरूंनी आत्मसात केलेल्या एका विद्येची आपोआपच माहिती झाली. स्वेरदोलोवस्कच्या भूगर्भ शास्त्रीय संग्रहालयाला नेहरूंनी भेट दिली होती. संग्रहालयाला भेट देण्यासाठी आलेल्या लोकांसाठी ठेवण्यात आलेल्या शेरेवुकात नेहरूंनी खालील शेरा दिला आहे—

" हे फारच सुंदर संग्रहालय आहे. प्रत्येकाला हे मनोरंजकच वाटेल. ज्यांनी भूगर्भ शास्त्राचा अभ्यास केलेला आहे त्यांना तर हे खासच मनोरंजक वाटेल. मी माझ्या विद्यार्थी-दशेत भूगर्भ शास्त्राचा अभ्यास केला असल्यामुळे मला हे फारच मनोरंजक वाटले. येथे जमा करून ठेवलेल्या धातूंचा संपूर्ण अभ्यास करावा, असे आकर्षण मला वाटू लागले आहे. "

हे आणि नेहरूंच्या जीवनातील इतर दुसऱ्या पुष्कळ गोष्टीही त्या वेळी मला माहीत नव्हत्या. जून १९५५ सालपर्यंत ' भारताचा शोध ' हे नेहरूंचे पुस्तक सोविएत वाचकांच्या हातात पडले नव्हते. पण मला मात्र त्या वर्षीच म्हणजे १९५५ सालीच नेहरूंचा ' शोध ' लागला होता. किंवा ' शोध ' लागायला सुरुवात झाली होती असे पाहिजे तर म्हणा.

...हे लिहीत असताना माझ्यासारख्या लेखकावर केवढी प्रचंड जबाबदारी येऊन पडते याची जाणीव होते. या महान भारतीयाच्या नावाने ठेवण्यात आलेले नेहरू पारितोषिक मिळविण्याचा मान मला मिळाला आहे. त्या ओझ्याखाली छाती अगदी दडपून जाते. आपण पृथ्वी या ग्रहावर वसती करून राहात आहो. आपली धरित्री म्हणजे खरोखरच एक प्रचंड घर आहे. आणि या घराच्या छायेत निरनिराळे नानातऱ्हेचे लोक राहात आहेत. आपल्या या घरावर वज्राघात होण्याचाही संभव आहे. तो टाळायचा असेल तर पृथ्वीवर शांतता टिकविली पाहिजे आणि जवाहरलाल नेहरूंइतक्याच एकनिष्ठेने प्रत्येकाने शांततेचा पाईक बनले पाहिजे. जवाहरलाल नेहरूंइतक्याच कळकळीने शांततेचा पुरस्कार केला पाहिजे. त्यांनी जसे संपूर्णपणे शांततेच्या कार्यास आपले जीवन समर्पित केले होते त्याप्रमाणे प्रत्येकाने केले पाहिजे.

मला नेहरू पारितोषिक मिळाले ते मुख्यतः एकाच कारणासाठी. सोविएत बुद्धिमंतांनी भारतीय आणि सोविएत जनतेतील बंधुभाव दृढ व्हावा आणि वाढावा यासाठी प्रचंड कामगिरी केली आहे. मीही त्या महान कार्यातील एक नम्र कार्यकर्ता होतो. साऱ्या मानव जातीचा भविष्यकाल उज्ज्वल ठरावा यासाठी लढा करावा लागणार याचीही सोविएत बुद्धिमंतांना पूर्ण जाणीव आहे. आणि त्या लढ्यातील आम्ही एक खंदे सैनिक आहोत याचीही त्यांना जाणीव आहे. या लढ्यात आम्हाला कोणती भूमिका करायची आहे हेही आम्ही सोविएत बुद्धिमंत जाणतो. मानवजातीच्या बाबतीत आमचे काय कर्तव्य आहे हेही आम्ही जाणतो.

रसूल झा
अझरबैजानचे एक कवी

ते माझ्या गीतात वास करीत आहेत

मी भारताला दोन वेळा भेट दिली आहे. माझ्या दुसऱ्या भेटीच्या वेळी सुदैवाने मला नेहरूंना भेटण्याचा योग आला होता. १९६३ सालची ही गोष्ट ! सोविएत संसदेचा एक सदस्य या नात्याने त्याच वेळी मला भारतीय संसदेच्या एका अधिवेशनाला हजर राहण्याचीही संधी मिळाली होती. एका अधिवेशनाच्या समाप्तीनंतर पंतप्रधान नेहरू हे त्यांच्या निवासस्थानी आमची उद्या भेट घेणार आहेत, असे आम्हांस सांगण्यात आले.

आम्ही सकाळी ठीक ११ वाजताच पंतप्रधानांच्या निवासस्थानी हजर झालो. तेथे एका अत्यंत साध्या रीतीने सजविलेल्या खोलीत आम्हाला ' बसा ' म्हणून सांगण्यांत आले. पलीकडेच भारताच्या पंतप्रधानांची अभ्यासिका होती. दारातच एक मध्यवयीन लष्करी गणवेशातील माणूस उभा होता. आम्हाला ' बसा ' म्हणून सांगितल्यानंतर तो नेहरूंच्या अभ्यासिकेत गेला, आणि ताबडतोब परत येऊन त्याने आम्हाला सांगितले, की, नेहरू आमची वाट पाहात आहेत.

विशेषतः हा क्षण माझ्या स्मृतीत अगदी चांगलाच कोरला गेला आहे. दिलखुलास हसून नेहरूंनी आमचे स्वागत केले होते. नेहरू विचारमग्न होते. त्यांच्या डोळ्यांत तसे स्पष्ट दिसत होते. आमची बातचीत अर्धा तास चालू होती. नेहरूंनी आम्हाला सोविएत युनियनमधील विज्ञान, आणि साहित्य यांची प्रगती कशी होत आहे, याबाबत अनेक सर्वसाधारण प्रश्न विचारले. विशेषतः सोविएत राष्ट्रगटातील लोकसत्ताकांच्या प्रगतीबद्दल त्यांना जास्त जिज्ञासा होती, असे दिसले. सोविएत राष्ट्रगटातील लोकसत्ताके आपल्या राष्ट्रीय परंपरांचे कसे जतन करीत आहेत, आणि त्या परंपरा कशा विकसित करीत आहेत, हे नेहरूंना समजावून घ्यायचे होते. याबाबतीत ते अत्यंत रस घेत होते, असे दिसले. सोविएत युनियनमध्ये निरनिराळ्या राष्ट्र-गटांतील लोकसत्ताकांतील भाषा, आणि त्यांचे वैशिष्ट्य, कशा तऱ्हेने जतन करण्यात येत आहे, याबद्दल नेहरूंना तीव्र जिज्ञासा होती. भारताच्या बाबतीत मी लिहिलेल्या कवितांमध्येही नेहरूंनी फार रस घेतलेला दिसला. अझरबैजानियन भाषेमध्ये भाषांतरित केलेला रवींद्रनाथ टागोरांच्या गोष्टींचा एक कथासंग्रहही मी नेहरूंना सादर समर्पित केला. या कथासंग्रहाच्या अझरबैजानियन भाषेतील अनेक आवृत्त्या खपल्या होत्या, हेही मी नेहरूंच्या निदर्शनास आणून दिले. नेहरूंना या भेटीमुळे अत्यंत आनंद झाला होता, हेही मला दिसले. माझे आभार मानून नेहरू म्हणाले की, अनंत काळापासून

आशिया खंडातील सर्व देशांतील जनतेने सांस्कृतिक, आणि वैज्ञानिक क्षेत्रांतील परस्पर-देवाणघेवाण, आणि संबंध जिवंत ठेवले आहेत. ही देवाणघेवाण आणि हे सांस्कृतिक संबंध जास्त विकसित करण्याची हीच वेळ आहे. साहित्य आणि काव्य हे पूर्वेकडील निरनिराळ्या देशांतील जनतेला एकमेकांत संपर्क साधण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. पूर्वेकडील देशांतील जनतेला जोडणारे हे पुलासारखे दुवेच आहेत. या पुलामुळे काळ, आणि भौगोलिक अंतर, राजकीय मतमतांतरे, यांनी परस्पर संपर्क साधण्यात निर्माण झालेले सर्व अडथळे दूर होतील. साहित्य आणि कला यायोगे निरनिराळ्या देशांतील लोकांना दुसऱ्या देशांतील लोकांचा आत्मा, आणि अंतर्मन समजू शकेल.

संभाषणाच्या शेवटी नेहरूंनी आम्हाला असे आश्वासन दिले होते, की भारतातील आमचे वास्तव्य जास्तीत जास्त सुखदायक आणि उपयुक्त व्हावे, यासाठी त्यांना जे जे काही करणे शक्य आहे, ते सारे ते करतील. काही लोक असे असतात की, वर्षानुवर्षे ते भेटत असूनसुद्धा त्यांच्या भेटी बंद होतात, तरीही तुम्हाला कसलीही खंत वाटत नाही. पण काही लोक तुम्हाला आयुष्यात एकदाच भेटतात, आणि तुमच्या मनावर त्यांची स्मृती कायमची कोरली जाते. नेहरू हीही एक अशीच व्यक्ती होती. मी त्यांची आठवण कधीच विसरणे शक्य नाही. अगदी मरेपर्यंत !

रशीद बैबुतोव
सोविएत युनियनचे लोककलाकार

माझ्या जीवनातील भारत

रंगीत स्वप्ने फारच थोड्या माणसांना पडतात, असे म्हटले जाते पण अशी रंगीत स्वप्ने मला भारताच्या भेटीमध्ये पडली होती. मी भारताला चार भेटी दिल्या होत्या. १९५३ साली मी भारताला पहिली भेट दिली होती. माझ्या कार्यक्रमांच्या वेळी सभागृहात सारा भारत देश हजर आहे, असे मला वाटे. मी निरनिराळ्या अनेक शहरांना आणि खेड्यांनाही भेटी दिल्या. मी बंदिस्त व्यासपीठावरही गायलो, आणि खुल्या मैदानातही गायलो. कित्येक वेळा तर, आगमन झाल्याबरोबर रेल्वे स्टेशनावरही गायलो. माझा भारतीय श्रोतृवृंद रसिक होता, आणि म्हणूनच त्यांना न समजणाऱ्या रशियन, अगर अझरबैजानी भाषेत जरी मी गात होतो, तरी भारताच्या रसिकांची गुणग्राहकता प्रत्ययास येत होती. तसे पाहिले, तर हिंदीमध्ये मी फक्त एकच भारतीय गाणे म्हणत होतो. ते म्हणजे 'सारे जहाँसे अच्छा'. रशियन आणि अझरबैजानी गाणी माझ्या भारतीय श्रोतृवृंदाला फार फार आवडली. अनेक निरनिराळी सभा-संमेलने माझ्या स्मृतीवर कायमची कोरली गेली आहेत. पण त्यातही नेहरूंबरोबर झालेली माझी भेट, ही फार खोलवर कोरलेली आहे. माझ्या पहिल्या दोन भारत-भेटीत मी त्यांना भेटलो होतो. नवी दिल्ली येथील आपल्या प्रासादतुल्य निवासस्थानात नेहरूंनी आमची भेट घेतली होती. आम्हाला बगीच्यात एक मेजवानीही देण्यात आली होती, त्या प्रसंगी नेहरूंनी मला गाठले, आणि म्हटले,

"मी असे ऐकतो की तुम्ही भारतीय गाणीही म्हणता. अगदी आमच्याइतकी चांगली म्हणता! म्हणा बघू एक गाणे! माझ्याकरिता तरी म्हणाच!"

मी 'सारे जहाँसे अच्छा' म्हटले. गाणे संपल्याबरोबर नेहरूंनी मला सांगितले, की त्यांनी अगदी काळजीपूर्वक शब्दन् शब्द ऐकला होता आणि माझे उच्चार जवळजवळ अगदी परिपूर्ण आहेत, अशीही त्यांनी मला शाबासकी दिली होती. मी हिंदी भाषेचा बऱ्याच दिवसांपासून अभ्यास करीत असलो पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. खरोखर त्यांना त्याचे आश्चर्यच वाटत होते. त्यानंतर नेहरूंनी आम्हाला जेवायला बोलाविले होते. 'पुलावाचा बेत' होता. तांब्याच्या ताटात आम्ही जेवलो. नेहरू हातानेच जेवले. मीही त्यांचेच अनुकरण केले. नेहरू दिलखुलास हसले, आणि मला म्हणाले की, त्यांच्याइतकेच कौशल्य दाखवून मीही झकास जेवत आहे. ही आमची पार्टी पुष्कळ तास चालली होती. आणि भलताच मजा आला होता. निरोप घेताना नेहरूंनी आम्हाला विचारले होते, की

त्यांनी आम्हाला पुन्हा जेवण्याचे निमंत्रण दिले, तर आम्ही येऊ शकू का ? मी उत्तर दिले होते, की भारत ही आता माझी दुसरी मातृभूमीच झाली आहे. त्यावरोवर नेहरूंनी मला एकदम आलिंगन दिले, आणि ते म्हणाले,

" अगदी लवकरात लवकर आपण पुन्हा भेटू. मला फार आनंद वाटेल. " परत अझरबैजानमध्ये आल्यावरोबर मी आणखीनही काही भारतीय गाणी ध्वनिमुद्रित केली. त्यानंतर काही वर्षांनी मी परत भारताला भेट दिली, आणि पुन्हा नेहरूंना भेटलो. या प्रसंगीही आमची भेट त्यांच्या बगीच्यातच झाली. नेहरूंनी एक जुना मित्र म्हणूनच माझे स्वागत केले. मी आणखी काही नवीन भारतीय गाणी शिकून आलो असलो पाहिजे, याची त्यांना खात्री होतीच. नेहरू इतर सोविएत प्रतिनिधींकडे वळले, आणि थट्टेने म्हणाले,

" तुमच्यापैकी पुष्कळ जण प्रथमच भारताला भेट देत असतील. पण तुमच्यावरोबर आमचाही एक प्रतिनिधी आहेच. (त्यांनी माझ्याकडे वोट दाखविले.) तुम्हाला जर काही अडचण आली तर तुम्ही ताबडतोव रशिदकडे जा. तो त्या अडणीचे ताबडतोव निराकरण करील. "

त्यानंतरही मी दोन वेळा भारताला भेट दिली.

इंदिरा गांधींचे निमंत्रण आल्यामुळे मी भारताला भेट दिली होती. ही माझी शेवटची भेट. भारतामध्ये सोविएत गाण्यांची मैफल झाली आणि या मैफलीत गाण्याकरिताच मी भारतात आलो होतो. या प्रसंगी सोविएत, गायकांच्या कलापथकाचा मी कला-दिग्दर्शक होतो. एक जुना मित्र म्हणूनच श्रीमती गांधींनी माझे स्वागत केले होते. यापूर्वीही त्यांनी माझ्या अनेक गायनाच्या जलशांना भेट दिली होती. त्यांना माझी भारतीय गाणी, आणि त्याचप्रमाणे मी गायलेली सोविएत जनतेची गाणीही फार आवडली होती. तेरा शहरांत माझ्या गायनाचे जलसे झाले, याकरिता एक खास दौराच आखण्यात आला होता. या मैफलीत मी भारतीय आणि सोविएत युनियनच्या निरनिराळ्या भागांत प्रचलित असलेली गाणी म्हटली. माझ्या शेवटच्या मैफलीच्या वेळी खुद्द इंदिरा गांधी व्यासपीठावर आल्या, आणि त्यांनी मला पुष्पहार अर्पण केला.

एलमिरा रागिमोवा
अझरबैजानी प्रजासत्ताकाच्या मान्यवर कलावंत

नेहरू मला वडिलांच्या ठिकाणी होते

भारताच्या संगीतामधूनच मी भारताला 'शोधू' लागले. त्या संगीतापासूनच माझा 'भारताचा शोध.' २१ जानेवारी १९५५ रोजी भारताचा वार्षिक 'स्वातंत्र्यदिन' साजरा करण्यात आला होता. त्यानिमित्ताने एक जलसाही भरविण्यात आला होता. या जलश्यात भारतीय चित्रपटातील गाणी म्हणण्यासाठी मलाही आमंत्रित करण्यात आले होते. मी "आवारा" आणि "बैजू बावरा" या चित्रपटातील गाणी म्हटली. या प्रसंगी भारताचे सोविएत युनियनमधील राजदूत के. पी. एस. मेनन हेही उपस्थित होते. गाण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर श्री. मेनन यांनी माझे आभार मानले. माझ्या गाण्यामुळे त्यांना फारच आनंद झालेला दिसला. ते जेव्हा यानंतर दिल्लीला जातील तेव्हा भारताचे पंत-प्रधान नेहरू यांच्याजवळ माझ्याबद्दल बोलतील असेही त्यांनी मला आश्वासन दिले होते.

माझ्या पहिल्या भारतभेटीच्या पुष्कळच अगोदर मी अझरबैजानी श्रोतृवृंदासमोर भारतीय गाणी म्हणत होते. अझरबैजानी श्रोतृवृंदाने या गाण्यांचे खूपच कौतुक केले होते. आणि अत्यंत उत्साहाने टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला होता. गाण्याच्या बरोबरच मी भारतीय नृत्येही करीत असे. या नृत्यात मी माझ्या मनाने बरेच फेरबदल केले होते. अर्थात ही नृत्ये भारतातील चित्रपटातील नृत्यांवरूनच मी बसविली होती.

सप्टेंबर १९५७ मध्ये मला खुद्द जवाहरलाल नेहरूंचीच तार मिळाली. खुद्द त्यांनीच मला भारतभेटीचे निमंत्रण दिले होते. मला अगदी जगज्जेत्यासारखे वाटले. थोड्याच दिवसांनी माझ्या मित्रांचा निरोप घेऊन मी दिल्लीला प्रयाण केले.

त्या आश्चर्यकारक देशात मी पाऊल टाकल्याबरोबर माझ्या सन्मानार्थ इतके स्वागत-समारंभ आयोजित करण्यात आले होते की कधी कधी तर त्याबद्दल बोलणे सुद्धा मला अवघड वाटते. ह्या सगळ्या समारंभांमध्ये पंडित नेहरूंबरोबर झालेली माझी भेट माझ्या स्मृतीवर साहजिकपणेच जास्त खोलवर कोरली गेली आहे. या भेटीची स्मृती ही मला खास सुखावह वाटते. रवींद्रनाथ टागोरांनी स्थापन केलेल्या शांतिनिकेतन विश्वविद्यालयात पंडित नेहरूंच्याबरोबर माझी प्रथम ओळख करून देण्यात आली. या विद्यापीठात कला शाखेत मी एक प्रथम वर्षाची विद्यार्थिनी होते.

माझ्याबरोबर असलेल्या विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी नेहरू येतील तेव्हा मी साडी नेसली पाहिजे असा आग्रह धरल्यामुळे मला साडी नेसावीच लागली. नंतर आम्ही नेहरू जिथे

बसले होते त्या दिवाणखान्यात प्रवेश केला. विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्साहपूर्ण स्वागताचा स्वीकार करून नेहरूंनी विचारले,

" सोविएत युनियनमधून आलेली मुलगी कुठे आहे ? "

त्यावेळी मी नेहरूंच्या अगदी शेजारीच उभी होते. ते मला भारतीय मुलगीच समजले होते. जेव्हा नेहरूंना माझी ओळख करून देण्यात आली तेव्हा त्यांच्या डोळ्यांत थोडीशी नापसंतीच मला दिसली. पार्टीमधील सगळ्या लोकांच्याकडे वळून ते म्हणाले,

" या मुलीला मी उद्या माझ्याबरोबर चहा पिण्यासाठी आमंत्रण देत आहे. पण तिने तिच्या राष्ट्रीय पोषाखातच आले पाहिजे. "

दुसऱ्या दिवशीच सकाळी मी माझा अझरबैजानी पोषाख चढवून नेहरूंच्याकडे गेले. शांतिनिकेतन विद्यापीठातील सगळे परदेशी विद्यार्थी तेथे हजर होते. नेहरूंनी माझे स्वागत केले आणि म्हणाले,

" आता मात्र तू सोविएत युनियनमधून आली आहेस, अशी माझी खात्री पटली. "

साऱ्या समारंभात मी अगदी नेहरूंच्या शेजारी बसले होते. एकदा त्यांनी मला अझरबैजानी राष्ट्रीय गाणी म्हणण्यासही सांगितले. खरोखरच नेहरू किती साधे होते ! लोकांना स्वतःकडे आकर्षित करून घेणारे ते एक जादूगारच होते. सारखी थट्टामस्करी व विनोद करीत होते. स्वतःही दिलखुलास हसत होते व दुसऱ्यासही हसवत होते ! ते म्हणाले,

" तू खरोखरच अगदी भारतीय मुलीसारखी दिसतेस. खरोखरच हे एक आश्चर्य आहे. कदाचित विचाराची तंद्री लागल्यामुळे परमेश्वराने तुला भारतात जन्माला घालण्याऐवजी अझरबैजानमध्ये जन्माला घातले असावे. "

मी काही अझरबैजानी गाणी म्हटली. त्यानंतर नेहरूंनी मला भारतीय गाणी म्हणण्याबद्दल सांगितले, ते म्हणाले,

" शक्य असेल तरच अं ! "

मी पाहिलेल्या चित्रपटातील फिल्मी गाणी म्हटली. नेहरूंनी विचारले.

" या भावनात्मक गाण्यांचा अर्थ तुला समजतो का ? "

आणि मग स्वतःच त्यांनी प्रत्येक ओळीचा अर्थ सांगितला.

या साऱ्या समारंभात विद्यार्थी–विद्यार्थिनींनी नेहरूंना वेढाच घातला होता. जाताजाता सहज सांगून टाकते की या संस्मरणीय समारंभानंतर माझ्या विद्यार्थी मित्र–मैत्रिणींनी मला " मीरादी " म्हणून हाक मारण्यास सुरुवात केली. " मीरा " ही एक प्रसिद्ध भारतीय कवयित्री होऊन गेली. भारतीय जनतेवर तिचे अपार प्रेम होते. नेहरूंही मला " मीरादी " म्हणून हाक मारू लागले. " मीरा "ने जी भारतीय राष्ट्रीय गाणी लिहिली आहेत, ती म्हणायला अतिशय कठीण आहेत असे समजले जाते. एक अभिजात मंजूळ, स्वरमधुर गाणे नेहरूंनी जेव्हा आमच्या विद्यापीठाला दुसरी भेट दिली तेव्हा मी म्हणून दाखविले. त्यावेळी पदवीधर विद्यार्थ्यांच्या दीक्षान्त समारंभासाठी ते आले होते.

प्रथम एक वर्षभर भारतात राहण्याचे मी ठरविले होते. या वर्षाच्या अखेरीस आणखी एक वर्षभर भारतात राहाल का ? असे मला विचारण्यात आले. मी या निमंत्रणाचा आनंदाने स्वीकार केला आणि आणखी एक वर्ष भारतात घालविले. या दुसऱ्या वर्षात मी भारताच्या अनेक राष्ट्रीय नृत्यांवर प्रभुत्व मिळविले.

या माझ्या भारतातील वास्तव्यात नेहरूंना भेटण्याचे दोन प्रसंग आले. सरकारी कामाचा अफाट बोजा असताना सुद्धा माझ्या विद्यापीठातील शैक्षणिक प्रगतीची नेहरू नेहमीच आस्थेवाईकपणाने चौकशी करीत असत, असे मला अनेक लोकांकडून समजले होते.

शांतिनिकेतन विद्यापीठातील माझा शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर तीन वेळा भारताला भेट देण्याची संधी मला मिळाली. नेहरूंनी महानिर्वाण केले होते. आता तर नेहरूंची पहिल्यांदा ओळख करून देण्यात आली तो दिवस पुष्कळच भूतकालात जमा झाला आहे. त्या प्रसंगानंतर अनेक वर्षे लोटली आहेत. पण या " पुरुषोत्तमाला " मी कधीच विसरणार नाही. त्याची स्मृती माझ्या हृदयात चिरकाल राहील. नेहरूंनी वैयक्तिक दृष्टीने माझ्या करिता फार फार केले आहे. खरोखर नेहरू म्हणजे मला वडिलांच्या ठिकाणी होते. आणि वडिलांच्याच ठिकाणी राहतील.

रोमन कार्मेन
चित्रपट दिग्दर्शक, लेनिन पारितोषिक-विजेते

नेहरू : आधुनिक भारताचे शिल्पकार

१९५५ सालचा एक प्रसंग मला आठवतो. मॅग्नीटोनाया पर्वतावर उभारलेल्या निरीक्षण केंद्रावर नेहरू उभे आहेत. या निरीक्षण केंद्रावरून पायथ्याशी असलेल्या मॅग्नीटोगॉर्स्क शहराचे ते निरीक्षण करीत होते. बरोबर असलेल्या एका सोविएत अधिकाऱ्याकडे पाहून ते म्हणाले होते,

" खाली असलेल्या या प्रचंड पोलादाच्या कारखान्याकडे पाहून मी फार फार प्रभावित झालो आहे. भारतामध्येही अशा तऱ्हेचे अनेक कारखाने आम्हाला बांधावेच लागतील. आम्ही आता झपाट्याने आर्थिक विकासाच्या मागे लागलो आहोत आणि म्हणून अशा तऱ्हेचे कारखाने आम्हाला बांधावेच लागणार. त्याशिवाय गत्यंतरच नाही."

नेहरूंच्या डोक्यात त्यावेळी सुद्धा भिलाईच्या प्रचंड कारखान्याचे चित्र प्रतिबिंबीत झाले असण्याची शक्यता आहे. कारण त्यानंतर थोड्यात दिवसांत सोविएत मदतीने भिलाईच्या पोलाद कारखान्याची योजना नक्की करण्यात आली.

यानंतर काही वर्षांनी सोविएत सरकारने भारताला एक सोविएत चित्रपटक्षेत्रातील प्रतिनिधि मंडळ पाठविले होते. मीही या प्रतिनिधि मंडळात होतो. नेहरूंची दुसरी भेट त्या प्रसंगी झाली. भारत आणि सोविएत या दोन महान देशांतील जनतेच्या मैत्रीवर नेहरूंनी अनेक भाषणे याप्रसंगी केली. मुख्यतः या मैत्रीवरच या भाषणांत त्यांनी जोर दिला होता. भारत-सोविएत मैत्रीवर नेहरूंचा संपूर्ण विश्वास होता. अत्यंत कळकळीने आणि पोटतिडकेने या मैत्रीबद्दल ते बोलत. भारत आणि सोविएत मैत्री अपरिहार्य आहे; कारण दोन्ही देशांच्या ऐतिहासिक विकासातूनच ती निर्माण झाली असल्यामुळे ती अत्यंत तर्कसुसंगतच आहे याबद्दल नेहरूंना दृढविश्वास वाटत होता.

सोविएत युनियनच्या प्रतिनिधि मंडळाने एक चित्रपट काढण्याची योजना आखली होती. आम्ही एक ' डॉक्युमेंटरी ' काढणार होतो. या ' डाक्युमेंटरी 'चे नाव होते, " भारताचा उषःकाल ". या संबंधात आम्ही नेहरूंना भेटलो. नेहरूंनी आमचे हार्दिक स्वागत केले होते. पटकथेवर अत्यंत मैत्रीपूर्ण वातावरणात चर्चा झाली. या प्रसंगी नेहरूंनी त्यांच्या मातृभूमीबद्दल आम्हाला पुष्कळच काही सांगितले. भारताचा भूतकाल, भारताची सध्याची परिस्थिती आणि भारताचा भविष्यकाल याबद्दल त्यांनी आमच्या ज्ञानात खूपच भर घातली. भारताच्या या महान सुपुत्राचे बोलणे मी अगदी लक्षपूर्वक ऐकले. अगदी रस घेऊन ते मी

निकोलाय पास्तुखोव
वृत्तपत्र व्यवसायी

भारताचे महान नागरिक

भारतीय जनतेची परिस्थिती सुधारण्याच्या कार्यासच नेहरूंनी आपले सारे जीवन समर्पित केले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यालाच नेहरूंनी आपले सारे जीवन अर्पण केले होते. नेहरू एक असामान्य मुत्सद्दी होते, एक ज्वलंत देशभक्त होते, आणि जागतिक शांततेच्या लढ्यातील एक एकनिष्ठ सैनिक होते. नेहरू एक उत्कृष्ट वक्ते होते, आणि सार्वजनिक कार्यकर्त्यांला आवश्यक असणाऱ्या अनेक गुणांची त्यांना देणगी मिळालेली होती. नेहरू हे एक मान्यवर विद्वान होते. आणि अनेक विषयांचा त्यांचा व्यासंग आणि अभ्यास दांडगा होता. आपल्या देशातील जनतेच्या इतिहासाचे आणि संस्कृतीचे त्यांना सखोल ज्ञान होते, भारतीय जनतेला त्यांनी अगदी जवळून पाहिले होते, आणि तिच्याशी ते अगदी एकात्मता पावले होते. नेहरू हे उदार आणि उमदे होते, अत्यंत प्रामाणिक होते, त्यांचे अंतःकरण अत्यंत दयाळू होते.

नेहरूंची बुद्धी अतिशय तीक्ष्ण होती, मार्क्सवाद, लेनिनवाद आणि रशियात झालेली ऑक्टोबर समाजसत्ता क्रांती ह्यांनी जगात कोणती कामगिरी बजावली आहे याचे नेहरूंना सखोल ज्ञान होते. जगातील पहिल्या समाजसत्तावादी राष्ट्राचे म्हणजेच सोविएत युनियनचे नेहरूंनी नेहमीच स्वागत केले होते. सोविएत युनियनच्या मानवतावादी सृजनशील तत्त्वांचे नेहरूंनी नेहमीच कौतुक केले होते. भारताचा राजकीय, आर्थिक, आणि सांस्कृतिक पुनरुद्धार हा नेहरूंचे जीवन आणि त्यांचे कार्य यांच्यापासून वेगळा काढताच येणार नाही. नेहरू भारतीय जनतेच्या विकासकार्याशी अगदी एकात्म झाले आहेत. प्रावदाचा खास बातमीदार म्हणून मी भारतात पुष्कळ दिवस काम केले. यावेळी मी नेहरूंना अनेक वेळा भेटलो. नेहरूंची संसदेतील भाषणेही ऐकली. त्याचप्रमाणे अनेक प्रचंड सभांतील भाषणेही ऐकली. अनेक प्रकारच्या समारंभांतीलही त्यांची भाषणे ऐकली. अनेक वार्ताहर परिषदांमध्ये तर मी उपस्थित असेच. भारतातील त्यांच्या दौऱ्यात आणि सोविएत युनियनमधील दौऱ्यातही मी त्यांच्याबरोबर होतो. त्यांच्याबरोबर अनेकवेळा बोलण्याचेही सद्भाग्य मला लाभले होते.

नेहरू हे ताठ मानेने चालत, आणि सदोदित अगदी जागृत असत. नेहरू आपल्या पोषाखाच्या बाबतीतही फार दक्ष असत. नेहरूंच्या वागण्या-बोलण्यात नेहमीच एक रसरशीत चैतन्य असे. माझ्यावर त्याचा फार परिणाम झाला होता. अनेक प्रसंगी काळजीपूर्वक काढलेल्या भाषणाच्या टीपा ते बाजूस ठेवून देत. आणि उत्स्फूर्त भाषण करीत. नेहरूंच्याजवळ

अत्यंत लवचिक अशी विनोदबुद्धी होती. पण प्रसंग पडला तर ते व्याजोक्ती आणि वक्रोक्ती यांचाही वापर करण्यास कमी करत नसत. अनेक प्रसंगी अगदी वर्मी लागणारी व झोंबणारी भाषणेही ते करीत. राजकीय विरोधकांशी त्याचे वाग्युद्ध जुंपले, की खुशाल समजावे ते आता विरोधकांना गप्प बसविणार ! आपली कैफियत ते इतकी सुसंबद्ध रीतीने मांडीत, की विरोधक अगदी चूपचाप होऊन जात. एकाच कैफियतीत ते फड जिंकीत, मग जास्त बोलण्याची त्यांना जरूरच पडत नसे. वार्ताहर परिषदेत पाश्चिमात्य बातमीदार त्यांना तातडीचे, अति-आग्रहाने अनेक प्रश्न विचारीत. काही काही वेळेला हे वार्ताहर त्यांचा अगदी पिच्छा पुरवीत, त्यामुळे ते कधी कधी चिडतही, आणि मग मात्र त्यांची ' वक्तृत्व गंगा ' अगदी दुथडी वाहू लागे. त्यांचे भाषण इतके तर्कसुसंगत होई की या पाश्चिमात्य वार्ताहरांचा आक्रमकपणा अगदी बोथट होऊन जाई.

याउलट समाजसत्तावादी देशातील वृत्तपत्रव्यावसायिकांना नेहरू नेहमीच आदराने वागवीत, त्यांच्याबद्दल आस्था दाखवीत, नेहरूंनी नेहमीच अत्यंत लक्षपूर्वक आमचे म्हणणे ऐकून घेतले. आणि अत्यंत तपशीलवार रीतीने आम्हाला उत्तरे दिली. काही काही वेळेला एखादा विनोद करूनही आमच्या प्रश्नांची ते विल्हेवाट लावून टाकीत, हे खरे. पण हे नेहमीच अगदी हसत-खेळत होई.

भारतीय जनतेने नेहरूंच्या वर ते जिवंत असेपर्यंत फार प्रेम केले ! अगदी शेवटच्या क्षणापर्यंत भारतीय जनता त्यांच्यावर प्रेम करीत होती. सोविएत जनतेलाही नेहरूंबद्दल अगदी शेवटपर्यंत आदर वाटत होता. त्या आदरापोटीच या भारताच्या थोर सुपुत्राच्या स्मृतीला आम्ही आज आदरांजली वाहत आहोत. नेहरूंनी पेटविलेली मशाल आज जे पुढे नेत आहेत, त्यांचे प्रयत्नही आम्हाला अत्यंत मोलाचे वाटतात; कारण नेहरूंनी पेटविलेली ही मशाल भारतीय जनतेच्या भल्याकरिताच होती, त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय भल्याकरिताच होती.

नेहरू आणि "सोविएत लँड" (पाक्षिक)

"भारतीय लोकसत्ताकाच्या १४ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी "सोविएत लँड" ला माझ्या शुभेच्छा पाठवीत आहे. या १४ वर्षांत भारताला यशसिद्धीही प्राप्त झाल्या आहेत आणि काही पराभवही पत्करावे लागले आहेत. पराभवाने आम्ही काही निराश झालो नाही आणि खचूनही गेलो नाही....

उलट आमच्या बाबतीत तर हे पराभव म्हणजे भविष्यकालातील कार्याच्या प्रेरणाच ठरल्या आहेत. आमची अशी पक्की खात्री पटली आहे की आमच्या प्रयत्नात आम्हांला यशच मिळेल. आम्ही आमच्या स्वीकृत कार्यात आगेकूच करूच करू. आधुनिक विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या पायावर 'नवभारत' निर्माण करू. औद्योगिक आणि शेतीच्या क्षेत्रात वैज्ञानिक आणि तंत्रशास्त्रीय मदतीच्या साहाय्याने पुष्कळच प्रगती करून दाखवू. आमच्या जनतेचे राहणीमान पुष्कळच उंचावू. समाजसत्तावादी शासनसंस्था प्रस्थापित करूच करू असा आम्हाला दृढ विश्वास वाटतो.

या महान कार्यात इतर देशांतील आमच्या मित्रांचीही आम्हांला खूपच मदत झाली. विशेषतः सोविएत युनियनने आम्हाला खूपच सहाय्य केले. सोविएत जनता आम्हाला सगळ्यात जास्त जवळची वाटते. दुसऱ्या कोणाही पेक्षा सोविएत जनतेबरोबर आमचे जास्त मैत्रीपूर्ण संबंध आहेत आणि हे लागेबांधे जास्त जास्त मजबूत होतील आणि सतत वाढत राहातील अशी मी अशा बाळगतो." [१]

'सोविएत लँड' हे एक इंग्लिश भाषेतील पाक्षिक आहे. भारतातील सोविएत दूतावासा-कडून ते प्रसिद्ध करण्यात येते. या पाक्षिकाला नेहरूंनी पाठविलेला संदेशच वर उद्धृत केला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर थोड्याच दिवसांनी नोव्हेंबर १९४७ साली हे पाक्षिक प्रसिद्ध करण्यात आले. भारत आणि सोविएत जनतेमधील सतत विकसित होणारा भातृभावच या प्राक्षिकात व्यक्त होत आला आहे आणि होत राहील. या भातृ-भावाची कल्पना अगदी प्रथम निर्माण झाल्यापासून ते आजतागायत पाक्षिकाने हे कार्य पार पाडले आहे. आज तर भारताचे आणि सोविएत यूनियनचे सहकार्य मजबूत पायावर उभारले आहे. निरनिराळ्या क्षेत्रांत भारतीय आणि सोविएत सहकार्य साकार होत आहे. दोन्ही देशांतील लागेबांधे आणि भ्रातृभाव दृढ होत आहे. सोविएत यूनियनमधील वस्तु-स्थितीचा आरसा भारतीय जनतेपुढे ठेवायचा एवढेच या पाक्षिकाने आपल्यासमोर उद्दिष्ट ठेवले नाही तर भारत आणि सोविएत ही दोन्हीही मित्रराष्ट्रे आहेत. त्याचप्रमाणे शेजारी राष्ट्रेही आहेत. आणि त्यांच्या मधील भ्रातृभाव सतत वाढतो आहे. हे लक्षात ठेवून या

१. 'सोविएत लँड', १९६४, क्र. २

वाढत्या भ्रातृभावाचा प्रत्येक क्षेत्रातील पैलू भारतीय जनतेपुढे मांडणे हेच या पाक्षिकाने आपले उद्दिष्ट ठरवलेले आहे. ती कामगिरी या पाक्षिकाने चांगल्या तऱ्हेने पार पाडली आहे आणि विस्तृत प्रमाणावर या पाक्षिकात लिखाण प्रसिद्ध झाले आहे. अर्थातच स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंतप्रधानांच्या कामगिरीवर तर या पाक्षिकाने चांगलाच प्रकाश टाकला आहे.

या पाक्षिकात नेहरूंच्यावर अनेक लेख प्रकाशित झाले आहेत. सोविएत युनियनमधील ख्यातनाम राजकीय समीक्षकांनी आणि स्तंभलेखकांनी या पाक्षिकात लिखाण केले आहे. भारताला औद्योगिक दृष्टीने स्वतंत्र प्रगत राष्ट्र बनविण्याच्या नेहरूंच्या धोरणावर या लेखकांनी लिहिले आहे. नेहरूंच्या तटस्थतेच्या धोरणावरही या लेखकांनी लिहिले आहे. त्यांच्या 'शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या' धोरणावरही या लोकांनी लिहिले आहे. जागतिक शांतता टिकविण्यासाठी आणि शस्त्रास्त्रनिर्मितीच्या सर्वसाधारण (?) बंदी असावी या नेहरूंच्या धोरणावरही या ख्यातनाम लेखकांनी उपरोक्त पाक्षिकात पुष्कळच लिहिले आहे.

'सोविएत लँड' मासिकाच्या वाचकांना स्वागतपर संदेश देण्यात नेहरूंना नेहमीच आनंद वाटे. भारत-सोविएत भ्रातृभाव कसा विकसित होत आहे, दोन देशांचे मैत्रीपूर्ण संबंध कसे विकसित होत आहेत, याबद्दल भारत सरकारचा दृष्टिकोण विशद करणाऱ्या मुलाखतीही 'सोविएत लँड'ला देण्यात नेहरूंना नेहमीच आनंद वाटे.

त्यामुळे नेहरूंच्या मृत्यूची वार्ता समजल्याबरोबर मासिकाचे कार्य करणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांना भयंकर वाईट वाटले. मासिकाच्या कार्यालयावर दुःखाची छाया पसरली. आपल्या १९६४ च्या मासिकाच्या ११ व्या अंकात जादा पुरवणी म्हणून नेहरूंवर मृत्युलेख लिहिण्यात आला होता. त्यात म्हटले आहे.

"श्री. जवाहरलाल नेहरूंच्या मृत्यूने आम्हां सर्वांनाच भयंकर धक्का बसला आहे. भारताचे आणि साऱ्या जगाचे या मृत्यूमुळे कधी न भरून येणारे नुकसान झाले आहे. भारताचा एक उमदा, आणि उदार सुपुत्र त्याचप्रमाणे भारताचा एक महान नेता आज हरपला आहे. सोविएत युनियनचा एक खरा मित्र आज हरपला आहे. जगाचा एक ख्यातनाम मुत्सद्दी आज हरपला आहे."

सोविएत युनियनच्या या महान मित्राची, आणि भारताच्या या थोर सुपुत्राची स्मृती अमर राहावी, म्हणून 'सोविएत लँड'ने १९६४ साली एक निधी उभारण्याचे ठरविले. 'भारत-सोविएत मैत्री जास्त विकसित व्हावी, या कार्याकरिताच हा फंड उभारण्यात आला होता.' सोविएत-भारत मैत्रीच्या विकासाच्या कार्याला, त्याचप्रमाणे जागतिक शांततेच्या कार्याला हातभार लावणाऱ्या सर्वोत्कृष्ट साहित्यिक कलाकृतींना, त्याचप्रमाणे वृत्तपत्रीय कार्याला या फंडातून पारितोषिके देण्यात येणार होती. या पारितोषिकांना 'नेहरू पारितोषिके' असे नाव देण्यात आले होते. अभिजात रशियन, आणि सोविएत साहित्यिक वाङ्मयकृतींच्या भारतीय भाषांतील अनुवादांनाही या फंडातून 'नेहरू पारितोषिके' देण्यात येणार होती. कलाक्षेत्रातील, विज्ञानक्षेत्रातील, आणि शिक्षणक्षेत्रातील ख्यात-

नाम व्यक्तींनादेखील त्यांच्या सोविएत युनियन, आणि भारत यांच्यात जास्त जास्त सहकार्य व्हावे, म्हणून केलेल्या कामगिरीबद्दलही या फंडातून 'नेहरू पारितोषिके' देण्यात येणार होती. त्याचप्रमाणे दहा ते तेरा या वयोमर्यादेतील बालक-बालिकांसाठी चित्रकलेच्या स्पर्धाही या फंडामधून आयोजित करण्यात येणार होत्या. आणि या स्पर्धांतील विजेत्यांना या फंडातून पारितोषिकेही देण्यात येणार होती.

वाङ्मय आणि वृत्तपत्रीय क्षेत्रातील विजेते दरवर्षी सोविएत युनियनचा दोन आठवड्यांचा दौरा करू शकतात. त्याचप्रमाणे चित्रकलेच्या स्पर्धेतील विजेती पाच भारतीय मुलेही आर्तेक येथील सोविएत 'पायोनियर'च्या (सोविएत बालवीर) छावणीमध्ये एक महिना घालवू शकतात. यासाठी या मुलांना कसलाही खर्च येत नाही.

'सोविएत लँड'मध्ये नेहरू पारितोषिके जाहीर करण्यात आल्यावरोबर भारत सरकारने, जन-नेत्यांनी आणि बुद्धिमंतांनी या योजनेचे स्वागत केले. भारताचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् आणि भारताचे तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री या दोघांनीही योजनेबद्दल 'सोविएत लँड' ला स्वागतपर संदेश पाठविले. भारताचे राष्ट्राध्यक्ष आपल्या संदेशात म्हणतात,

"'सोविएत-लँड' ने भारतातील वेगवेगळ्या भाषांतील वाङ्मयीन, आणि वृत्तपत्रीय कार्यासाठी अनेक भरीव स्वरूपाची बक्षिसे देण्याची योजना आखली आहे, हे ऐकून मला फार आनंद वाटला. भारत-सोविएत मैत्री, आणि जागतिक शांतता, यांच्या विकासासाठीच ही पारितोषिके देण्यात येणार असल्यामुळे तर या योजनेचे विशेषच कौतुक वाटते. भारताचे माजी पंतप्रधान यांच्या नावे ही पारितोषिके देण्यात येणार असल्यामुळे 'सोविएत लँड' ने खूपच औचित्य दाखविले आहे, यात शंका नाही. सोविएत युनियन आणि भारत यांची मैत्री मला फारच महत्त्वाची वाटते. त्यामुळे भारतातील विद्वानांना नेहरू पारितोषिके देण्याची जी योजना 'सोविएत लँड' ने आखली आहे, तीही मला फारच महत्त्वाची वाटते. यामुळे आपल्या या दोन देशांत निरनिराळ्या क्षेत्रातील सहकार्यात खूपच वाढ होईल, असा मला विश्वास वाटतो. या योजनेमुळे आपल्या या दोन देशांत कायम स्वरूपाचे सामंजस्यही निर्माण होईल अशी मला खात्री वाटते."[२]

पंतप्रधान शास्त्रीजींनी आपल्या संदेशात खालील मुद्द्यांवर जोर देऊन म्हटले आहे, "जागतिक शांततेचे कार्य हे पंडितजींचे अत्यंत आवडते कार्य होते. भारत आणि सोविएत युनियन, या देशांतील भातृभाव आणि मैत्री हळूहळू मजबूत होत गेल्यामुळे जागतिक शांततेच्या कार्यास जास्तच बळकटी आली. नेहरू पारितोषिक विजेत्यांचे मी अभिनंदन करीत आहे. त्यांना माझ्या शुभेच्छा!"[३]

२. 'सोविएत लँड', १९६५, अंक २४
३. कित्ता.

नेहरू पारितोषिक समितीचे अध्यक्ष आहेत, श्री. के. पी. एस. मेनन. एक ख्यातनाम जनसेवक आणि नेते. श्री. मेनन यांनी 'सोविएत लँड' पाक्षिकाच्या संपादकास खालील प्रमाणे कळविले होते, आणि आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या होत्या,

"ही पारितोषिकांची योजना आखून 'सोविएत लँड'ने नेहरूजींना, आणि त्यांच्या बहुरूपी बहुरंगी व्यक्तिमत्त्वाला मानाचा मुजरा केला आहे, यात शंकाच नाही. नेहरूजींच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वात अनेक नाजूक छटा होत्या...नेहरूजी कवी होते, देशभक्त होते, आणि मुत्सद्दी होते. 'सोविएत लँड'ने अत्यंत सुंदर स्वरूपात आणि उमदेपणाने आपणास याची जाणीव आहे, हे दाखवून दिले आहे. भारत-सोविएत मैत्री प्रस्थापित, आणि विकसित करण्यात नेहरूंचा सिंहाचा वाटा होता. भारत-सोविएत मैत्रीमुळे जागतिक शांतता चिरस्थायी होईल, आणि सर्व देशांतील जनतेत स्थायी स्वरूपाचा भ्रातृभाव निर्माण होईल, असा नेहरूंना दृढविश्वास वाटत होता." [४]

इंदिरा गांधी या नेहरू पारितोषिकाच्या निधीच्या आश्रयदात्या आहेत. 'सोविएत लँड'ला याचा अभिमान वाटतो. नोव्हेंबर १९६५ मध्ये पहिल्याप्रथम विजेत्यांना नेहरू पारितोषिके वाटण्यात आली. हा समारंभ ऑल इंडिया फाईन आर्ट आणि क्रॅफ्ट सोसायटीच्या भव्य दिवाणखान्यात आयोजित करण्यात आला होता. नेहरूंचे भव्य तैलचित्र प्रमुख ठिकाणी लावण्यात आले होते. या तैलचित्राला सुंदर हार घालण्यात आला होता. दिवाणखान्यात अनेक पताका, आणि घोषवाक्ये लावण्यात आली होती. मुख्य घोषवाक्य होते, "भारत-सोविएत मैत्री अमर रहे." नेहरू पारितोषिकाच्या पहिल्या विजेत्यांनी इंदिरा गांधींच्या हातून अभिमानाने आपल्या पारितोषिकांचा स्वीकार केला.

इंदिरा गांधींनी आपल्या भाषणात अनेक गोष्टींचा ऊहापोह केला. पण खालील गोष्टींवर त्यांनी मुख्यतः भर दिला होता. त्या म्हणाल्या,

"ते (जवाहरलाल नेहरू) अनेक गोष्टींबद्दल सोविएत युनियनची प्रशंसा करीत. सोविएत युनियनने नवजीवनाचा मूलभूत पाया घातला, ही अत्यंत मूलभूत गोष्ट आहे, असे त्यांचे मत होते. सोविएत युनियनने स्त्रीदास्य-विमोचनासाठी जोरदार पावले टाकली. त्याचप्रमाणे विज्ञान आणि तंत्रशास्त्र यांच्या विकासासाठी प्रत्यक्षात जोरदार पावले टाकली, याचे नेहरूंना विशेषच कौतुक होते." इंदिरा गांधींनी, नेहरूंनी सोविएत युनियनला दिलेल्या भेटीबाबत त्याचप्रमाणे सोविएत सरकारच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी भारताला दिलेल्या भेटीबद्दलही पुष्कळच सांगितले. त्या जोर देऊन म्हणाल्या, "यामुळे जगात एक नवीनच प्रक्रिया सुरू झाली." त्या पुढे म्हणाल्या,

"जगातील निरनिराळ्या देशांत दळणवळणासाठी अनेक पूल बांधले पाहिजेत, यावर नेहरूंचा विश्वास होता आणि नुसते भौतिक पूलच त्यांना अभिप्रेत नव्हते. वैचारिक, आणि

४. कित्ता.

सांस्कृतिक दळणवळणही निरनिराळ्या देशांत सारखे चालू राहिले पाहिजे, असेच त्यांना वाटे. ' सोविएत लँड 'ने नेहरू पारितोषिकांची योजना आखून त्यांचेच कार्य पुढे चालविले आहे, असा मला दृढ विश्वास वाटतो. नेहरू पारितोषिक समिती नेहरूंचेच कार्य पुढे चालवीत आहे, यात शंका नाही. भविष्यकाळात आपल्या या दोन देशांत असे, ' अनेक पूल ' बांधले जातील, याची मला खात्री वाटते. " [५]

दुसऱ्या वर्षीही इंदिरा गांधींनी नेहरू पारितोषिक विजेत्यांच्या एका नव्या गटास पारितोषिके वाटली. इंदिरा गांधी आता भारताच्या पंतप्रधान झाल्या होत्या. आपल्या भाषणात इंदिरा गांधींनी भारत आणि सोविएत या दोन महान शेजाऱ्यांच्या मैत्रीबाबत म्हटले,

" ही मैत्री केवळ दोन देशांतील सरकारांची मैत्री नाही, तर ही मैत्री दोन देशांतील जनतेची मैत्री आहे. ही मैत्री एकमेकांपासून केवळ कोणत्याही स्वरूपाचा लभ्यांश किंवा फायदा उपटण्यासाठी नाही. ही मैत्री तत्त्वाधिष्ठित आहे, जास्त खोल अशा तत्त्वावर आधार लेली आहे. साऱ्या जगाला ही मैत्री हितकारकच आहे. " [६]

आतापर्यंत अनेक ख्यातनाम लेखक, कवी, वृत्तपत्रव्यवसायी, आणि कलावंत यांना नेहरू पारितोषिके देण्यात आली आहेत. त्यात सुमित्रानंदन पंत, एच. आर. बच्चन, शंकर कुरूप, व्ही. एस. मेनन, कृशनचंदर, आर. के. करंजिया, पां. वा, गाडगीळ, ल. ना. भावे, विंदा करंदीकर, वृंदावनलाल वर्मा, मगदूम मोहीउद्दीन, (मरणोत्तर), ए. एस. जाफरी, बी. डी. चतुर्वेदी, इत्यादी इत्यादी.

१९६७ साली भारत सरकारनेही वार्षिक नेहरू पारितोषिकाची योजना सुरू केली. ही पारितोषिके सोविएत युनियनमधील बुद्धिमंतांना देण्यात येणार होती. त्यात कवी, वृत्तपत्र-व्यवसायी, चित्रकार, शास्त्रज्ञ, संगीतरचनाकार यांचा अंतर्भाव करण्यात आला होता. मुख्यतः भारत आणि सोविएत युनियन यांच्यामधील भ्रातृभाव विकसित करण्याला जे जे हातभार लावतील त्यांना त्यांना ही पारितोषिके देण्यात येणार होती. सोविएत जनतेला भारताचा इतिहास, संस्कृती, आणि आजचा भारत, यांचे जास्त जास्त ज्ञान व्हावे, या-साठी ही पारितोषिके देण्यात येणार होती. सोविएत युनियनचे पंतप्रधान हे नेहरू पारि-तोषिक समितीचे आश्रयदाते आहेत.

कवी एद्‌युवार दास मिझेलायटिस, चित्रकार वासिली चुईकॉव, संगीतकार सर्जी बाला-सान्यान् आणि वैज्ञानिक येवगेनी चेलिशेव यांना ही नेहरू पारितोषिके देण्यात आली होती. इतरही अनेक लोकांना ती देण्यात आली होती. फक्त काही लोकांचाच येथे उल्लेख करण्यात येत आहे. महान मानवतावादी, देशभक्त, जागतिक शांततेचे खंबीर पुरस्कर्ते, जगातील

५. कित्ता.
६. ' सोविएत लँड ' १९६६, अंक २४.

जनता सुखी व्हावी म्हणूनच ' सर्वेत्र सुखिनः सन्तुः । सर्वे सन्तुः निरामयः ' या महामंत्राचा अखंड जप करणारे जवाहरलालजी नेहरू यांची स्मृती अमर राहावी, हेच या नेहरू पारितोषिक योजनेचे उद्दिष्ट आहे.

६

'चाचा' नेहरू

नेहरू म्हणजे लहान मुलांचे दोस्त. सोविएत बालकांनी नेहरूंच्या प्रेमाला खास प्रतिसाद दिला होता.

'मला मुले फार आवडतात.'

असे नेहरू नेहमीच म्हणत. बालकांच्याबरोबर गप्पा मारायला, इतकेच नव्हे तर त्यांच्याबरोबर खेळायलाही नेहरूंना फार आवडे. मुलांच्या मध्ये असले की, आपण आपले वय विसरतो असे नेहरू नेहमी म्हणत.

मुलांच्यासाठी नेहरूंच्या घराचे दरवाजे सताड उघडे असत. जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा तेव्हा या 'बाल भारतीयांचे' नेहरू स्वागत करीत. त्यांच्याकरिता नेहरू नेहमीच वेळ काढीत. विश्वाच्या सौंदर्यावद्दल, स्वतःच्या देशावर प्रेम करण्याबद्दल, त्याचप्रमाणे निरनिराळ्या सगळ्या देशांत मैत्री आणि भ्रातृभाव असला पाहिजे याबद्दल मुलांना ते नेहमीच सांगत. मुलांचे जीवन सुखी आणि शानदार व्हावे यासाठी शक्य ते सर्व काही नेहरू करीत असत.

अधिकृत रीतीने नेहरूंनी जेव्हा जेव्हा सोविएत युनियनला भेट दिली तेव्हा तेव्हा छोट्या बालवीरांनी आणि शाळकरी पोरांनी नेहरूंचे अत्यंत उत्साहाने हार्दिक स्वागत केले होते. जेव्हा जेव्हा नेहरूंनी छोट्या बालवीर छावण्यांना भेट दिली आणि बालवीर प्रासादांना भेट दिली तेव्हा तेव्हा मुलांनी त्यांना फुले अर्पण केली आणि त्यांच्या गळ्यात बालवीरांचा तांबडा रुमाल बांधला. मुलांनी नेहरूंना आपली अनेक खेळणीही दिली. मुले नेहरूंना अत्यंत हृदयस्पर्शी पत्रे लिहीत आणि आपली रम्य स्वप्नेही नेहरूंना कथन करीत.

मॉस्कोमधील तेवीस नंबरच्या शाळेमधील वसतिगृहातील मुलांनी नेहरूंना नोव्हेंबर १९५९ मध्ये खालील नमुनेदार पत्र पाठविले होते.

"प्रिय चाचा जवाहरलाल नेहरू,

"हे पत्र सोविएत युनियनमधील मुले तुम्हांला पाठवीत आहेत. आम्हा मुलांचा एक गट आहे; त्या गटातर्फेच आम्ही हे पत्र लिहिले आहे. नोव्हेंबर १४ ला तुमचा सत्तरावा वाढदिवस आहे ना ? आम्हाला माहीत आहे आणि म्हणूनच हे पत्र आम्ही लिहिले आहे. खरोखर आम्हांला असे वाटते की भारतात यावे आणि तुमच्या गळ्यात फुलांचे हार

घालावेत ! पण ते काही जमण्यासारखे नाही. दुर्दैव आमचे ! दुसरे काय ? या परिस्थितीत आम्हांला जे करणे शक्य आहे तेच आम्ही करीत आहोत. आम्ही पत्र लिहून तुम्हांला आयुरारोग्य चिंतितो. ' चाचा ', तुम्हांला हजार वर्षांचे आयुष्य लाभो. "

" ' चाचा ' नेहरू तुमच्या भेटीची आम्हांला कधीच संधी मिळाली नाही. पण शांतते-बद्दल आणि भारतीय जीवनाबद्दल जेव्हा जेव्हा आम्ही चर्चा करतो तेव्हा तेव्हा तुमची आठवण होतेच ! तुमच्याबद्दल विचार करावाच लागतो. तुम्ही, तुमच्या देशातील जनता ही इतर देशातील जनतेवरोबर सुखाने नांदावी म्हणून अविरत प्रयत्न करीत असता असे आमचे शिक्षक आम्हांला नेहमीच सांगत असतात. तुमचा जन्मदिवस हा ' बालकदिन ' म्हणूनच पाळला जातो हेही आम्हांला माहीत आहे. "

" या जन्मदिनाच्या प्रसंगी आम्ही सोविएत मुलांनी तुम्हांला काही काही सुंदर गोष्टी भेट म्हणून देण्याचे ठरविले आहे. ओल्याफोमिचेवा या आमच्या शाळेतील पहिल्या इयत्तेतील मुलीने तुमचे नाव एका रेशमी हातरुमालावर भरतकाम करून लिहिलेले आहे. अर्थात तिने हे भरतकाम हिंदीत केलेले आहे. आमच्या शाळेतील सगळीच मुले हिंदी आणि उर्दू शिकत असतात. आमच्या शाळेतील पाचवी आणि सहावीतील मुले आता काही भारतीय भाषा वाचूही शकतात आणि लिहूही शकतात. पण आमच्या शाळेतील अगदी लहानात लहान मुलीला किंवा मुलाला " शांती " आणि " मित्रता " हे दोन शब्द चांगले ठाऊक आहेत. "

" हिंदी-रूसी भाई-भाई "

ही घोषणा तर सोविएत युनियनमधील प्रत्येक माणसास माहीत आहे. पण इतर कुठल्याही सोविएत मुलांपेक्षा आमच्या शाळेतील मुलांना भारताची पुष्कळच जास्त माहिती आहे. कारण आमची शाळा ही खास शाळा आहे. आमच्या शाळेत काही विषय तर चक्क भारतीय भाषांमधून शिकविले जातात. गृहपाठ करण्यात आम्हांला फार मजा वाटते. आम्ही एक " भारत प्रवासी क्लब " ही काढला आहे. या क्लबात तर आम्हाला काही औरच मजा वाटते. "

" भारतीय कविता आणि भारतीय परीकथा आम्हाला फार आवडतात. हजारो वर्षांपूर्वी तुमच्या देशात काय घडत होते याच्या गोष्टीही वाचायला आम्हाला आवडते. अगदी अलीकडेच भिलाई पोलाद कारखान्याने आपल्या पहिल्या पोलादी पट्टीचे उत्पादन केले असे आमच्या एका शिक्षकाने सांगितले. "

" भिलाई कारखाना झिंदाबाद " अशी घोषणा तीन वेळा करण्याची आम्ही त्या शिक्षकाकडे परवानगी मागितली. (आम्ही अगदी हळू आवाजात शांतपणे घोषणा करणार होतो; कारण आम्हाला प्रसंग साजरा करायचा होता इतकेच ! शेजारच्या वर्गांना त्रास देण्याचा आमचा बिलकूल हेतू नव्हता) पण इतर वर्गांतील मुलांनी आमच्या घोषणा ऐकल्याच आणि काय झाले ? म्हणून विचारलेच. "

" चाचा नेहरू, भारताबद्दल जास्त जास्त माहिती मिळविण्याचे आमचे प्रयत्न चालूच आहेत.

" प्रिय चाचाजी नेहरू, आम्ही भारताबद्दल जास्तीत जास्त माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहोत. भारताबद्दल जास्तीत जास्त शिकायचे, असे आमचे प्रयत्न चालू आहेत. आमच्या शाळेला भेट देण्यास अनेक भारतीय पाहुणे येतात. त्यांना भेटण्यास आम्हाला अत्यंत आनंद वाटतो.

" प्रिय ' चाचा ' नेहरू, तुम्ही सुद्धा आमच्या शाळेला भेट देण्यासाठी या ना ! मग काय मजा होईल ! तुम्ही जेव्हा याल, तेव्हा आम्ही तुम्हांला छान छान केक खायला देऊ. आमच्या शाळेच्या बगीच्यात खूप खूप सफरचंदे पिकतात. तीही तुम्हाला नक्कीच आवडतील. तुम्ही सोविएत युनियनला काही वर्षांपूर्वी भेट दिली होतीत, असे आमच्या शाळेतील अनेक ज्येष्ठ विद्यार्थी आम्हांला सांगतात. ते तुम्हांला भेटले होते, असेही सांगतात. पण आमच्या दैवात काही तसे दिसत नाही, आम्ही जास्तच दुर्दैवी आहोत. कारण तुम्ही जेव्हा आला होतात, तेव्हा तर आम्ही फारच लहान होतो. तुम्ही पुन्हा आमच्या देशाला केव्हा तरी भेट द्यालच. त्यावेळी मात्र आमच्या शाळेला भेट द्या हं ! आम्ही अगदी आशेनं तुमची वाट पाहात आहोत. तुम्ही आलात म्हणजे आम्हांला किती किती आनंद होईल !

" अच्छा, चाचा नेहरू, नमस्ते. या पत्रावरोबरच तुम्हाला एक पार्सल मिळेल. त्या पार्सलात आम्ही आमच्या हाताने बनविलेल्या अनेक वस्तू भेट म्हणून पाठवीत आहोत. त्यांचा कृपया स्वीकार करावा. चाचाजी, पुन्हा एकदा नमस्ते. खूप खूप जगा अगदी हज्जार वर्षे !

आपले नम्र, सोविएत मित्र, इरिना स्मिर्नीवा, तात्याना झोतिना, व्याचेस्लाव चुपको, वलेरी बुझिनॉव, आन्द्रि नेमेदोव, हॅनेतीकोनोव, आणि इगोर आगेयेव.

शाळा नं. २३, मॉस्को बोर्डिंग स्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांकरिता. "

हे पत्रलेखक आता निःसंशय मोठे झाले आहेत पण नेहरूंच्या गोड आठवणी, त्यांनी आपल्या हृदयात अगदी जतन करून ठेवलेल्या आहेत. भारताच्या या महान् सुपुत्राबद्दल या विद्यार्थ्यांना किती प्रेम वाटत होते, हे त्यांच्या वर दिलेल्या पत्रावरून दिसून येते. जवाहरलाल नेहरूंबद्दल या मुलांना अत्यंत प्रेम आणि आदर वाटत होता, यात शंकाच नाही. या पत्रात बालकांचा निरागस भावडेपणा अर्थात दिसतोच. पण त्याचबरोबर सोविएत जनतेला या महान भारतीय नेत्याबद्दल तसेच त्याच्या महान देशाबद्दल, आणि त्या देशातील महान जनतेबद्दल वाटणारा आदर, आणि प्रेम हेही या मुलांच्या पत्रात प्रतिबिंबित झालेले आहेत.

गेन्नादी पेचिन्कोव

सोविएत रशियन प्रजासत्ताकाचे मान्यवर कलावंत, नेहरू पारितोषिक विजेते. सध्या हे मॉस्को येथील मुलांच्या मध्यवर्ती नाट्यसंस्थेमध्ये काम करीत असतात. या संस्थेतर्फे 'रामायण' या नाट्यप्रयोगात १९६० सालापासून ते रामाची भूमिका करीत आले आहेत. त्या प्रयोगाचे दिग्दर्शनही तेच करीत असतात. जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्या सोविएत युनियनच्या भेटीत हा प्रयोग पाहिला होता. त्यावेळच्या ठळक आठवणी, त्यांनी अगदी जतन करून ठेवल्या आहेत. १९७४ साली या बालनाट्यसंस्थेने भारताचा दौरा केला होता.

नेहरू : 'रामायण'च्या एका प्रयोगाचे वेळी

सप्टेंबर १९६१ साली पंतप्रधान नेहरूंचा मुक्काम मॉस्कोमध्ये होता. याच साली ८ सप्टेंबर रोजी आम्ही 'रामायण' हा प्रयोग करणार होतो. खुद्द जवाहरलाल नेहरू हे आमचा प्रयोग पाहण्यास हजर राहणार आहेत, असे आम्हाला सकाळीच समजले होते. श्रोतृवृंदात नेहरू असणार, यावर आमचा विश्वासच बसेना. हा थोर पुरुष, सोविएत युनियनचा सन्माननीय पाहुणा आमच्या प्रयोगास हजर राहणार, हे ऐकूनच अभिमानाने आम्ही फुगून गेलो होतो. त्यांचे हजर राहणे, हाच आम्हांला आमचा महान् 'सन्मान' वाटत होता. नेहरूंचे सारे कार्यक्रम अगदी मिनिटामिनिटाने ठरविलेले असतात, हे आम्हांला माहीत होते. त्यामुळे नेहरू आमच्या प्रयोगाला येतात की नाही, असेही आम्हांला वाटले होते. पण ते येणार, अशी आम्ही आशा करीत होतो. 'रामायण' आणि 'महाभारत' या दोन महाकाव्यांवद्दल नेहरूंनी आपल्या 'भारत-शोध' (दि डिस्कव्हरी ऑफ इंडिया) या पुस्तकात काय लिहिले आहे, हे अर्थातच आम्ही वाचले होते. त्या पुस्तकातील उतारे नेहरू प्रयोगाला येणार, हे कळल्याबरोबर आम्ही आठवू लागलो. नेहरूंनी असे लिहिले होते: या दोन महाकाव्यांनी भारतीय जनतेच्या मनावर खोल परिणाम केला होता. अगदी आजसुद्धा भारतीय जनतेच्या मनाची घडण, ही दोन्ही महाकाव्ये करीत असतात, असेही नेहरूंनी लिहिले होते. भारतीय लोकांच्या मानसाची घडण, घडविण्याच्या कामी ही दोन्हीही महाकाव्ये म्हणजे एक प्रचंड शक्ती आहे, असेही नेहरूंनी लिहिले होते.

रामायणामुळे भारतीय संस्कृतीत, त्या संस्कृतीच्या वारश्यात, आणि त्याच्याचबरोबरीने भारतीय जनतेत, आणि भारतीय इतिहासात आम्ही रस घ्यावयास लागलो होतो. रामा-

यणातील पात्रे, ही भारतीय जनतेची अगदी लहानपणापासून लाडकी असतात. सोविएत युनियनसारख्या भारतापेक्षा अजिबात भिन्न असलेल्या देशात, या रामायणातील पात्रांना रंगमंचावर आम्ही उभी करीत होतो. यामुळे आमच्या प्रयोगात नेहरू खूपच रस घेणार, अशी आमची खात्री होती.

आमच्या संस्थेतील सारी मंडळी नट, दिग्दर्शक, वेषभूषेची रचना करणारे, इतकेच नव्हे तर प्रयोगाला हजर राहणारे सोविएत रसिक या सर्वांची अगदी तारांबळ उडून गेली होती आणि हे सर्व, प्रयोग कसा काय वठणार याचा आपल्या मनातल्या मनात विचार करीत होते. सगळेच अस्वस्थ झाले होते, आणि आमच्या सन्माननीय पाहुण्याची वाट पाहात होते. फारच सुखद संवेदना अनुभवीत होते.

प्रयोगाला सुरुवात होऊन थोडा वेळ झाला होता. इतक्यात मेघगर्जनेसारखा साऱ्या नाट्यगृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या खास ' बॉक्स 'मध्ये नेहरूंनी प्रवेश केलेला आम्ही पाहिला. श्रोतृवृंदातील प्रत्येकाने त्यांना तावडतोब ओळखले होते.

मध्यंतरात नेहरू नाट्यगृहाच्या उद्यानात आले. तेथे त्यांनी अनेक भारतीय चित्रांचे निरीक्षण केले. नेहमीप्रमाणेच मुलांचा घोळका त्यांच्याभोवती जमा झाला आणि तेही मुलांशी पूर्णपणे समरस झाले. काही मिनिटे त्यांनी तरुण बालवीरांबरोबर बोलण्यात घालविली आणि त्या मुलांबरोबर स्वतःचा फोटोही काढून घेतला. पाहुण्यांसाठी ठेवलेल्या शेरेबुकातही त्यांनी सही केली आणि मग ते थिएटरच्या मागच्या बाजूस आमच्या नाट्य-संस्थेतील सभासदांस भेटण्यास आले.

नेहरू उत्साहाने नुसते मुसमुसले होते. हळूहळू ते प्रत्येकाच्या जवळ येऊन नटांच्या चेहऱ्याचे अगदी जवळून निरीक्षण करू लागले. रामायणातील सर्व पात्रे अगदी लहानपणा-पासूनच त्यांना परिचित होती. मनातल्या मनात त्या पात्रांबरोबर समोर उभा असलेल्या नटाची तुलना करीत होते. कुठे भारत, कुठे रामायण, आणि कुठे मॉस्को ! पसंती दाखल नेहरूंनी मान डोलावली. नंतर त्यांनी अगदी खास त्यांच्या मृदू आणि मुलायम आवाजात आमचे स्वागत करून, आमचे आभार मानले. " तुमच्या प्रयोगाने मला फार आनंद झाला. मी तुमचा फार आभारी आहे. "

नेहरूंचे ते खंबीर, आणि उत्साही हस्तांदोलन, त्याचप्रमाणे त्यांच्या डोळ्यांतील ते कारुण्य आणि दयाभाव, मी कधीच विसरणे शक्य नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील मृदू हास्य हे तर कधीच चळले नव्हते. तेही मी कधी विसरणे शक्य नाही. नेहरूंची ती शुभ्र गांधी टोपी, आणि त्यांनी त्यांच्या कोटावर लावलेली ती लाल गुलाबाची कळीही मी कधीच विसरणे शक्य नाही. आम्ही त्यांना आमच्या मंडळींबरोबर फोटोसाठी बसण्याची विनंती केली. त्यांनी अगदी तावडतोब खुषीने संमती दिली. ते सोफ्यावर बसले, आणि प्रयोगाबद्दल त्यांना काय वाटले, याविषयी बोलू लागले. आम्ही अगदी तन्मय होऊन ऐकत होतो आणि

जेव्हा त्यांनी, 'प्रयोग छान झाला, मला आवडला,' असे उद्‌गार काढले, तेव्हा आम्ही अगदी खूष झालो. धन्य धन्य वाटून आम्हाला अगदी आभाळ ठेंगणे झाले होते. दुसरा अंक सुरू होणार, याची सूचना देणारी तिसरी घंटा झाली. प्रत्येकाशी हस्तांदोलन करून नेहरू आपल्या 'बॉक्स' कडे निघून गेले. आम्हाला त्यांनी रंगमंचावरच सोडून दिले होते. आणि आमच्याकडे ते त्या भडक प्रकाशातून पुन्हा पाहणार होते. दुसऱ्या अंकात ज्यांची कामे होती, त्यांनी आपले सारे कौशल्य पणास लावून काम केले. त्यांना असे वाटले होते, की आज त्यांच्या कामाकडे सारा भारत, भारताचा इतिहास, आणि भारतीय जनता, पाहात आहेत.

आमच्या प्रयोगाला हजर राहण्याच्या अगोदर नेहरूंना अधिकृत सभांना, आणि कार्यक्रमांना हजर राहावे लागले होते. त्यामुळे ते थोडेसे दमणे स्वाभाविकच होते. प्रयोगाला हजर राहून मनमोकळेपणाने सारा तणाव कमी करून शीण घालवायचा, असे त्यांनी ठरविलेले दिसले. सभोवतालचा तरुण श्रोतृवृंद, आणि नेहरूंच्या आगमनामुळे स्फूर्ती मिळालेल्या नटांचा उत्स्फूर्त अभिनय, या दोन्हींमुळे नेहरू अगदी भारावून गेले होते.

नेहरूंना मुले अतिशय आवडतात, यात शंकाच नाही. मुलांवर नेहरू अतिशय प्रेम करतात; आणि मला वाटते, आमच्या मुलांच्या नाट्यसंस्थेने सादर केलेल्या रामायणाच्या प्रयोगाला हजर राहण्याचा निर्णय नेहरूंनी मुख्यतः त्यांच्या मुलांवरील प्रेमामुळेच घेतला असावा. सप्टेंबरच्या त्या संस्मरणीय रात्री आमच्या संस्थेतील सगळ्यांची, आणि सगळ्या श्रोत्यांचीही अशीच भावना झाली होती.

१४ नोव्हेंबर म्हणजे नेहरूंचा वाढदिवस. साऱ्या भारतभर हा 'बालदिन' म्हणूनच साजरा होत असतो. याच दिवशी आमची मध्यवर्ती बालनाट्यसंस्था 'रामायण' हा नाट्यप्रयोग सादर करीत असते.

नोव्हेंबर १९७१ मध्ये 'रामायण'चा १५० वा प्रयोग आम्ही सादर केला.

आमच्या मध्यवर्ती बालनाट्यसंस्थेने 'तप्त लाल पोलाद' ('हाऊ द स्टील वॉज् टेम्पर्ड') या नाट्यप्रयोगाच्या तालमीही पूर्ण केल्या आहेत. 'तप्त लाल पोलाद' यचा नावाची प्रसिद्ध कादंबरी निकोलाय आस्त्रोवस्की, या लेखकाने लिहिली आहे. आमच्या संस्थेने तिलाच नाट्यरूप दिलेले आहे. हा प्रयोग दिग्दर्शित करीत असताना रंगमंचावरच मला नेहरूंची आठवण झाली. कारण नेहरूंनी आपल्या 'भारत-शोध' या सुप्रसिद्ध पुस्तकाचा शेवटही आस्त्रोवस्कीच्याच मानवी जीविताचा अर्थ व्यक्त करणाऱ्या खालील शब्दांत केला आहे—"मानवाचा सगळ्यात लाडका ठेवा म्हणजे त्याचे जीवन, त्याचे आयुष्य, आणि त्याला ते फक्त एकदाच जगता येते. त्याने ते अशा रीतीने जगले पाहिजे, की त्या आयुष्याला भेकडपणाचा डाग अजिबात लागणार नाही. त्याचप्रमाणे त्याने क्षुद्र यःकश्चित भूतकालाचाही विचार करण्याचे कारण नाही. काहीही कारण नसताना भूतकालाचा विचार करून, कशासाठी मनाला वेदना द्यायच्या? तेव्हा अशा तऱ्हेने जगा, की मरताना असे

म्हणता आले पाहिजे, 'माझे सारे जीवन, माझी सारी ताकद मी मानव जीविताच्या अगदी आद्य, मूलभूत कारणासाठीच वापरली आहे–मानवमुक्तीच्या कार्यासाठीच वापरली आहे."

मला वाटते, या उद्‌गारांमध्येच नेहरूंच्या जीवनाचा पुष्कळसा बोध होतो. नेहरूंना वर्तमानकाळाबद्दल अतिशय आस्था वाटत होती. नेहरूंना भविष्यकालाची पावलेही समजली होती. त्याचप्रमाणे सोविएत वाङ्मयाचेही त्यांना सखोल ज्ञान होते. त्या वाङ्मयाचे त्यांनी पुष्कळच रसग्रहणही केले होते. नेहरूंनी सोविएत वाङ्मयातील नायकाकडून स्फूर्तीही घेतली होती, हेसुद्धा त्यांनी उद्‌धृत केलेल्या उपरोक्त उताऱ्यावरून दिसून येते. भारताच्या तरुण पिढीला कशा तऱ्हेने शिक्षण द्यावयास पाहिजे या प्रश्नावर नेहरूंनी खूपच खोल विचार केला होता. सोविएत लेखकांनी आपल्या वाङ्मयात निर्माण केलेल्या नायकांच्या व्यक्तिरेखांपासून स्फूर्ती घेता येईल, याकडे नेहरूंनी नेहमीच लक्ष वेधले आहे.

१९७४ साली भारतात 'तुलसी रामायणा'चा ४०० वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. भारताच्या सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या संस्थेने या समारंभाला हजर राहण्याचे मला निमंत्रण पाठविले होते. खरोखरच हे माझे सद्‌भाग्यच ! आल्यावरोबर मी नेहरूंच्या घराला भेट दिली. तेथील शेरेवुकात मी लिहिले होते, मॉस्को येथील मध्यवर्ती बालनाट्य संस्थेतील सर्वांनाच नेहरूंची नेहमीच आठवण होते, आणि होत राहील. नेहरूंनी आमच्या संस्थेला भेट देऊन आमचा प्रयोग पाहिला, याचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यांच्या भेटीपासून आम्हाला प्रचंड स्फूर्ती मिळाली होती, आणि जेव्हा जेव्हा आम्ही रामायणाचे प्रयोग केले तेव्हा तेव्हा या स्फूर्तीच्याच जोरावर आम्ही ते पार पाडले.

मिर्झा महमुतोव

स्वायत्त तातार सोविएत समाजसत्तावादी लोकसत्ताकाचे शिक्षणमंत्री. मिर्झा महमुतोव हे १९६१ साली जबलपूर येथे भरलेल्या शिक्षकांच्या अखिल भारतीय ट्रेड युनियन परिषदेला उपस्थित होते.

नेहरूंनी वचन पाळले

भारताचा दौरा आटोपल्यानंतर आम्ही दिल्लीला परतलो. दिल्लीला पोहोचल्यावर दिल्ली येथील दूतावासातील एका अधिकाऱ्याने मला एक महत्त्वाची गोष्ट सांगितली. सोविएत युनियनच्या शिक्षण क्षेत्रातील अनुभवाची पंतप्रधान नेहरूंना माहिती हवी होती. सोविएत युनियनने आपली शिक्षणव्यवस्था कशी संघटित केली आहे ? विशेषतः राष्ट्रीय अल्पसंख्यांक राष्ट्रगटांना कोणत्या सवलती दिल्या आहेत ? सोविएत युनियनमध्ये, आणि स्वायत्त राष्ट्रगटांमध्ये रशियन, आणि राष्ट्रगटांची भाषा कशी शिकविली जाते ? त्याचप्रमाणे सोविएत युनियनमध्ये निरनिराळ्या राष्ट्रगटांत वैचारिक दळणवळणासाठी भाषेचा माध्यम म्हणून कसा उपयोग करण्यात येतो, या साऱ्या गोष्टी नेहरूंना समजावून घ्यायच्या होत्या आणि याकरिताच सोविएत शिक्षणतज्ज्ञांच्या साऱ्या प्रतिनिधीमंडळालाच नेहरूंना भेटायचे होते.

आम्ही नेहरूंच्या निवासस्थानी पोहोचलो. आम्ही सहा जण होतो–म्हणजे सारेच संपूर्ण प्रतिनिधि–मंडळ होते. नेहरूंनी आपल्या अभ्यासिकेच्या दारातच आमचे स्वागत केले. अत्यंत कळकळीने, आणि प्रेमाने आमच्याशी हस्तांदोलन केले. या भेटीच्या वेळी त्यावेळचे भारतातील सोविएत राजदूत आय. ए. बेनेदिक्तॉव, हेही हजर होते. भारतासारख्या एका मोठ्या देशाच्या पंतप्रधानांना भेटायला मी कमालीचा उत्सुक, आणि अस्वस्थ झालो होतो. या भेटीबद्दल मला अत्यंत कुतूहल वाटत होते. आणि मी त्या भेटीत फार रस घेत होतो. त्याशिवाय नेहरू म्हणजे एक विश्वविख्यात व्यक्ती ! त्यामुळेही त्यांना भेटण्यास मी फार उत्सुक होतो. काही काही माणसेच अशी असतात, की त्यांच्या अंगातून नेहमीच ज्ञान-प्रकाश प्रज्वलित होत असतो. नेहरू हे या लोकांपैकीच एक होते. त्यांची प्रत्येक हालचाल, त्यांची एकंदर वागणूकच, त्यांचा मृदू आणि संतुलित आवाज, त्यांचे ते मृदुहास्य, याचा परिणाम दुसऱ्या माणसावर ताबडतोब होई, त्यांच्या त्या मृदुहास्यात दया, आणि करुणा ओतप्रेत भरलेली असे. यामुळे त्यांना भेटण्याचे सद्भाग्य लाभलेल्या प्रत्येक माणसाच्या मनात त्यांच्याबद्दल खोल आदरभाव एकदम जागृत होई आणि त्यांना प्रतिसाद दिल्याशिवाय

कोणीही माणूस राहूच शकत नसे.

त्यांच्या चेहऱ्यावरच शासनाच्या बोजामुळे निर्माण झालेला तणाव स्पष्ट दिसत होता– पंतप्रधान थकलेले दिसले.

रोनो कायुमोवा हे ताश्कंदचे एक शिक्षक आमच्या प्रतिनिधी मंडळात आहेत, असे नेहरूंना कुणीतरी सांगितले होते. उझ्बेकमधील शाळकरी मुलांसाठी लिहिलेल्या अनेक शालेय हिन्दी पुस्तकांच्या या बाई सहलेखिका होत्या. नेहरूंना आम्ही अशी दोन हिंदी श्रीगणेशाची पुस्तके नजर केली होती. नेहरूंनी या दोन्ही पुस्तकांचे अत्यंत काळजीपूर्वक परीक्षण केले होते. भारतातील निरनिराळ्या लोकांमध्ये योग्य वैचारिक दळणवळण होण्यासाठी हिंन्दीसारख्या भाषेची भारताला फार आवश्यकता आहे, असे यावेळी नेहरूंनी उद्‌गार काढले होते. भारतातील प्रत्येक शाळेत जर हिन्दी शिकविण्याची सोय करता आली तर ती एक फारच मोठी कामगिरी होईल, असेही नेहरू म्हणाले. पण त्याच वेळी भारतामध्ये काही लोक असेही आहेत, की त्यांना हिन्दी ही एक भारतातील वैचारिक दळणवळणाची भाषा व्हायला पाहिजे, हे पटतच नाही. म्हणून या बाबतीत पावले टाकायला, हे लोक अगदी नाखूष असतात. पण ते नंतर लागलीच हेही म्हणाले, की या लोकांची ही वृत्ती शेवटी बदलेल. आणि हिन्दीबद्दलचा त्यांचा दृष्टिकोणही बदलेल. आणि मग सारे काही ठीक होईल.

आमच्या प्रतिनिधिमंडळात तातार स्वायत लोकसत्ताकाचाही एक प्रतिनिधी आहे, असे सोविएत राजदूताने नेहरूंना सांगितले होते. (मीच तो प्रतिनिधी.) आमच्या स्वायत्त लोकसत्ताकातील शिक्षणपद्धतीबद्दल नेहरूंनी मला अनेक प्रश्न विचारले, आणि नंतर मला एकदम विचारले, की मी इंग्लिश कुठे शिकलो ? कझानमध्ये की मॉस्कोमध्ये ? मी इंग्लिश मॉस्कोमध्येच शिकलो, हे मी नेहरूंना तावडतोब सांगितले. त्यानंतर पंतप्रधानांना देण्यासाठी मी एक पत्र आणले आहे, हेही मी त्यांच्या कानावर घातले. हे पत्र कझान येथील एका शाळकरी मुलीचे पत्र आहे, हेही मी त्यांना सांगितले; मी म्हणालो,

"पंतप्रधानजी, आपण आपल्या सुकन्येसह जून १९५५ मध्ये कझानला भेट दिली होती. त्यावेळी विमानतळावर जमलेल्या लोकांच्या घोळक्यात ही तातार शाळकरी मुलगीही होती. तिने तुमच्या हातात पुष्पगुच्छ देऊन तुमचे स्वागत केले होते. आता तिने मला, तिचे नम्र प्रणाम तुम्हाला सांगण्यासाठी सांगितले आहेत, आणि भारतातील एखादा पत्रमित्र तिच्यासाठी तुम्ही शोधून काढावा, अशीही तिची तुम्हाला नम्र विनंती आहे."

नेहरू हसले आणि त्यांनी तावडतोब आपल्या साहाय्यकाला या विनंतीकडे लक्ष देण्यास सांगितले. ते म्हणाले,

"ही विनंती फारच योग्य, आणि अत्यंत शिफारस करण्यासारखी आहे. आपल्या दोन्ही देशांतील तरुणांनी आपली मैत्री, आणि भ्रातृभाव वाढविलाच पाहिजे."

नेहरू एक मिनिट थांबले, आणि पलीकडेच ठेवलेली एक हस्तिदंती वस्तू त्यांनी

उचलली. या हस्तिदंतावर अशोकाचे मानचिन्ह कोरलेले होते. ही हस्तिदंती चीज त्यांनी माझ्या हातात दिली, आणि म्हटले,

" तुमच्या शहरातील तरुण नागरिकांना ही माझी भेट ! कृपया ती त्यांना द्या. "

संभाषण संपल्यावर नेहरूंबरोबर आमचा फोटोही काढण्यात आला. त्यानंतर नेहरू आम्हाला पोचविण्यास दरवाज्यापर्यंत आले, आणि अत्यंत स्नेहभावाने त्यांनी आमचा निरोप घेतला. नेहरूंबरोबर झालेल्या या संस्मरणीय भेटीचा मला कधीच विसर पडणार नाही. त्यांनी दिलेली हस्तिदंती चीज कझान येथील वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आली आहे. नेहरूंनी आपले वचनही संपूर्णपणे पाळले होते. स्वगृही परत आल्यावरोबर थोड्याच दिवसांत मला समजले, की ती तातार शाळकरी मुलगी, आणि एक भारतीय विद्यार्थी या दोघांत नियमितपणे पत्रव्यवहार सुरूही झाला आहे.

७

सोविएत संघराज्यातील नेहरू साहित्याचे प्रकाशन

नेहरूंच्या लिखाणाबद्दल सोविएत युनियनमध्ये कधी नव्हती इतकी आज जिज्ञासा, आणि कुतूहल आहे. त्यांच्या ग्रंथांवर सोविएत वाचकांच्या उडया पडत आहेत. काही अपवाद वगळता नेहरूंचे बहुतेक ग्रंथ रशियन भाषेत अनुवादित झाले आहेत. त्यांच्या ग्रंथांच्या आवृत्त्यांमागून आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. आणि प्रत्येक आवृत्ती लाखो प्रतींची आहे.

भारत-शोध (दि डिस्कव्हरी ऑफ इंडिया)

१९५५ साली 'इनोस्त्रान्नाया लितरे तुरा' या प्रकाशन संस्थेने नेहरूंचे 'भारत-शोध' (दी डिस्कव्हरी ऑफ इंडिया) हे पुस्तक प्रसिद्ध केले.

सोविएत दौऱ्याला निघण्यापूर्वी नेहरूंनी २८ मे, १९५५ रोजी आपल्या या पुस्तकाच्या रशियन आवृत्तीच्या प्रस्तावनेत खालीलप्रमाणे लिहिले आहे,

'माझे पुस्तक, 'भारत–शोध' ('दि डिस्कव्हरी ऑफ इंडिया') हे रशियन भाषेत अनुवादित होत आहे. तुरुंगात असताना बारा वर्षांपूर्वी मी हे पुस्तक लिहिले होते. त्या वेळी जगाच्या पुष्कळ भागांत लढाई पेटली होती. त्यावेळचे माझे विचार, आणि माझ्या मनोभावना या पुस्तकात व्यक्त झाल्या होत्या.

गेल्या दहा वर्षांत जगात पुष्कळच बदल झाला आहे. या शतकाच्या चौथ्या दशकातील परिस्थितीपेक्षा आजची परिस्थिती फारच भिन्न आहे. पण हे पुस्तक मुख्यतः प्राचीन भारतासंबंधीच आहे. आमच्या या प्राचीन देशाची पार्श्वभूमी नीट समजावून घेण्यासाठीही कदाचित हे पुस्तक उपयुक्त होऊ शकेल. प्राचीन भारताच्या अभ्यासकास या पुस्तकाची थोडीफार मदतही होऊ शकेल. भारतातील आजची पिढी कशा तऱ्हेने तयार झाली आहे, कोणत्या घटनांनी चालू पिढीवर परिणाम केलेला आहे, यावरही हे पुस्तक कदाचित थोडाफार प्रकाश टाकू शकेल.

सोविएत युनियनला मी एक महान देश समजतो. थोड्याच दिवसांत या महान देशाचा

प्रवास करायला मला संधी मिळेल, अशी मला आशा वाटते. या महान देशाबद्दल मी इतके वाचले आहे की, मला प्रत्यक्ष स्वतःच्या डोळ्याने हा देश पाहिलाच पाहिजे, असे वाटू लागले आहे. या देशातील निरनिराळ्या शक्ती कोणते कार्य पार पाडीत आहेत, हे आपण थोडेफार तरी समजावून घेतलेच पाहिजे, अशी उत्कट जिज्ञासा माझ्यामध्ये निर्माण झाली आहे. आधुनिक कालात कोणत्या शक्तींनी या महान देशाच्या रचनेस कसकसा हातभार लावला होता, हेही मला समजावून घेण्याची इच्छा आहे. या महान रचनाकार्यात कोणत्या शक्तीचा किती वाटा आहे, हेही मला समजावून घेण्याची आवश्यकता वाटते. कारण हा विशाल, महान देश जगाच्या भवितव्यावर फारच जोरदार रीतीने परिणाम करीत आहे, यात शंकाच नाही. माझे पुस्तक रशियन भाषेत अनुवादित होत आहे, याचा मला खास आनंद वाटतो. तुरुंगाच्या एकांतवासातील जीवनामध्ये लिहिलेली ही माझी 'वाङ्मयकन्या' रशियन भाषेच्या पेहरावात हिंडूफिरू लागणार, हे पाहून मला खरोखरच अतिशय आनंद वाटतो." [१]

आत्मचरित्र

त्याच साली, म्हणजे १९५५ साली सोविएत युनियनमध्ये नेहरूंचे 'आत्मचरित्र' प्रकाशित करण्यात आले.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नेहरूंनी लिहिले होते :

"जवळजवळ सहा महिन्यांपूर्वी मी, माझ्या 'भारत–शोध' या पुस्तकाच्या रशियन भाषेतील अनुवादाला प्रस्तावना लिहिली होती. ही प्रस्तावना लिहून झाल्यानंतर थोड्याच दिवसांत सोविएत युनियनला भेट देण्याचा योग आला, हे मी माझे सद्भाग्यच समजतो. पंधरा दिवस मी सोविएत युनियनचा दौरा केला. आणि परत आलो. परत येताना मी माझ्याबरोबर या महान देशाच्या, आणि त्या देशातील जनतेच्या अनेक आठवणीही घेऊन आलो आहे. तेथील काहीकाही गोष्टींनी तर, माझ्यावर खोल परिणाम केला आहे. तसा माझा दौरा अल्पकालीनच होता. पण या अल्पकाळातही सोविएत युनियनने केलेल्या प्रचंड प्रगतीबद्दल मला पुष्कळच माहिती मिळाली. आणि त्या देशाच्या परिस्थितीबाबतच्या माझ्या ज्ञानात पुष्कळच भर पडली. सोविएत युनियनमध्ये खऱ्या प्रेमाने, आणि जिव्हाळ्याने तेथील जनतेने माझे स्वागत केले होते. तेथील लोक अत्यंत शांतताप्रेमी आहेत, अशी माझी खात्री पटली होती. दीर्घकाळपर्यंत या आठवणी माझ्या स्मृतीत कायम राहतील, असे मला वाटते.

१. 'सोविएत लँड', १९५५, अंक १२.

माझ्या पुस्तकाचे सोविएत जनतेने स्वागत केले, हे पाहून मला अत्यंत आनंद वाटला. पुष्कळ लोक, माझे पुस्तक वाचीत होते, हे ऐकूनही फार बरे वाटले. आपले पुस्तक पुष्कळ लोक वाचताहेत, हे ऐकल्यानंतर कोणत्या लेखकाला अभिमान वाटणार नाही? अभिमान वाटणे स्वाभाविकच आहे. पण हे जाऊ देत. रशियन जनता, आणि माझ्या देशातील जनता, एकमेकांना जास्त चांगल्या रीतीने समजू शकेल, आणि त्या दृष्टीने माझी पुस्तकेही थोडीफार उपयुक्त ठरतील, अशी मी आशा बाळगतो.

मला आता माझ्या दुसऱ्या एका पुस्तकाच्या रशियन अनुवादाला प्रस्तावना लिहिण्यास सांगण्यात आले आहे. या पुस्तकाचे नाव आहे, 'आत्मचरित्र,' (ॲन ऑटोबॉयॉग्राफी). ही प्रस्तावना लिहिण्याचे मी आनंदाने कबूल केले. पण त्याचबरोबर मला आणखीही एक गोष्ट सांगणे भाग आहे. हे 'आत्मचरित्र' मी वीस वर्षांपूर्वी लिहिले होते. माझ्या पहिल्या 'भारत-शोध' या पुस्तकाप्रमाणे हेही पुस्तक तुरुंगातच लिहिण्यात आले होते. तत्कालीन काही घटना, त्यावेळी मला फार महत्त्वाच्या वाटल्या होत्या. या पुस्तकात त्यांचा मी बराच ऊहापोह केला होता. आता कदाचित त्या घटनांना काही फारसे महत्त्व, उरलेले नसण्याचीही शक्यता आहे. पण त्यावेळच्या भारतीय विचारसरणीवर हे पुस्तक प्रकाश टाकू शकेल, आणि वाचकांना भारतीय प्रश्नांकडे कसे पाहायला पाहिजे, याची अंतर्दृष्टीही देऊ शकेल. विशेषतः आमच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेणाऱ्या अनेक व्यक्तींचीही ओळख, या पुस्तकाद्वारे रशियन वाचकांना होईल.

त्यानंतर पुष्कळच काही घडले आहे. आमच्यापैकी अनेक जण थोडेफार बदललेही आहेत, विकसितही झाले आहेत. असे होणे स्वाभाविकच असते.

पहिल्या पुस्तकाप्रमाणे सोविएत आणि भारतीय जनता, यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होण्याच्या कार्यात हे पुस्तकही उपयुक्त ठरेल, आणि या पुस्तकाचीही या कार्यात मदत होईल, अशी मला आशा आहे."[२]

भारताचे परराष्ट्रीय धोरण

'भारत शोध,' आणि 'आत्मचरित्र' यांच्या प्रकाशनाला दहा वर्षे झाल्यानंतर सोविएत युनियनमध्ये प्रगतिशील प्रकाशक, मॉस्को (प्रोग्रेस पब्लिशर्स, मॉस्को) या प्रकाशकांनी भारताच्या पंतप्रधानांनी १९४६ ते १९६४ या कालात केलेल्या भाषणांचा संग्रह प्रकाशित केला. भारताच्या पंतप्रधानांनी आंतरराष्ट्रीय परिषदांत केलेली अनेक भाषणे, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या अधिवेशनात केलेली भाषणे, भारतीय संस-


२. 'सोविएत लँड' १९५६, अंक २.

देत केलेली भाषणे, त्याचप्रमाणे नेहरूंनी सोविएत युनियनच्या आणि इतर देशांच्या दौऱ्यावर असताना केलेली भाषणे, या संग्रहात समाविष्ट करण्यात आली होती.

विश्वइतिहासाची झलक

'ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री' हे पुस्तक मराठी भाषेत 'इंदिरेस पत्रे', या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाले आहे.

मॉस्कोच्या नाउका प्रकाशन या 'संस्थेने नेहरूंच्या 'विश्वइतिहासाची झलक' ('ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री') या ख्यातनाम पुस्तकाचा रशियन भाषेत अनुवाद केला आहे. तो लवकरच प्रसिद्ध होईल. हे अभिजात पुस्तक केवळ सोविएत विद्यार्थ्यांमध्येच नव्हे, तर तमाम सोविएत जनतेच्या निरनिराळ्या विशाल थरांमध्येही लोकप्रिय होईल, हे निःसंशय.



८

जनतेच्या स्मृतीमध्ये नेहरूंचे नाव अजरामर आहे.

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सोविएत युनियनमधील निरनिराळ्या थरांतील लोक भारताला भेटी देऊ लागले. या प्रवाश्यांच्या भेटी फारच लवकर लवकर होऊ लागल्या. सोविएत युनियनमधील बुद्धिमंतांनी तर, भारताला वारंवार भेटी दिल्या आहेत. या बुद्धिमंतांनी नवभारताच्या अनेक पैलूंचे दर्शन आपल्या लिखाणात घडविले आहे. भारताचा सांस्कृतिक वारसा, स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर स्वतंत्र आणि सुखी जीवनावद्दल भारतीय जनतेच्या इच्छा-आकांक्षाही या लिखाणांत व्यक्त झाल्या आहेत. हे लिखाण सोविएत युनियनमये ख्यातनाम झालेले आहे.

नेहरू आणि सोविएत चित्रकार

अनेक सोविएत चित्रकार नेहरूंना भेटले होते. या चित्रकारांच्या दृष्टीने नेहरू म्हणजे भारतीय जनतेच्या उमदेपणाचे, त्याचप्रमाणे भारतीय जनतेच्या उदात्त आत्म्याचे जिवंत साकार स्वरूपच होते. भारतीय जनतेची हुशारी, आणि मानवता हीच नेहरूंमध्ये साकार झाली आहे, असे या चित्रकारांना वाटले होते. आणि म्हणूनच सोविएत चित्रकारांचे नेहरू हे एक स्फूर्तिदाते दैवत झाले असल्यास, त्यात कसलेही आश्चर्य नाही.

अनेक सोविएत चित्रकारांनी नेहरूंच्या तसबिरी काढल्या आहेत. यामध्ये काही काही चित्रकार, तर अतिशय प्रसिद्ध आहेत. अलेक्झांडर गेरासिमोव, आणि कॉस्टंटिन फिनोजेनोव, या दोन्ही ख्यातनाम चित्रकारांनी भारतामध्ये येऊन, नेहरूंच्या तसबिरी काढल्या आहेत.

अलेक्झांडर गेरासिमोव (१८८१–१९६३) यांनी १९६३ साली 'कलावंताचे जीवन' हे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकात त्यांनी असे लिहिले होते, की भारतात चित्रकाराला आपल्या चित्रांसाठी इतके विषय उपलब्ध असतात, की त्यांचे मोजमाप करणेसुद्धा अशक्य! म्हणून चित्रकाराला मर्यादा आखून घ्याव्या लागतात. आणि मग चित्रकार साहजिकच तसबिरींकडे वळतो. भारतीय जनतेच्या नमुनेदार चेहऱ्यांच्या तो तसबिरी काढू लागतो. हे चेहरे खरोखरच भारतीय जनतेच्या प्रातिनिधिक स्वरूपाचेच असतात. गेरासिमोव हे पुढे लिहितात की, सरकारी कामामुळे नेहरूंवर नेहमीच फार बोजा पडलेला असे. त्यामुळे तसबिरीसाठी आयोजित केलेल्या आमच्या बैठका दोन वेळा रद्द कराव्या लागल्या. गेरासिमोव यांना भारताच्या पंतप्रधानांची तसबीर अगदी शेवटी परत जाण्याच्या वेळी कशीबशी पूर्ण करता आली. गेरासिमोव यांनी ही तसबीर अर्थातच पंतप्रधानांना नजर केली. सोविएत युनियनमध्ये परत आल्यावर गेरासिमोव आणि फिनोजेनोव या दोघांनीही नेहरूंनी त्यांच्या कामात फार रस घेतला होता, असे सांगितले होते, आणि नेहरूंची प्रशंसा केली होती.

दुसऱ्या काही सोविएत चित्रकारांनी नेहरू सोविएत युनियनच्या दौऱ्यावर आले असतान नेहरूंच्या तसबिरी काढल्या होत्या. यांपैकी काही तसबिरी तर, निव्वळ स्मृतीवरून काढण्यात आल्या होत्या, आणि काही छायाचित्रांवरून काढण्यात होत्या. या तसबिरी निरनिराळ्या माध्यमात काढण्यात आल्या होत्या. सेरोव आणि खानिन यांनी तैलचित्रे काढली होती, तर काहींनी जलरंगांत मोझॅकमध्ये तसबिरी काढल्या होत्या. काहींनी दुसरीही काही तंत्रे वापरली होती.

मैत्रीपुष्पे

१९७४ च्या वसंतऋतूत परदेशी जनतेबरोबर मैत्रीसंबंध प्रस्थापित करण्यासाठी स्थापन झालेल्या संस्थेने एक समारंभ आयोजित केला होता. या समारंभात प्रसिद्ध बी–वियाणे संशोधक कोलेस्निकोव यांच्या मुलीला ' गोल्डन लिलॅक ब्रँच ' हे पारितोषिक देण्यात आले. लिलॅक उत्पादकांच्या आंतरराष्ट्रीय संस्थेने हे पारितोषिक ठेवले होते.

लिओनिद कोलेस्निकोव यांनी ते जिवंत असताना लिलॅकच्या तीनशे जाती शोधून काढल्या होत्या, यापैकी अनेक जाती आज बल्गेरिया, कॅनडा, पोलंड, अमेरिका, झेकोस्लोव्हाकिया, ब्रिटन, फ्रान्स, आणि हॉलंड, या देशांत काढण्यात येत आहेत. कोलेस्निकोव यांनी १९१६ साली सुरुवात करून प्रथम लिलॅकची दोन झुडुपे लावली. नंतर कोलेस्निकोव यांनी आपल्या लिलॅकच्या बागेत आणखी भर घालून आपली देणगी म्हणून ती झुडुपे सरकारला अर्पण केली. आज कोलेस्निकोव यांची झुडुपे विश्वविख्यात झाली असून जगाच्या प्रत्येक भागात त्यांची लागवड करण्यात येते. जाता जाता सहज सांगायचे म्हणजे, लिलॅकच्या काही जातींची नावे भारतीय आहेत. १९५० सालच्या वसंतऋतूत लिलॅकच्या एका झुडुपाने एका गडद जांभळ्या रंगाच्या फुलाला जन्म दिला. लिओनिद कोलेस्निकोव यांनी या जातीला भारत ' हे नाव दिले. कारण स्वतंत्र होऊन भारतीय लोकसत्ताक नुकतेच त्यावेळी जन्माला आले होते. त्याच्या सन्मानार्थ हे नाव देण्यात आले होते. कोलेस्निकोव यांना भारताबद्दल नेहमीच आदर, आणि आपलेपणा वाटत होता.

१९५५ साली नेहरूंनी जेव्हा सोविएत युनियनला भेट दिली, तेव्हा लिलॅकच्या या जातीला अगदी बहर आला होता. जांभळ्या फुलांचा सडा पडत होता. कोलेस्निकोव यांनी ताबडतोब या जातीचे नाव बदलून तिला ' जवाहरलाल नेहरू ' हे नाव दिले.

दाण्यांतली तसबीर

ओर्दजोनिकिट्झे या कॉकेशसमधील गावाचे एक कलाकार इम्राती अल्दातोव यांनी धान्याचे माध्यम वापरून नेहरूंची तसबीर काढली होती. मोझॅक माध्यमातून केलेली ही कलाकृती पुरी झाल्यावरोवर अल्दातोव यांनी अत्यंत काळजीपूर्वक रीतीने ती मॉस्कोमधील भारतीय दूतावासाकडे धाडली. ही घटना १९५८ सालची. त्यानंतर थोड्याच दिवसांत अल्दातोव यांना नेहरूंचे एक पत्र मिळाले. त्याची थोडीशी चुणूक—

" प्रिय मित्र,

आमच्या मॉस्कोतील राजदूताने आपले पत्र, आणि आपण पाठविलेली माझी तसबीर माझ्याकडे पाठविली आहे. तसबीर फारच सुंदर वठली आहे. अभिनंदन !

आपल्या या देणगीवद्दल मी सदैव कृतज्ञ राहीन. विशेषतः आपल्या पत्रात शांततेबद्दल ज्या भावना व्यक्त झाल्या आहेत, त्या वाचून तर मला धन्य धन्य वाटले. आपणांस माझ्या सर्व शुभेच्छा !

आपला स्नेहांकित,
जवाहरलाल नेहरू "

राजपथ

भारताचे खास अभ्यासक, आणि हौशी कलाकार एस्. आय्. पोताबेन्को यांनी 'राजपथ' या नावाचे एक चित्र काढले आहे. त्याबद्दल पोताबेन्को लिहितात, "या चित्राला माझ्या दृष्टीने एक खास महत्त्वपूर्ण अर्थ आहे. प्रत्येकजण आपापल्या कलाकृतीवर आपली काहीतरी छाप पाडून आपले खास वैशिष्ट्य त्या कलाकृतीत ओतीत असतो, असे मला वाटते. भारतात काढलेल्या माझ्या इतर सर्व चित्रांपेक्षा हे चित्र मला जास्त जवळचे वाटते. सगळ्या चित्रांपेक्षा या चित्राला माझ्या दृष्टीने जास्त अर्थ आहे. १९६३ सालचा भारताच्या राजधानीत साजरा झालेला लोकसत्ताक दिनाचा सोहळा- हा कायमचा माझ्या स्मरणात राहील. काय सुंदर चकचकीत ऊन पडले होते त्या दिवशी ! त्या दिवशी राजपथच्या तोंडाशी शुभ्र शेरवानी परिधान करून नेहरू भारताच्या राष्ट्रपतींच्या आगमनाची वाट पाहात होते. नेहरूंची नाजूक, लवचिक शरीरयष्टी, त्यांचा तो स्वाभिमानी रुबाब, आणि वातावरणातील तो आनंद, आणि उत्साह या गोष्टी माझ्या स्मृतीवर कायमच्या कोरल्या आहेत.

काही काही लोकांच्या जीवनाची तुलना, ही आकाशातील चकचकीत ताऱ्यांवरोबरच करावी लागते. ज्योतिर्विद आपणांस सांगत असतात की दूर अंतरावरील तारे हे जेव्हा मरतात, तेव्हा ते फारच प्रकाशित होत असतात, आणि पुष्कळ कालानंतर त्यांचा हा प्रकाश पृथ्वीवर पोहोचत असतो. एका अर्थाने नेहरूंच्या जीवनाची तुलना, त्या ताऱ्यांच्या जीवनाशीही करता येईल.

नेहरू शिखर

तिएन्‌शान पर्वतराजीवर एक शिखर आहे. हे शिखर पर्वतराजींच्या अगदी काळजासारखे आहे. या शिखराचे नाव आहे, ' जवाहरलाल नेहरू. ' समुद्रसपाटीपासून हे शिखर सहा हजार सातशे वेचाळीस मीटर उंच आहे. मॉस्को येथील बाऊमन हायर टेक्निकल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी या शिखरावर गिर्यारोहण करण्यासाठी सहल काढली होती. या विद्यार्थ्यांनीच या शिखराला हे नाव दिले आहे. आठ ' धडपडणारे विद्यार्थी ' या पथकात सामील झाले होते. व्ही. इवानोव, ए. ओवचिन्निकोव, ओ. गाल्किन, एल्. दोब्रोवोल्स्की, व्ही. मॅक्झिमोव, वाय. कुसोव, इ. मिस्लोव्स्की, व्ही. पुत्रिन ही त्यांची नावे. १५ ऑगस्ट, १९७० या दिवशी त्यांनी शिखर जिंकले, आणि झेंडा लावला. शिखर जिंकणे, ही काही सहजसाध्य आणि साधीसुधी गोष्ट नव्हती. विद्यार्थ्यांच्या निश्चयाची, आणि निर्धाराची ती कसोटीच होती ! वर्फाळ कडेकपारीमधून त्यांना वर चढावे लागले होते. काही काही वेळा, तर कड्याच्या अगदी थोड्या आधारावर त्यांचे दोर लोंबत असत. कोणत्याही क्षणी दोर निसटेल, अगर तुटेल, आणि त्यांना स्वर्गारोहणच करावे लागेल, अशी परिस्थिती होती. भन्नाट वारे सुटले होते, आणि तरुण विद्यार्थी जन्ममरणाची कवड्डी खेळत होते. पाया नसलेल्या खोल खोल दऱ्यांतून वर चढण्याचा प्रयत्न करीत होते. अकाळविकाळ खडकांशी सामना करीत होते.

नेहरू शिखरावर पोहोचण्यासाठी १९७२ साली एक नवा मार्ग शोधून काढण्यात आला. या प्रसंगी या पथकात पाच गिर्यारोहक होते. व्ही. ग्लुखोव, व्ही. बोब्रोव, बी. साऊस्तिन, व्ही. झासेत्स्की, आणि व्ही. पेत्रूक ही त्यांची नावे ! या गिर्यारोहकांनी अत्यंत वाईट हवेशी आठ दिवस सामना केला, आणि शिखरावर आपले हल्ले चालू ठेवले. आठ दिवस भयंकर वादळी वारे वाहत होते. शरीरातील हाडान हाडाचे अगदी वर्फ होत होते. तपमान ३० सें ग्रे. इतके खाली गेले होते. शिखरावर बर्फाचा वर्षाव होत होता. चालणेच काय पण उभे राहणेही अशक्य झाले होते. पण या पाच बहादूरांनी १५ ऑगस्ट, १९७२ रोजी शिखर सर केले. ते विजेते ठरले.

नेहरूंच्या स्मरणार्थ पोस्टाची तिकिटे

मे १९६४ च्या शेवटीशेवटी साऱ्या सोविएत युनियनमध्ये नेहरूंना श्रद्धांजली अर्पण करणाऱ्या शोकसभा भरल्या होत्या. त्याच वेळी पोस्ट आणि तार आणि दळणवळण मंत्रालयाने नेहरूंच्या स्मृत्यर्थ पोस्टाची तिकिटे काढली होती. कोटयवधी तिकिटे हां हां म्हणत खपली ! सर्जी सोकोलोव यांनी या तिकिटांवरील नेहरूंची तसबीर रेखाटली होती. ते लिहितात,

" १९६१ साली नेहरूंनी मॉस्कोला भेट दिली होती. त्यावेळी मी नेहरूंना प्रथम पाहिले. संपूर्ण तसबीर काढण्याकरिता उपयुक्त व्हाव्यात म्हणून मी नेहरूंच्या अनेक रेखाकृती घाईघाईने काढल्या होत्या. नेहरूंच्या स्मृत्यर्थ काढण्यात येणाऱ्या पोस्टाच्या तिकिटावर काढण्यात येणारी तसबीर रेखाटण्याची मला संधी मिळाली, हे मी माझे भाग्यच समजतो. सोविएत जनतेला भारतीय जनतेबद्दल, आणि तिच्या या महान नेत्याबद्दल अतीव आदराची भावना आहे. ही भावना व्यक्त करण्याची मला संधी मिळाली, याबद्दल मल खरोखरच धन्य धन्य वाटते. "

तुर्कमेनी गालिचा-विणकरांची स्फूर्तिदायी अत्युत्कट कलाकृती

जुन्या तुर्कमेनमध्ये एक म्हण प्रचलित होती,

" तुम्ही तुमचा गालिचा पसरा, आणि तुमच्या आत्म्याचे मला दर्शन घडू द्या. "

ज्यूमार रान्दिलोव हे अश्खाबाद येथील सतरंज्या, आणि गालिचे तयार करणाऱ्या गिरणीमधील एक प्रसिद्ध आरेखक किंवा रचनाकार ! (डिझायनर). त्यांनी नावात मुहामेन्दोवा, आणि ओवनूर कोचुमोवा, या दोन सहकारी महिला कारागिरांच्या साहाय्याने जवाहरलाल नेहरूंची गालिच्यात तसबीर विणली होती. गालिचा कारागिरीचा हा एक उत्कृष्ट नमुनाच होता. या गालिच्याची ऑर्डर खुद्द तुर्कमेन सरकारनेच दिली होती. कारण तुर्कमेन सरकारला, भारत सरकारला या गालिच्याची भेट द्यायची होती. कलावंत नावात यांनी यावावत खालीलप्रमाणे उद्गार काढले होते,

" नेहरू हे सोविएत युनियनचे एक महान मित्र होते. आमच्या देशाच्या दौऱ्यावर असताना, त्यांनी आमच्या शहराला भेट दिली होती. तेव्हापासून ते ज्या घरात उतरले होते, त्या घराला ' नेहरू-सदन ' असे नाव आम्ही दिले आहे. "

* * *

सोविएत जनतेला नेहरूंच्या मृत्यूची बातमी ऐकून धक्काच बसला. नेहरूंना श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता, आणि नेहरूंच्या स्मृतीला उजाळा देण्याकरिता प्रत्येक शहरात, प्रत्येक खेड्यात, प्रत्येक कारखान्यात, आणि प्रत्येक शाळेत सभा भरविण्यात आल्या. सोविएत जनतेच्या हृदयात, नेहरूंची स्मृती अमर राहील. नेहरू हे भारताचे महान सुपुत्र ! आणि सोविएत युनियनचे सच्चे मित्र !

अलिम केशोकोव
सोविएत कावार्दाचे कवी

नेहरू

काय ? स्वप्नस्वातंत्र्य ? वाहवा ! अहो पण...
एक भिकारी ?
त्याला ना निवारा ना भाकरी !
त्या दुष्टांनी हिरावून घेतली.
त्याला कुठले हो स्वप्नस्वातंत्र्य ?
मुळातच धड झोप तरी मिळेल काय त्याला ? शंकाच आहे.
झोप कोण घेऊ शकेल ?
मायभूला पायदळी तुडविणाऱ्या परक्या फौजांच्या बुटांचा दाणदाण आवाज.
मग भुकेल्या मुलाचे रडणे कुणाला ऐकू येणार ?

स्वप्नांचे स्वातंत्र्य हवे खरे ? पण...पण ?
बेबनावाच्या भेसूर ज्वालांनी वेढलेल्या देशात कुणी
झोपी जाऊ शकेल काय ?
धुमसणाऱ्या जखमांचे चटके खाल्ल्याने जिथे
माणूस माणसाला दुरावतो
नि भाषा भाषेपासून दुरावते
सीमा कितीही पुसट असल्या तरी.

नेहरू ! कसोटीच्या रात्री त्या भीषण समयी
सर्व देशाला तुम्ही हाक दिलीत
आम्हाला हवे खरेखुरे अस्सल स्वातंत्र्य !
नुसते स्वप्नरंजन काय कामाचे ?
फुफाटयात गुदमरलेल्या देशाने जरा दम घेतला

आणि स्वातंत्र्य सैनिकांची अंतरंगे
आत्मविश्वासाने, शौर्याने भरून गेली.

तुम्हाला बंदिशाळेत गजाआड डांबले
तेथे तुमचा आवाज जास्तच बुलंद झाला.
मग तुमच्या लोकांनी ऐरणीवर तलवारी घडविल्या
आणि तुमच्या मागे बाहेर राहिलेल्या लोकांनी
स्वातंत्र्याचा तुमचा झेंडा खाली पडू दिला नाही !
आणि शेवटी ज्या घटकेला युद्धाला तोंड फुटले
तेव्हा तुमच्या लोकांनी तोफा डागल्या
दारूगोळ्यांच्या नव्हे.....
परक्या सत्तेवर तिरस्कारतेचा भडिमार केला त्यांनी !

गनिमाची चाळण झाली.
निःस्पृह नियतीचा हा सूड !
त्या समशेरीपुढे
बिशाद आहे कुणी उभे राहील !
तुम्ही दिलीत रणगर्जना आणि पुढे झालात
पाठोपाठ साऱ्या जनतेने
एल्गार केला
स्वराज्याचा गड सर केला !

साम्युइल मर्शाक
सोविएत कवी

सूर्य–चंद्र

निरभ्र नि रखरखीत निळ्या निळ्या नभाखाली
उसळत्या लाटा हळुवार धावताहेत
सूर्यकिरणांत शुभ्र रंगलेली
एक चमकती नौका घराकडे हाकारली आहे

दूर दूर असलेल्या सूर्यप्रकाशात न्हालेल्या भारतभूमीतून
सुहृदांच्या शुभेच्छा ती घेऊन येत आहे
तिच्यात आहे एक अपूर्व ऐवज
दोन प्राणी !—अजब वस्तू !

आणि जेव्हा ती नौका ओदेसा बंदराला लागते
तेव्हा फुले घेऊन वाट पाहणाऱ्या
प्रक्षकांच्या रिंगणा रिंगणांनी त्याचे स्वागत केले
सर्वांत पुढे बालवीर आणि वीरबाला

जवळच्या नि दूरच्या देशादेशांतून
ओदेसाला नौका नेहमी येत असतात
या गावाला कशाची नवलाई अशी नाहीच !

पण सूर्य–चंद्र ओदेसाला येणार
भलतेच ! असे कधी झालंय ? काहीतरीच अघटित
खरंच ? आकाशातील ते दोन तेजोगोल
खरंच नभातून खाली उतरले असतील काय ?

छे हो ! ती दोन लहानग्यांची नावे आहेत !
हत्तीच्या दोन चिमुकल्या पिलांची !
ते दोन्ही भारतीय पाहुणे शांत उभे आहेत
हत्तींना गोंगाट आवडत नाही. समजलात ?

कविता

सोविएत मुलांमुलींसाठी
भारतातून नेहरूंनी त्यांना पाठविले
दूर दूर असलेल्या भारतभूमीतून
त्यांनी आणलाय एक संदेश

अगदी बाळबोध शब्दात त्यात लिहिले आहे
' हे शांतिदूत आहेत '

फळीवरून मंद आणि तालात पाउले टाकीत
सोंडेला हळुवार झोके देत
चंद्र–सूर्य खाली उतरतात.

त्यांनी आपल्या प्रवासात अर्धे जग पालथे घातले !
आणि आता ते आपल्याकडेच आपल्या सोविएत भूमीवर वाढतील
घराएवढे मोठे मोठे होतील.

दूर देशातील त्या पाहुण्यांचे
मनःपूर्वक स्वागत झाले
जसे ते मोठे होत जातील तशीच
दोन्ही देशातील लोकांची मैत्रीही वाढत जावो.

(सोव्हिएत लँड, १९५५, क्र. २०)

मिर्झा केम्पे
सोविएत लिथुआनियाची कवयित्री

नेहरूंची रक्षा

मी एक स्त्री ! आता मी रक्षा आहे
ऐका रक्षा, काय गात आहे
आम्हाला उचलून घ्या उंच आभाळापर्यंत
पंख फुटलेल्या रक्षा आम्ही
आम्हाला उडायचे आहे
तेथून, गर्द निळ्या आकाशातून उधळा
भारतभूमीच्या कुशीत रुजू द्या
तिला अलगद आच्छादू द्या
एखाद्या हळुवार पसरत जाणाऱ्या पडद्याप्रमाणे
मग मी कुजबुजेन—

आई माझे अस्तित्व तुला जाणवते का ?
जिवंतपणी आणि मृत्यूनंतर
ज्योतीच्या आणि नंतर राखेच्या रूपात
मी माझे सर्वस्व तुला अर्पण केले
मला हृदयाशी धरून भारतभूमी निःशब्द कुजबुजते—

जवाहरलाल माझ्या लाडक्या मुला
मी तुला विश्रांती घेऊ देणार नाही
तुला मृत्यूच्या किनाऱ्याला पोहोचू देणार नाही
तुझ्या रक्षेला लागली आहे गुलाब-कळ्यांची ओढ
तुझ्या चैतन्याचे कमळ माझ्यात सदैव फुलत राहील
महासागराच्या हिरव्या लाटेसारखी मी अजिंक्य होते
आता मी करडी राख आहे

ऐका रक्षा काय गात आहे—
आमच्यातून एक मूठभर काढून घ्या

आणि अलाहाबादेच्या काठावरून नदीत उधळा
मी त्या सनातन गंगेत पोहोचेन
ती मला झुलवीत वाहून नेईल
तेथे—महासागरात
जगातील समुद्रांमध्ये पोहोचल्यावर
मी मानवाची विचारसृष्टी व्यापेन.
मग ते मला विचारतील
हे शांतिमित्रा,
तू घटकाभर विश्रांती का घेत नाहीस ?

'या रे या एकमेकांचे हात धरून फेर धरू या'
माझ्या रक्षेचा मुकुट त्यालेली लाट हाक देईल
इतर लाटांच्या हातात हात मिळवून
मुसंडी मारून
भन्नाट धावत सुटेल
तेथे तंटाबखेडयांच्या रक्तपाताच्या जगात घुसून
एकच मंत्र देईल
प्रेम आणि शांती.

(सोविएत लॅन्ड, १९६५, क्र. १०)

तोफिक बैराम
सोविएत अझरबैजानचे कवी

बाकूमध्ये नेहरू

तुझी त्यांच्याशी प्रथम कोठे बरे गाठ पडली असावी ?
अहो इथेच ! भूतलावरील या पवित्र नगरीत
तुझ्या कानावर त्यांचे नाव पहिल्यांदा कुठे पडले बरे ?
माझ्या जन्मभूमीतच
मग त्यावेळी तू त्यांचे स्वागत कसे केलेस ?
पुष्पवृष्टीमध्ये त्यांना तू बुडवून टाकलेस
हे अर्थातच मला ठाऊक आहे म्हणा
मी की नाही सगळीकडे रस्त्यारस्त्यांवर
हसू पसरवून टाकले
टाळ्यांच्या फटाक्यांचे सर उडविले
तू त्यांना कडकडून मिठी मारलीस ?
होय ! बाबेकच्या शक्तिमान बाहूंनी कवटाळले
आणि भूमिपुत्राचे स्वागत कसे केलेस तू ?
शूर केरोग्लूप्रमाणे स्वाभिमानाने
आणि शेवटी त्यांचे आतिथ्य कसे केलेस ?
माझ्या अंतःकरणातील सारी ऊब त्यांनी दिली
आणि म्हटले—
ही मैत्री आणि श्रद्धा कापाझ प्रमाणे दृढ आणि चिरंतन राहो
मला ती भेट चांगलीच स्मरते
लोकांची ती अमर्याद गर्दी
डोंगराएवढा मानपत्रांचा ढीग त्या प्रियतम पाहुण्याला अर्पण केला
स्वातंत्र्यासाठी लढलेल्या देशाचे प्राण आणि मूर्तिमंत ज्ञान होते
त्यांचे करडे केस गंगेच्या रूपेरी लाटांप्रमाणे होते
तेजस्वी डोळ्यांची आगळी चमक
त्यांच्या मुद्रेवर विलसत होते पावित्र्याचे तेज
मी त्यांचे दर्शन घेतले
आणि क्षणभर मी स्वतःच त्यांच्या
पुरातन दूर देशात भटकून आलो

दिल्ली पाहिली; कलकत्ता नगरीही पाहिली
खुल्या दिलाने त्यांनी माझे स्वागत केले
मला आठवण झाली भारतभूमीची
तिथल्या मातीची नि आकाशाची
स्वातंत्र्य ज्योतीचा अग्नी घेऊन येणारा हा प्रोमेथिअस् !
साऱ्या वाकू नगरीने टाळ्यांच्या गजरात
त्यांचे स्वागत केले
इंग्रजांच्या शृंखलांचे तुकडे तुकडे करणारे
ते बलदंड बाहू पाहून कौतुक केले
त्या भयानक रणसंग्रामाची आठवण म्हणून आता
त्यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणूनच ओळखतात
पण जवाहरलाल नेहरू हे जनतेचे रत्न आहेत
जवाहीर आहेत
त्यांची भेट मी विसरणे शक्य नाही
आठवणीच्या कुपीत मी ते दृश्य कायमचे
बंद करून ठेवले आहे
मी ताठ उभे राहून पुढे वाकून पाहिले
म्हटले कदाचित त्यांचे माझ्याकडे लक्ष जाईल !
हातात पुष्पगुच्छ घेऊन मी गर्दीतून कशीबशी वाट काढली
पण माझे हात त्यांच्यापर्यंत काही पोहोचू शकले नाहीत
त्यांनी दिलेली हाक मी ऐकली.
कदाचित ती मलाच उद्देशून दिली असेल काय ?
मलाच उद्देशून दिली असेलही
मागाहून मला कुणीतरी सांगितले
त्यांनी आवाहन केले होते माझ्या देशाला, माझ्या राष्ट्राला
त्यांनी आपला प्रेरणादायी बाहू उंचावताच
सर्व आबालवृद्धांची मने हर्षाने वहरून आली.
कुणाला वाटले जणू काही
अझरबैजान आणि हिन्दुस्थान यांनी
एकमेकांना मिठी मारली
त्यांच्या तेजस्वी नजरेत लक्ष लक्ष मित्रांच्या
डोळ्यातील प्रेम गोळा झाले होते
लक्षावधी बांधवांच्या ओठावरील हसू

त्यांच्या ओठावर आले होते
पाहुणा फक्त दोन दिवसांचा
पण त्याने सारा देश जागवला
रात्री घराचे दार मी उघडेच ठेवले
न जाणो रात्री उशिरा तो
कदाचित भेट देऊन जाईल
पण त्याने जर शेजाऱ्याला भेट दिली तर
चला, आज आपला मुक्काम उंबरठ्यावरच
अशी सारी रात्र मी पेंगून काढली
पण हाय ? तो काही आलाच नाही
पण काय गंमत पहा
मला स्वप्न पडले—
स्वप्नात मीच त्याचा पाहुणा बनलो
तेव्हा मी होतो एक बच्चा
तेव्हा ती सारी स्वप्ने किती सुरेख नि मनोहर वाटली.
आमचे प्यारे जवाहरलाल
आमचे कायमचे पाहुणे बनलेत
आणि होय
आमच्या जनतेच्या हृदयात
ते खरेच कायमचे पाहुणे आहेत.

REFBK-0021207